मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

# कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनवणे
# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सटाणा

ता.बागलाण, जि.नाशिक.



# यशवंत

वार्षिक नियतकालिक -२०२०-२१ व २०२१-२२

## ‘बागलाणच्या लोककला’ विशेषांक



**कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनवणे**
**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सटाणा**

# यशवंत

वार्षिक नियतकालिक
२०२०-२१ व २०२१-२२

## मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

# आद्य संस्थापक व प्रेरणास्थान



कर्मवीर रावसाहेब थोरात



कर्मवीर गणपत दादा मोरे



कर्मवीर डी.आर.भोसले



कर्मवीर काकासाहेब वाघ



कर्मवीर भाऊसाहेब हिरे



कर्मवीर आण्णासाहेब मुरकुटे



कर्मवीर ॲड.बाबुराव ठाकरे



कर्मवीर ॲड.विठ्ठलराव हांडे



कर्मवीर डॉ.वसंतराव पवार

कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनवणे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सटाणा

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

# कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी



**डॉ. तुषार रामकृष्ण शेवाळे**
अध्यक्ष



**श्री. माणिकराव माधवराव बोरस्ते**
सभापती



**श्रीमती निलीमाताई वसंतराव पवार**
सरचिटणीस



**श्री. राघो काशिराम आहिरे**
उपसभापती



**डॉ. सुनिल उत्तमराव ढिकले**
चिटणीस

# कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनवणे
# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सटाणा



## मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक
## कार्यकारी मंडळाचे सदस्य


श्री.भाऊसाहेब लक्ष्मण खातळे
इगतपुरी


श्री.अशोक राजाराम पवार
कळवण व सुरगाणा


श्री. उत्तम गणपत भालेराव
चांदवड


श्री.दत्तात्रय रामचंद्र पाटील
दिंडोरी व पेठ


श्री.नामदेव नभाजी महाले
नाशिक


श्री.प्रल्हाद दादा गडाख
निफाड


श्री.दिलीप रघुनाथ पाटील
नांदगांव


डॉ. प्रशांत उदाराम देवरे
सटाणा


डॉ. जयंत त्र्यंबकराव पवार
मालेगांव


श्री. रायभान गंगाधर काळे
येवला


श्री. हेमंत विठ्ठल वाजे
सिन्नर


डॉ.विश्राम मालजी निकम
देवळा


श्री. सचिन पंडीतराव पिंगळे
नाशिक ग्रामीण

## सेवक सदस्य


प्रा. नानासाहेब त्र्यंबक दाते
सेवक सदस्य


श्री. गुलाबराव मुरलीधर भामरे
सेवक सदस्य


श्रीमती नंदा अशोक सोनवणे
सेवक सदस्य



प्रभारी प्राचार्य डॉ. पुंडलिक एकनाथ पाटील

# * गुणवत्ता प्राप्त प्राध्यापक *



**डॉ. नितीन दत्तात्रेय पंडित**
हिंदी विभाग
पी.एच.डी.प्राप्त
बेस्ट पेपर अवार्ड

**प्रा. तृप्ती धनंजय काकुळते**
प्राणिशास्त्र - विभाग
एम. फिल. प्राप्त





**प्रा. सोनाली रमेश देवरे**
प्राणिशास्त्र विभाग
एम.फिल.प्राप्त

## ✻ यशवंत विद्यार्थी ✻


SUO - Suryawanshi Harshal (FYBA)


JUO - Shirsath Amol (SYBA)


JUO - Hire Rohan (SYB.Com)


JUO - Khairnar Mayuri (TYB.Com)


JUO - Sonwane Punam (FYBA)


CQMS - Pathak Sandesh (TYBA)


SGT - Pawar Kiran (TYBA)


SGT - Gaikwad Satish (FYBA)


SGT - Dalvi Samrudhhi (FYB.Com)


SGT - More Punam (FYBA)


CPL - Sonawane Akshay (FYBA)


CPL - Jadhav Jayesh (FYBA)


CPL - Jadhav Nikita (FYBA)


CPL - Jadhav Sonali (FYBSC)


Best Cadet-Bhamare Yogita (SYBA)


Best Drill - Pagare Jayashri (SYBA)


Best Cadet-Kurhade Chetan (FYBA)


Best Drill-Nikam Ashish (12th)


CDT - Dhondge Yuvraj (12th)

# * विविध उपक्रम *



योग दिवसानिमित्त महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी



प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजास सलामी देताना महाविद्यालयातील
राष्ट्रीय छात्रसेना बटालीयन

# * विविध उपक्रम *



महाविद्यालयाचा विद्यार्थी रोशन दिलीप देवरे यांची पोलिस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करत असतांना पोलिस आयुक्त मा.श्री. दिपकजी पाण्डेय मा.श्री. राघोनाना आहिरे उपसभापती मविप्र, मा.श्री.डॉ. प्रशांत देवरे - संचालक मविप्र, मा.श्री. रामचंद्रबापू पाटील व महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.आर.डी. पाटील



महाविद्यालयाच्या विद्यार्थांना संबोधित करताना पोलिस आयुक्त मा.श्री. दिपकजी पाण्डेय

# * मान्यवरांच्या भेटी *



मविप्र उपसभापती मा.श्री. राघोनान आहिरे यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.दिलीप धोंडगे व समाजकार्य महाविद्यालयात प्राचार्य मा.डॉ. विलास देशमुख



सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. दिलीप धोंडगे व प्रा.वसईन

## * राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम *





सटाणा महाविद्यालयात NSS व NCC विभागाच्या वतीने आयोजित 'रक्तदान शिबिराच्या' कार्यक्रम प्रसंगी उपस्थित मा.श्री. राघोनाना आहिरे (म.वि.प्र.समाज संस्थेचे उपसभापती), मा.श्री.डॉ. प्रशांतादादा देवरे (संचालक म.वि.प्र.समाज संस्था, बागलाण तालुका), मा.पांडूनाना आाहिरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.ई.पाटील NSS कार्यक्रम अधिकारी, महाविद्यालयातील प्राध्यापक व स्वयंसेवक





सटाणा महाविद्यालयात Covid-19 च्या परिस्थितीत शासनाच्या आदेशानुसार 'युवा कचवचकुंडल' उपक्रमाच्या माध्यमातून तीन दिवसीय लसीकरण शिबीर कार्यक्रम प्रसंगी NSS च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांनामहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.डी.दरेकर, NSS कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक, रजिस्टर, आरोग्य विभाग लसीकरण टीम व स्वयंसेवक

# DEPARTMENT OF ENGLISH ACTIVITIES



Dr. R. D. Patil, Principal, inaugurating the event, birth anniversary of William Shakespeare as English Language Day



Mr. Sandip Kurkute expressing his views on the occasion of Welcome Programme





सटाणा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि दिया आय केअर डोळ्यांचे हॉस्पीटल, मालेगांव यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबरात डोळे तपासणी करतांना आराई गावातील नागरिक या प्रसंगी NSS कार्यक्रम अधिकारी, नेत्र चिकित्सा टीम व NSS स्वयंसेवक

## ❊ यशवंत खेळाडू ❊



कु. सायली कारभारी अहिरे हिने खेलो इंडिया स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला तर कु. कल्याणी अविनाश यशवंते हिची इंटर युनिव्हर्सिटी बॉक्सिंग स्पर्धेत निवड झाली.

ऑल इंडिया युनिव्हर्सिटी बॉक्सिंग वुमेन्स चॅम्पियनशिप स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांसोबत प्रा. अमोल तिसगे





मनोज शंकर देवरे या विद्यार्थ्यास ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी ॲथेलेटिक्स ८०० मीटर स्पर्धेत पदक प्राप्त

## ❊ विशेष श्रमसंस्कार शिबीर ❊





सटाणा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात आराई गावात 'वृक्षारोपण' करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.ई.पाटील, NSS कार्यक्रम अधिकारी व NSS स्वयंसेवक

## * आझादी की अमृत महोत्सव *





सटाणा महाविद्यालयाच्या 'आझादी की अमृत महोत्सव' या उपक्रमाच्या निमित्ताने आयोजित स्वच्छता अभियान कार्यक्रमात महाविद्यालयात स्वच्छता करतांना NSS चे स्वयंसेवक. या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.आर.डी.दरेकर महाविद्यालयातील प्राध्यापक NSS कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवक

॥ बहुजन हिताय । बहुजन सुखाय ॥

**मराठा विद्या प्रसारक समाजाचे,**

# कर्मवीर आबासाहेब तथा ना.म. सोनवणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सटाणा

**ता. बागलाण, जि. नाशिक.**

**(०२५५५) २२३०४२ फॅक्स : (०२५५५) २२३०४२**

Email : nmsasc@yahoo.co.in

www.satanacollege.com

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न पदवी व पदव्युत्तर महाविद्यालय

(ID No. PU/NS/ASC/008/(1967)

**नॅक पुनर्मानांकन : 'अ' श्रेणी (२०१७–२०२२)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सर्वोत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार प्राप्त

**'बागलाणच्या लोककला विशेषांक'**

# यशवंत

## २०२० - २०२१ व २०२१-२२

**अंक ५३ वा** **वर्ष ५४ वे**

# यशवंत

## २०२०-२१ व २०२१-२२


## ❋ संपादक मंडळ ❋

**अध्यक्ष**

मा. प्राचार्य डॉ. पुंडलिक एकनाथ पाटील

***❋ प्रमुख संपादक ❋***

**प्रा. डॉ. दीपा दत्तात्रय कुचेकर** (हिंदी विभाग)

**प्रा. डॉ. सुदाम राठोड** (मराठी विभाग)

***❋ विभागीय संपादक ❋***

प्रा. डॉ. एस.पी. कांबळे

प्रा. डॉ.व्ही.एस.बागुल

प्रा. एस.आर. निकम

प्रा. डॉ.एम.डी.सोनवणे

प्रा. एस.सी.कुरकुटे

प्रा. डी.डी.सोनवणे

प्रा. एस.व्ही.घरटे



***❋ प्रकाशक ❋***

मा. प्राचार्य डॉ. पुंडलिक एकनाथ पाटील

**कर्मवीर आबासाहेब सोनवणे**

**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सटाणा**

ता. बागलाण, जि. नाशिक.

**मुद्रक** : म.वि.प्र. समाज प्रिंटींग प्रेस, नाशिक

**छायाचित्र** : कलामंदिर फोटो स्टुडिओ, सटाणा

**मुखपृष्ट** : म.वि.प्र. समाज प्रिंटींग प्रेस, नाशिक व सौरभ खवले,

**डी.टी.पी.** : म.वि.प्र. समाज प्रिंटींग प्रेस, नाशिक



या नियतकालिकातील साहित्यात व्यक्त झालेली मते व विचार संबंधित लेखकांचे आहेत.
त्यांच्याशी प्राचार्य, संपादक मंडळ, संस्था किंवा महाविद्यालय सहमत असेलच असे नाही. - प्रमुख संपादक

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

## - कार्यकारी मंडळ -

### * पदाधिकारी *

| | | |
|---|---|---|
| डॉ. तुषार रामकृष्ण शेवाळे | – | अध्यक्ष |
| श्री.माणिकराव माधवराव बोरस्ते | – | सभापती |
| श्री. राघोनाना काशिराम आहिरे | – | उपसभापती |
| श्रीमती निलीमाताई वसंतराव पवार | – | सरचिटणीस |
| डॉ. सुनिल उत्तमराव ढिकले | – | चिटणीस |

### * तालुका सदस्य *

| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊसाहेब लक्ष्मण खातळे | – | इगतपुरी |
| श्री. अशोक राजाराम पवार | – | कळवण व सुरगाणा |
| श्री. उत्तम गणपत भालेराव | – | चांदवड |
| श्री. दत्तात्रय रामचंद्र पाटील | – | दिंडोरी व पेठ |
| श्री. नामदेव नभाजी महाले | – | नाशिक |
| श्री. प्रल्हाद दादा गडाख | – | निफाड |
| श्री. दिलीप रघुनाथ पाटील | – | नांदगांव |
| डॉ. प्रशांत उदाराम देवरे | – | बागलाण |
| डॉ. जयंत त्र्यंबकराव पवार | – | मालेगांव |
| श्री. रायभान गंगाधर काळे | – | येवला |
| श्री. हेमंत विठ्ठल वाजे | – | सिन्नर |
| डॉ. विश्राम मालजी निकम | – | देवळा |
| श्री. सचिन पंडीतराव पिंगळे | – | नाशिक ग्रामीण |

### * सेवक सदस्य *

| | | |
|---|---|---|
| श्री.गुलाबराव मुरलीधर भामरे | – | प्राथमिक व माध्यमिक विभाग |
| श्रीमती नंदा अशोक सोनवणे | – | प्राथमिक व माध्यमिक विभाग |
| श्री. नानासाहेब त्र्यंबक दाते | – | उच्च माध्यमिक व महाविद्यालय विभाग |

# * वरीष्ठ महाविद्यालय विकास मंडळ *

## सन २०१७ ते २०२२

| | | |
|---|---|---|
| श्री. रामचंद्र नारायण पाटील | – | अध्यक्ष |
| श्री. नानाजी नामदेव दळवी | – | सदस्य |
| श्री. डॉ. व्ही. डी. पाटील | – | सदस्य |
| श्री. बाळासाहेब जगन्नाथ सोनवणे | – | सदस्य |
| श्री. प्रल्हाद दगाजी सोनवणे | – | सदस्य |
| श्री. डॉ. संजय वसंतराव पाटील | – | सदस्य |
| श्री. जयवंत लक्ष्मण पाटील | – | सदस्य |
| श्री. अभिमन दादाजी सोनवणे | – | सदस्य |
| श्री. शंकर कडू कापडणीस | – | सदस्य |
| श्री. लालचंद रामभाऊ सोनवणे | – | सदस्य |
| श्री. विशाल प्रभाकर सोनवणे | – | सदस्य |
| श्री. विश्वास काशिनाथ चंद्रात्रे | – | सदस्य |
| श्री. विजय किसनराव वाघ | – | सदस्य |
| श्री. काळू शिवमन सोनवणे | – | सदस्य |
| श्री. दिलीप शंकर सोनवणे | – | सदस्य |
| श्री. बाळासाहेब अभिमन रौंदळ | – | सदस्य |
| श्री. शरद मधुकर सोनवणे | – | सदस्य |
| श्री. मंगेश काशिनाथ पवार | – | सदस्य |
| श्री. संदिप भिमसिंग पवार | – | सदस्य |
| प्राचार्य डॉ. दिलीप माधवराव धोंडगे | – | सचिव |
| प्रा. श्रीमती कल्पना सुकदेव पाटील | – | प्रा. प्रतिनिधी |
| प्रा. पोपट दामू सागर | – | प्रा. प्रतिनिधी |
| श्री. दिनेश भिवा कानडे | – | का. प्रतिनिधी |

## * कनिष्ठ महाविद्यालय शालेय व्यवस्थापन समिती सटाणा *

### - सन २०१७ ते २०२२-

| | | |
|---|---|---|
| श्री. यशवंत काशिराम अहिरे | – | अध्यक्ष |
| श्री. हिरामण हरी सोनवणे | – | सदस्य |
| श्री. प्रकाश शिवराम सोनवणे | – | सदस्य |
| श्री. दगाजी भावराव सोनवणे | – | सदस्य |
| श्री. दिलीप पंडितराव निकम | – | सदस्य |
| श्री. नंदकिशोर मधुकर सोनवणे | – | सदस्य |
| श्री. यशवंत गणपत कापडणीस | – | सदस्य |
| श्री. विजय जिभाऊ सोनवणे | – | सदस्य |
| श्री. किशोर रामदास कदम | – | सदस्य |
| श्री. सतिष रामराव सोनवणे | – | सदस्य |
| श्री. दिनेश काळू सोनवणे | – | सदस्य |
| श्री. सुभाष निंबा बिरारी | – | सदस्य |
| श्री. सुनिल बळीराम सोनवणे | – | सदस्य |
| श्री. ॲड. वसंत भिकाजी सोनवणे | – | सदस्य |
| श्री. भास्कर जिभाऊ शेवाळे | – | सदस्य |
| श्री. कैलास हरी येवला | – | सदस्य |
| डॉ. मनोहर सुकदेव सोनवणे | – | सदस्य |
| श्री. केशव शंकर मांडवडे | – | सदस्य |
| श्री. कैलास नागू देवरे | – | सदस्य |
| डॉ. अमरनाथ पवार | – | सदस्य |
| श्री. सुभाष तुळशीराम सोनवणे | – | सदस्य |
| श्री. राकेश तानाजी सोनवणे | – | सदस्य |
| प्राचार्य डॉ. दिलीप माधवराव धोंडगे | – | सचिव |
| श्रीमती. अलका रामदास निकम | – | शि. प्रतिनिधी |
| श्री. अशोक मुरलीधर पाटील | – | शि. प्रतिनिधी |
| श्री. प्रकाश रामचंद्र पवार | – | शि. प्रतिनिधी |
| श्री. सुभाष शांताराम काकडे | – | का. प्रतिनिधी |

## एच.एस.सी. व्होकेशनल अभ्यासक्रम (MCVC) महाविद्यालय

## * स्थानिक व्यवस्थापन समिती *

### सन २०१७ ते २०२२

| | | |
|---|---|---|
| श्री. पांडुरंग काशिनाथ सोनवणे | – | अध्यक्ष |
| श्री. जिभाऊ खंडू सोनवणे | – | सदस्य |
| श्री. बबनराव दौलतराव भामरे | – | सदस्य |
| श्री. बाळासाहेब भिमराव सोनवणे | – | सदस्य |
| श्री. माधवराव बळीराम सोनवणे | – | सदस्य |
| श्री. विलास मुरलीधर देवरे | – | सदस्य |
| श्री. अविनाश विठ्ठलराव कापडणीस | – | सदस्य |
| श्री. बाळासाहेब सुकदेव सोनवणे | – | सदस्य |
| श्री. खंडेराव उखाजी सोनवणे | – | सदस्य |
| श्री. वसंतराव श्रावण देवरे | – | सदस्य |
| श्री. हेमंत गमण अहिरे | – | सदस्य |
| श्री. ॲड. चंद्रशेखर नरेश पवार | – | सदस्य |
| श्री. नितीन दामोदर मगर | – | सदस्य |
| श्री. अनिल निंबा दळवी | – | सदस्य |
| श्री. शशिकांत दत्तात्रेय कापडणीस | – | सदस्य |
| श्री. राजेंद्र पंडित पवार | – | सदस्य |
| प्राचार्य डॉ. दिलीप माधवराव धोंडगे | – | सचिव |
| श्री. सुनिल उत्तम बागुल | – | शि. प्रतिनिधी |
| श्री. अशोक नानाजी बिरारी | – | का. प्रतिनिधी |

# भावपूर्ण श्रद्धांजली !

या शैक्षणिक वर्षात

थोर विचारवंत, राजकीय नेते,

समाजसेवक, शास्त्रज्ञ,

साहित्यिक, अभिनेते, प्राध्यापक, सेवक,

सेवकांचे नातेवाईक,

यांच्या दु:खद निधनाने

आम्ही व्यथित आहोत.

प्राचार्य, प्राध्यापक,

विद्यार्थी, कर्मचारी वृंद

या दु:खात

सहभागी आहोत.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास

चिरशांती देवो !



प्राचार्य

विभाग प्रमुख

सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

# • अनुक्रमणिका •


| अ.नं. | लेख-शीर्षक | लेखक | पान नं. |
|---|---|---|---|
| १) | प्राचार्यांचे मनोगत | डॉ. पी.ई.पाटील | १० |
| २) | संपादकीय मनोगत | प्रा.डॉ.दीपा दत्तात्रय कुचेकर | १२ |
| ३) | तमाशा:एक क्रांतिकारी लोककला | प्रा.नानासाहेब निकम | १३ |
| ४) | गोरबंजारा समाजाची आभुषणे आणि हस्तकला | डॉ.सुदाम राठोड | १५ |
| ५) | भूईशास्त्रातील आदिम मातृसत्ताक संस्कृतीच्या अस्पष्ट खुणा | डॉ.कैलास सलाद | १९ |
| ६) | आदिशक्ती महोत्सव:बोहाडा | प्रा.एस.एस.हरिश्चंद्रे | २३ |
| ७) | लोककला:समाज आणि संस्कृती | प्रा.सोनल इचाळे | २६ |
| ८) | लोककला, साहित्य व संस्कृती | प्रा.सोनाली गोसावी | २८ |
| ९) | लोककला व लोकसंस्कृती | श्रीमती ठुबे एम.एल. | ३१ |
| १०) | माझी देवनागरी | खैरनार तेजस्विनी दिनकर (एफ.वाय.बी.कॉम) | ३४ |
| ११) | इतिहास बागलाणच्या देवमामलेदारांचा | सोनवणे यामिनी योगेश (एफ.वाय.बी.कॉम) | ३६ |
| १२ | बागलाणचा भूगोल | पवार रोहिणी भाऊसिंग (टी.वाय.बी.ए) | ३८ |
| १३) | महाराष्ट्र की लोककला | पवार रोहिणी | ४० |
| १४) | गोंधळ:संस्कृती और कला का सुंदर रूप | डॉ.दिपा कुचेकर | ४२ |
| १५) | बहुरूपी:एक लोककला | अनिस पटेल | ४३ |
| १६) | बागलाण:समाज आणि संस्कृती | छाया वनासी पगारे | ४५ |
| १७) | गीत देवा तुच यशवंत | तेजस मुळे | ४९ |
| १८) | जगण्याचा काय अर्थ | मयुरी जाधव | ५० |
| १९) | रथ निघाला | महेश मोहन पाटील | ५० |
| २०) | बागलाणची खाद्य संस्कृती | साक्षी सर्जेराव ठाकरे | ५१ |
| २१) | बागलाणची भाषाशैली | जितेंद्र सर्जेराव ठाकरे | ५३ |

## अहवाल विभाग



| | | | |
|---|---|---|---|
| १) | मराठी | | ५६ |
| २) | हिंदी | | ५७ |
| ३) | इंग्रजी | | ५८ |
| ४) | इतिहास | | ५९ |
| ५) | भूगोल | | ६१ |
| ६) | राज्यशास्त्र | | ६३ |
| ७) | अर्थशास्त्र | | ६४ |
| ८) | बी.बी.ए | | ६५ |
| ९) | रसायनशास्त्र | | ६६ |
| १०) | पदार्थ विज्ञान | | ६६ |
| ११) | भौतिकशास्त्र | | ६७ |
| १२) | संगणकशास्त्र | | ६८ |
| १३) | वनस्पतीशास्त्र | | ६८ |
| १४) | प्राणीशास्त्र | | ६९ |
| १५) | इलेक्ट्रॉनिक्स् | | ६९ |
| १६) | गणित विभाग | | ७० |
| १७) | उच्चमाध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रम | | ७१ |
| १८) | ग्रंथालय अहवाल | | ७२ |
| १९) | संगीत विभाग | | ७२ |
| २०) | जिमखाना विभाग | | ७२ |
| २१) | विद्यार्थी विकास मंडळ | | ७४ |
| २२) | राष्ट्रीय सेवा योजना | | ७५ |
| २३) | राष्ट्रीय छात्र सेना | | ७६ |

# प्राचार्यांचे मनोगत.....

**प्राचार्य डॉ. पी.ई.पाटील**

२०२०-२१ हे वर्ष जागतिक महामारीचे भयंकर रुप दाखवणारे ठरले. या कालखंडात माणुस सुरक्षित कसा राहील? परिवार आजारपणापासून कसा दूर ठेवता येईल? आजारी असतील तर बरं कसे करता येइल? अशा अनेक प्रश्नांनी घेरले होते. माणसाचा जीवन-मरणाचा प्रश्न तीव्र स्वरूपाचा होता. अशा परिस्थितीत महाविद्यालयीन कामकाज सुरूवातीच्या काळात नेहमी प्रमाणे सुरू होते. नंतर ऑनलाईन पद्धतीचा वापर करून शिक्षणाचे कामकाज सुरू होते.

महाविद्यालयाचे दैवत विद्यार्थी असल्याने आणि ज्ञानदान ही उपासना असल्याकारणाने त्यात खंड पडू न देता सातत्याने अध्यापण, मूल्यमापन सुरू ठेवले परंतु ज्या काही उपक्रमांची रेलचेल महाविद्यालयात होत असे त्या सर्वांमध्ये खंड पडला. वेगवेगळ्या स्पर्धा, उपक्रम, अतिथी व्याख्यान, स्नेह संमेलन सगळे काही विद्यार्थ्यांच्या उपस्थिती अभावी शक्य होऊ शकले नाही.

महामारीची तीव्रता, तिची झळ महाविद्यालयासही पोहचली. उत्कृष्ट, विद्याविभूषित, उच्चशिक्षित प्राध्यापक, सेवक, विद्यार्थी, त्यांचे पालक इत्यादी गमवावे लागले. महाविद्यालयाचा प्राचार्य या नात्याने आम्ही सर्व अर्थात मराठा विद्या प्रसारक समाज संस्था म्हणजे आमचा परिवार त्यांच्या दु:खात सहभागी आहे.

या सर्व घडामोडीमध्ये महाविद्यालयातील सृजन स्रोत अर्थात आमचे 'यशवंत' वार्षिक नियतकालिक खंडीत होऊ नये. यांचे प्रकाशन दरवर्षीप्रमाणे व्हावे. कोवीड काळातील अंक तयार करावा. ठरविलेला विषय घेऊन अंक पूर्ण करावा या उद्देशाने हा अंक उपलब्ध सामग्री नुसार आपणा समोर ठेवत आहोत. फारसे उपक्रम, स्पर्धा, व्याख्याने आदि न झाल्यामुळे काही उणिवा भासत असतानाही नियतकालिकाचे सातत्य टिकविण्यासाठी मागील दोन वर्षाचा मिळून एक अंक आपणासाठी काढत आहोत.

प्राचार्य या नात्याने मी अपेक्षा व्यक्त करतो की, या पुढील 'यशवंत' या वार्षिक नियतकालिकाचा अंक विद्यार्थी, प्राध्यापक आपल्या सृजन कौशल्यातून साकारतील. धन्यवाद!

***

# संपादकीय ....

**डॉ.दीपा दत्तात्रय कुचेकर (हिंदी विभाग प्रमुख)**

महाविद्यालय का वार्षिक नियतकालिक सभी के लिए सृजन प्रस्तुतिकरण, प्रसारण, और अभिव्यक्ति का खुला मंच इस दृष्टि से महत्वपूर्ण होता हैं । महाविद्यालय केवल शिक्षा दीक्षा के केंद्र न होकर विद्यार्थियों के व्यक्तित्व निर्माण के केंद्र हैं। एक अच्छे व्यक्ति का निर्माण अच्छे राष्ट्र की प्राथमिकता हैं । इन उद्देश्यों से शिक्षा का बदलता रूप हम देख रहे हैं । व्यवसाय को प्रधानता देने के उद्देश्य से अध्यापनों में, पाठ्यक्रमों में बदलावकर सामाजिक, आर्थिक विकास की और ध्यान दिया जा रहा हैं ।

वर्तमान समय अनेक समस्याओं को जन्म दे रहा हैं उसे विकसित होते देख उसपर उपाय योजना भि हो हो रहीं है। ऐसे हालत में शारीरिक एवं मानसिक दृष्टिकोण से मजबूत व्यक्तिमत्व विकास की अनिवार्यता महसूस रही है इन सारी चीजों का बुनियादी रूप में पाठशाला, महाविद्यालय, विश्वविद्यालय, विभिन्न संस्थाएं आदि कार्यरत नजर आ रहे हैं। महाविद्यालयीन शिक्षा में इन सभी का समावेश अवश्यभावी हैं। विद्यार्थियों को सक्षम बनाया जा रहा हैं। उनके आतंरिक गुणों को निखारने के लिए उन्हें वर्त्तमान सामाजिक परिवेश से जुंजने के लिए तैयार किया जा रहा हैं यह गठन आतंरिक निर्माण के तहत हो रहा हैं इसके लिए महत्वपूर्ण होते हैं शिक्षा के साथ साथ अन्य उपक्रम खेल कूद से लेकर सृजन प्रक्रिया के स्त्रोत, अतिथि व्याख्यान, वक्तृत्व स्पर्धा, लेखन स्पर्धा, अनुवाद, फिल्मांकन मार्गदर्शन पर कार्यशाला, स्नेह सम्मेलन आदि।

इन सभी से समृद्ध होता हैं विद्यार्थी और विकसित होता हैं नवनिर्माण, भाव भावनाओं की गुणात्मक अभिव्यक्ति इसका रूप निखारता है महाविद्यालयीन भित्तिपत्रक, फलक लेखन और वार्षिकी अंक जो लेखन कौशल्य का साकार रूप हैं सटाणा महाविद्यालय के छात्रनियमित रूप में इन कार्यो से जुड़े हैं। तीनों भाषाएँ मिलकर ‘परिमल’ नामक भित्ति फलक निकला जाता हैं हिंदी विभाग की ओर से नियमित रूप में कबीर, तुलसी, रहीम आदि के दोहे फलक लेखन के रूप में अभिव्यक्त होते है ।

इन सब के साथ महत्वपूर्ण है महाविद्यालय का ‘यशवंत’ वार्षिक नियतकालिक जो अपना एक अनोखा स्थान रखता हैं ‘यशवंत’ की अपनी अलग परम्परा एवं पहचान हैं। अनेक विषयों को लेकर इस के विशेषांक प्रकाशित हुए है इन में बागलाण तालुका ‘शिक्षण’, वाचन संस्कृति, रस्त्यावरचे व्यावसायिक, तात्यासाहेब, वि. वा. शिरवाडकर जन्मशताब्दी विशेषांक, भाषांतर मीमांसा, माझं गाव आदि हैं ।

इस परम्परा को बर्करार रखते हुए यह तय हुआ की लोककला विषय के अंतर्गत ‘लोककला साहित्य आणि संस्कृति’ इस विषय पर सृजन कार्य हो इस उद्देश्य से कार्यारंभ हुआ लेकिन जागतिक आपदा कोविड १९ ने हा हा कारमचाया महामारी की दूसरी लहर में इंसानों के पेरोंतले की जमीन खिसक गयी कई परिवार टूटकर बिखर गए ती कई शेष हुए इन हालातों के चलते महाविद्यालय का कारोबार आभासी माध्यम से चलता रहा। जिनके लिए सारी गतिविधिया चलती है वह सारी के सारी थम सी गयी। छात्रों के अभाव में पाठ्यक्रम पूर्ति, अंतर्गत मूल्यांकन, सत्रांत मूल्यांकन, वार्षिकी आदि पर असर हुआ। इन से थोडा बहुत संभाले नहीं ती शुरू हुई थी। बसवालों की हड़ताल,

महाविद्यालय के छात्रों की संख्या, आँचलिक क्षेत्र की होने से वे महाविद्यालय में आने में असमर्थ पारिवारिक, आर्थिक विपदाओं से घिरा छात्र हालातों से जुंज रहा हैं। उसकी मानसिकता शैक्षिक स्थितियों के लिए बदल गयी है। यह हालात आजतक सुधरे नहीं शैक्षिक कार्यकाल बादल गया हैं।।

इन सारी उत्पन्न परिस्थितियों में भी 'यशवंत' का वार्षिक प्रकाशन करना क्रमप्राप्त है। इस की परम्परा अखंड रखने के लिए २०२०-२१ और २०२१-२२ का संयुक्ताक निकालने का निर्णय मा. प्रधानाचार्य डॉ. कृ. न. गायकवाड जी के साथ हुई सह विचार सभा में लिया गया। इस रूप में यह यशवंत का अंक आपके हाथों में सौप रहे है। इसे पूर्णत्व देने में महाविद्यालय के सभी सहकर्मियों का सहयोग प्राप्त हुआ उन्हीं के सहयोग से यह लोककला, साहित्य एवं संस्कृति संयुक्ताक यथाशक्ति पूर्ण करने का प्रयास किया हैं । इस अंक के विषय चयन में मा. प्रधानाचार्य विद्यावाचस्पति दिलीप धोंडगे जी का अनमोल मार्गदर्शन रहा है। उनके पश्चात इस अंक के लिए मा. प्रधानाचार्य विद्यावाचस्पति कृ. न. गायकवाड जी का मार्गदर्शन महत्वपूर्ण है । इस की पूर्ति हेतु संपादक मंडल के सभी सदस्य डॉ. एस. पी. कांबळे, प्रा. एस. व्ही. घरटे, प्रा. एस. सी. कुरकुटे, डॉ. सुदाम राठौड़, प्रा. एन. निकम, डॉ. वैशाली बागुल, प्रा. विलास पवार आदि के सहयोग से यह संपादन कार्य पूर्ण हो सका है। कोविड १९ के बिघडे हालात में भी अंक प्रकाशित हो रहा है इस उपलब्धि का श्रेय मविप्र मुद्रण कार्य करनेवाले सभी सहयोगीयों को जाता है हम उनके प्रति आभार ज्ञापित करते है । इस कार्य में जिन व्यक्तियों, घटकों का अनमोल साथ रहा है उन सभी के प्रति कृतज्ञता व्यक्त करते है।

'यशवंत' वार्षिक नियतकालिक का कार्य करते समय जाने-अनजाने कुछ रह गया हो, कुछ गलतियाँ रहीं हो उसके लिए क्षमा चाहेंगे जो कमी रहीं होगी वह हमारी होगी जो पूर्णत्व है उसका श्रेय आप सभी का .

सस्नेह धन्यवाद !

***

# तमाशा : एक कांतिकारी लोककला

- **नानासाहेब निकम** (मराठी विभाग)

लोककला हा आपल्या संस्कृतीचा एक अनमोल ठेवा आहे. प्राचीन काळापासून लोककलेचा प्रवाह अखंडपणे प्रवाहित राहिलेला आहे. लोककलेची जडणघडण वेदपूर्वकाळ, वेदकाळ, रामायण, महाभारत, पुराणकाळ, इतिहासकाळ व मध्ययुगीन काळात होत आलेली आहे. त्यानंतरच्या काळातही लोककलेची जडणघडण व प्रचलन राहिलेले आढळते.

तमाशा ही महाराष्ट्राची लोककला आहे. लावणीच्या ठसक्यावर व घुंगराच्या बेधुंद तालावर प्रत्येक मराठी मनाला डोलायला लावणारी ही कला गेली चार शतके मराठी मनाचे रंजन करते आहे. शाहीर रामजोशी, शाहीर पठ्ठेबापूराव, दत्तोबा तांबे, विठाबाई ते अगदी सुरेखा पुणेकर यांच्यापर्यंतच्या अनेक तमाशा कलावंतांनी आपआपल्या काळात लोककलेला योगदान दिले. पठ्ठेबापूरावांच्या लावण्या आजही तेवढ्याच ताज्या वाटतात. म्हणून या कलावंतांना आणि त्यांच्या काव्य प्रतिभेला मानाने सलाम करावासा वाटतो. पवळासारखी रूपवान स्त्री आजपर्यंत स्मरणात राहते. सुरेखा पुणेकर केवळ तमाशा सम्राज्ञी बनते आणि रघुवीर खेडकर सारखा अवलिया त्याला पूर्ण व्यावसायिक रूप देतो. हे सारे पाहिले की कला म्हणून तमाशाचे मूल्य किती मोठे आहे याची साक्ष पटते.

आजच्या बदलत्या सामाजिक संदर्भात या कलेकडे पाहिले तर अठरापगड जातींनी उभी केलेली ही कला कोणतीही जात व धर्म न मानता कलावंत म्हणून समतेचा धर्म पाळते. म्हणून तमाशा हे खऱ्या अर्थाने सामाजिक समतेचे प्रभावी माध्यम आहे. तमाशा ही दलित उपेक्षित जातींनी विकसित केलेली कला आहे, हे जसे एका बाजूला सत्य आहे तसेच समाजातील सत्ताधारी आणि इतर सवर्ण जातींनी या कलेला आश्रय देऊन विकसित केले हेही वास्तव आहे. समाजातील सर्व जाती धर्मांची माणसे एका रंगमंचावर आणण्याचे क्रांतीकारी काम तमाशाने केले आहे.

महाराष्ट्र ही संत विचारांची व कृषीची भूमी आहे. इथला शेतकरी, कष्टकरी या भूमीचा पाईक आहे. अशा भूमीत गावगाड्यात राहणाऱ्या प्रत्येक ग्रामीण माणसांचे गेली कित्येक वर्ष तमाशा रंजन करतो आहे. जसा ज्ञानोबा-तुकोबाचा नामगजर आजही प्रत्येकाच्या ओठी आहे,तसाच तमाशा हाही प्रत्येकाच्या जगण्याचा अविभाज्य भाग बनलेला आहे. महाराष्ट्राच्या कोणत्याही खेड्यात गेलात तर तमाशा माहित नसलेला माणूस मिळणे अशक्य आहे. म्हणूनच तमाशा ही तमाम बहुजनांच्या अभिव्यक्तीची सर्वात लोकप्रिय अशी लोककला आहे. असे आपल्याला अभिमानाने म्हणता येते.

मराठी शब्दकोशात तमाशा या शब्दाचे गंमत, मौज, खेळ, मनोरंजन दृश्य असे वेगवेगळे अर्थ आहे. तो पार्शीतून मराठीत आला आहे. पार्शी नाव मिळाले असले तरी कला म्हणून तमाशा अस्सल मराठी आहे. याचे कारण असे की, मुस्लिम राजवटीच्या अगोदरही महाराष्ट्रात विविध लोककलांच्या रूपाने तमाशा अस्तित्वात होता हे नाकारता येत नाही. हजारो वर्षापासून महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या जागरण, गोंधळ, भारूड, लळिते आणि दशावतार यासारख्या विधिनाट्यांच्या संस्कारातून तमाशाने आकार घेतला आहे. म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृतीत

प्रचलित असलेल्या अनेक लोककलांच्या संस्कारातून तमाशा कला साकारली आहे. प्रसिद्ध विचारवंत एरिक फ्रॉम यांनी सामूहिक कलेविषयी मांडलेले विचार लक्षात घेतले तर लोककला या कशा सामूहिक कला आहेत आणि त्यातून आपल्या धर्माचे, रूढींचे परंपरेचे आणि संस्कृतीचे कसे दर्शन होते याविषयी निश्चित माहिती मिळते.

लोककला समूहाचे भान जपते. ती सामूहिक असते. ती व्यक्तिवादी व छंद म्हणून करावयाची गोष्ट नाही तर ती आपल्या जगण्याचा एक अविभाज्य भाग असते. लोककलेचा संबंध माणसाच्या मूलभूत गरजेशी असतो ती गरज पूर्ण झाली नाही तर माणूस असुरक्षित आणि असमाधानी होतो. त्यामुळे ती गरज पूर्ण होणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील तमाम बहुजनांचे जगणे अभिव्यक्त करण्याचे काम तमाशा करत आहे. या लोककला जसजशा नामशेष होतील तसतसा मराठी माणूस असुरक्षित आणि बैचेन होईल. कारण साऱ्या लोककला त्याच्या जगण्याचाच एक भाग आहेत. म्हणून तमाशा कलेला पुनरूज्जीवन देऊन त्याची नवी सांस्कृतिक मांडणी करण्याची ही वेळ आहे. या कामी शासन, अभ्यासक, कलावंत आणि रसिक या साऱ्यांनी एकत्र येऊन गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

अनेक वर्ष मराठी मनाला मोहिनी घालणाऱ्या या मराठमोळ्या लोककलेपुढे आज वेगवेगळी आव्हाने उभी आहेत ती आव्हाने जशी सांस्कृतिक आणि आर्थिक आहेत तशीच ती राजकीय व व्यक्तिगतही आहेत. चित्रपट दूरदर्शन आणि शहरातील उच्चभ्रूंच्या सांस्कृतिक उत्सवातील धिंगाणा आपण पाहतच आहोत. तमाशा यातून कसा सुटेल? कारण खेड्यांचे शहरीकरण झाले. अभिरूची बदलली. या बदलत्या अभिरूचीचा परिणाम तमाशावर झाला. नाटक आणि चित्रपटाच्या अनुकरणातून तमाशाचा ऑर्केस्ट्रा कधी झाला हे कळलेही नाही. वाढत्या व्यावसायिक स्पर्धेत गल्लाभरू वृत्तीमुळे तमाशाचे मालक व कलावंतही आपल्या परंपरेला विसरले. तमाशा हा केवळ आंबटशौकीनांचे केंद्र बनू लागला. आज आपण उच्चभ्रु मंडळी तमाशाला अश्लील संबोधून नाके मोडू लागलो आणि तमाशा कलावंतही केवळ उपजीवीकेचे साधन म्हणून त्याकडे पाहू लागले पारंपारिक तमाशा आज नाहीसा होत चालला आहे. कोविड-१९ महामारीचा परिणाम इतर व्यवसायासोबत तमाशावरही झाला. तमाशा मालक कर्जबाजारी झाले. कलावंत सावकारी पाशात अडकले, फड चालवणे दिवसेंदिवस कठीण होऊ लागले. तमाशाचे मायबाप रसिकही त्याकडे कला म्हणून पाहिनासे झाले.

या सर्व गोष्टींचा विचार करून तमाशा सुधारण्याचे एक नवे प्रारूप तयार करावे लागेल. यासाठी अभ्यासक कलावंत, रसिक, काही सेवाभावी संस्था यांच्या मदतीने शासन काही मूलभूत उपक्रम राबविले तर आजच्या तमाशाला आधुनिक वळण देऊन तो परिवर्तनशील करणे अधिक सोपे होईल. पाठीचा कणा मोडलेला, नाडलेला, पीडलेला, वंचित, दलित, उपेक्षित माणूस लोककलांच्या रूपाने समाजासमोर येतो. त्यातून समाजाचे प्रबोधनही होते व सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तनही होते. त्या परिवर्तनासाठी ही कला जीवंत ठेवायला हवी.

संदर्भ: लोकसाहित्य दर्शन- संपादक डॉ. रमेश देवरे
तमाशा कला व कलावंत-डॉ. मिलिंद कसबे

***

# गोरबंजारा समाजाची आभूषणे आणि हस्तकला

– **प्रा. सुदाम राठोड** (मराठी विभाग)

गोरबंजारा समाजाची आभूषणे आणि हस्तकला गोर बंजारा हा भटका समाज असून भारतभर विविध नावांनी ओळखला जातो. हा समाज नागर समाजापासून अलिप्त असल्याने स्वतःची एक स्वतंत्र संस्कृती विकसित केलेली आहे. हा समाज विशिष्ट अलंकार पद्धतीमुळे प्रस्थापित समाजापासून वेगळा वाटतो. सोबतच विविध प्रकारच्या कला या समाजाने जोपासल्या आहेत. गोरमाटी समाजात अलंकारांना विशेष महत्व आहे. बंजारा स्त्री व पुरुष दोघे अलंकारांचे भोक्ते आहेत. स्त्रियांच्या अंगावर तर किमान पाच सहा किलो वजनाचे अलंकार असतात. अविवाहित मुली आणि विधवा स्त्रियांचे दागिने वेगळे असतात. मात्र त्याचे प्रमाण कमी असते. विवाहित स्त्रिया जे दागिने घालतात ते पुढील प्रमाणे आहे.

. घुगरी
. वाकडी
. मुढीया
. कानात कन्या
. बिंदीवाणी
. तरोटी
. केसात गुंफण
. गालावर दोन्ही बाजूंनी टोपली घुगरी
. गळ्यात हासली
. गोपहार
. साखळी
. मुंगारहार
. रपिया हार
. कान खोरा
. चापवा
. हातात हस्तीदंती बांगड्या
. चुडी
. बेगड
. कासोट्या
. दंडात मुटीया
. बोलू
. बोटात फुल्यार विटी
. पायात वाकडी
. पायकस
. पायातील बोटात माचळी
. चटकी
. अंगतुला
. कोपऱ्या
. घुंगराळी जोडी
. टोपली
. बामट्या
. नाकात भुरिया
. कानात कुडक्या
. भांग
. आटी
. गोंडे
. चोटला
. चांदीचे किंवा खैराच्या लाकडाची शिंगे

ही सगळी आभूषणे बंजारा स्त्रिया वापरतात. हे अलंकार म्हणजे तिचा श्वासच. त्याशिवाय ती जगू शकत नाही. या संदर्भात डॉ. शर्मा म्हणतात, बंजारण वखो के भाती आभूषणो के मामले मे भी विशेष रुची रखती है। व्यवस्थित समाज कि स्त्रिया अधिकांश अभूषणो को विशेष अवसरों पर धारण करती है। परंतु बंजारण अपने अलंकारों को अपने देह से अलग करना नही चाहती अलंकारात बंजारा स्त्रीच्या प्रतिष्ठेचा किंवा तिच्या अस्तित्वाचा हिस्सा समजतात. बंजारा स्त्रीचे सौंदर्य या दागिन्यात लपलेले असते.

बंजारा पुरुष देखील दागिने वापरतात. पुरुषांचे दागिने खालील प्रमाणे आहे

. हातात कल्डा

. कंबरेला चांदीची साखळी

. कानात मिरकी

. सोन्याच्या काड्या

. डाव्या पायात सोन्याचा तोडा

. चांदीची बेडी

. गळ्यात ताईत

अशा प्रकारची आभूषणे बंजारा पुरुष वापरताना दिसतात.

**गोर बंजारा समाजाची हस्तकला**

बंजारा समाजातील वस्त्रे व दागिने स्वतः तेच बनवतात. विशेषतः बंजारा स्त्री हस्तकलेत निपुण असते. ही कला परंपरेने चालत आलेली आहे. अलीकडे नव्या पिढीतील मुलींना हे हस्तकाम जमत नाही पण जुन्या पिढीतील कैक स्त्रिया आज विणकाम व भरतकाम करताना दिसतात. बंजारा स्त्री एक साधासा छिटाचा कपडा घेऊन साध्या सुईने रंगीबेरंगी दोरा घेऊन टाके घालतात. त्यातून आकर्षक रंगी बेरंगी कपडे, वस्तू व कलाकृती तयार करतात.

**. बाकीया :-**

बाकीया हा शिवणकलेत अत्यंत महत्वाचा प्रकार आहे. हा एक टाक्याचा प्रकार आहे. त्याला टाक्याचा राजा असेही म्हणतात. बाकीया हा मूळ शब्द पारसी भाषेतला असून त्याचा अर्थ नाजूक जोडीने कमी अशी घट्ट शिलाई असा होतो.

हा काशिद्यातील महत्वाचा घटक असतो. या टाक्याचा उपयोग बंजारा स्त्री कापड जोडण्यासाठी करते. हे टाके अत्यंत नाजूक व सुंदर असतात. कापडाच्या किनारी सरळ रेषेत हा कशिदा काढला जातो. त्यामुळे बाकीया खूपच सुंदर दिसतो.

**. कशिदो :-**

हाही एक प्रकारचा टाका आहे. या टाक्याचा वापर बंजारा स्त्री कशिदाकारी व अन्य ठिकाणीही करत असते. या कला प्रकारात कलेणी, बाळी कलेणी, दोन रंगांच्या धाग्याच्या रंगसंगतीतून एक नवाच धागा तयार होतो त्याला बाळी कलेणी म्हणतात. एक टांगी कलेणी नावाचा टाका घुंगटोच्या पट्टीवर घालतात. वळटी कलेणी या टाक्याचा उपयोग गोटावर होतो. रेली नावाच्या टाक्याने नक्षीकाम केले जाते तर धनिया या टक्याने फुलीचा दुहेरी टाका घातला जातो. लाल किंवा पारव्या रंगाच्या कापडावर विविध कलाकृती तयार करून घुंगट, कसे जोडी, गरतनी, छेवट्या, खव्या, मंडाव, गाला, गलणो इ. बंजारा स्त्रिया स्वतः तयार करतात व शिवणकला जपतात.

**. वळटो टेको :-**

शिवणकलेत हा टाका महत्वाचा आहे. हा टाका घालण्यात बंजारा स्त्रिया कुशल आहेत. त्या स्वतःचे कपडे कशिदा

युक्त स्वहस्ताने बनवतात. त्यांना कोणत्याही नामवंत टेलरची गरज लागत नाही. या संदर्भात औरंगाबाद येथील काशीबाई रामराव पवार यांनी माहिती दिली कि दांडा, बकीया, फुली, सपारीरोटेको, बजोऱ्या टेको, आकडी टेको, नारळ टेको, माकीरो टेको, दांडेरो टेको, वेलेरो टेको, वळटे सळटे टेकारी फुली या टाक्यामुळे कपड्याला खूप सुंदर आकार येतो. पुरुषाची झुंडी, झोळणा, तंबाकू कोथळी इत्यादीवर हा टाका शोभून दिसतो

**. काचकाम:-**

काचकाम हे तसे फार कौशल्याचे काम आहे. पण गोर बंजारा स्त्रिया अतिशय कुशलतेने करतात. या संदर्भातील माहिती शेकुचा तांडा, जाटदेवळे, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर येथील पार्वतीबाई राठोड यांनी दिलेली आहे. बंजारा स्त्रियांचा पोशाख कशिदायुक्त, काच, कवड्या, शिशे, पारा, कथिल, मनी, लहान माणिक कटा, गोडे, चवली इ. वस्तू वापरून वैशिष्ट्यपूर्ण सजवलेला असतो. बंजारा स्त्रीचा पेहराव काचाशिवाय अधुराच आहे. ती काचकाम करताना ती काचाचे विविध प्रकार वापरत असते. काचामध्ये गोलकाच, मोठे काच, चौकोनी काच, त्रिकोणी काच असतात. पाठीमागे शीशेचा लेप असणारे काच ती विकत घेते आणि मग काचेला कपड्यामध्ये विणते. स्त्रीच्या पेहेरावर आणि कोथळो किंवा इतर काही वस्तूंवर ती काचकाम करते.

**. कोडी काम :-**

कवड्याचा उपयोग इतर समाजात धार्मिक विधींसाठी करतात. पण बंजारा समाजात मात्र या कवड्यांचा उपयोग सौंदर्याचे साधन म्हणून करतात. कवड्यांना फोडून मग विशिष्ट पद्धतीने विणले जातात. दंडात घालायचा दागिना म्हणजे कसोट्या बनवतात.तसेच काचळीला लावण्याचे खविया मंडावो, डोरी, फुलार डोर, सडक, आटी, बछड्या, झुंडी, कोथळो या वस्तूंना कवडी लावली जाते

**. फुंदाकाम:-**

कपड्याला व इतर शोभेच्या वस्तूला जे गोंडे लावले जातात त्याला फुंदाकाम म्हणतात. यासाठी रेशीम किंवा साधा दोरा वापरला जातो. या दोऱ्याने हवे तिथे गोंडे लावले जातात. शक्यतो हे गोंडे घुंगटोला लावले जातात. तसेच फेटियाला देखील काही ठिकाणी छोटे छोटे गोंडे लावले जातात. केसात घालण्याचा चोटला, घुगरी, पिणे, डोक्याच्या मागे लावलेली अटी, छेवट्या वगैरे साठी गोंडे लावतात. हे गोंडे रंगीबेरंगी असतात.

**. धडकी :-**

धडकी हा प्रकार पुरुष बनवतात. झोपण्यासाठी किंवा बैलाच्या पाठीवर बसण्यासाठी जो गादीसारखा प्रकार बनवला जातो त्याला धडकी म्हणतात. ती तागाच्या पाटीपासून बनवतात. धडकीवर बारीक सुतळीने विणलेले असते. त्यावर मग गादी भारतात. त्याला पुन्हा बारीक चरीने गुंफून छान नक्षीकाम केलेले असते व हे चर गेरूने रंगवलेले असते.

**. ओकरा :-**

हा ओकरा पुरुष बनवतात. ओकराचा उपयोग धडकीवर बसण्यासाठी व लग्न कार्यात देखील होतो. नवरदेव बाहेर काढल्यानंतर संध्याकाळी ओकरावर पूजापाठ ठेवतात. त्यावर पाच मुठ चुरमो ठेवतात व नवरदेवाला सुईने डाग देतात. ओकरा बनवण्याची एक पध्दत असते. तो ओकरा तागापासून बनवतात. त्याला चारही कोपर्याला कूट असतात. हे चारही कोपरे रंगवलेले असते. त्यामुळे ओकरा फार सुंदर दिसतो.

**. पठाड:–**

पठाड तागाच्या बारीक सुतापासून दोरीवजा दोन बोट रुंद असतो. ही याची रुंदी उतरती नुसार कमी कमी होते. याच्या डाव्या बाजूला हुक असते. त्यामुळे बैलाच्या पोटात खालून व्यवस्थितपणे हे बांधले जाते. यावरील धान्याची पोती ही सरक नाहीत. यासाठी याचा उपयोग होतो. हे पठाड पुरुष बनवतात.

**. गुणी : –**

ही गुणी म्हणजे गोणी तागाच्या धाग्या पासून बनवतात. गोणीला डाव्या व उजव्या बाजूने कूट असते. याला बारा ढेराचा सुत पोटासाठी पाच असे एकूण १५ ढेरा सूत आवश्यक असते व यातून हाताचा आड्या निघते. यासाठी साहित्य पाच पाच ढेराची एक एक चाप करावी लागते. ते स्वच्छ पाण्यात बुडवून ठेवावी लागते. सुत वाळल्यानंतर दोन धोडी लाकडामध्ये ओढण्यासाठी तीरकमठा लावला जातो. त्यामध्ये प्रत्येक दोरीच्या आड्याला बदल द्यावा लागतो. नंतर पाटी ताणली जाते. पाटी भरून सुतळी चागोळा भरून त्यावर शेराचा खांडव जोराने मारावा लागतो. अशा पाचवीपासून गोणी तयार होते. ही गुणी गेरूने रंगविले जाते. वधूला देण्यासाठी फार मोठ्या आवडीने वधूपिता गुणी तयार करतो. याचा उपयोग विवाहात वधू साहित्य भरून बैलावर लादून बैलाच्या पाठीवर उभारून हवेली करते.

**. टाबरो :–**

हा टाबरो पण गुणीपासून तयार करतात. हा गोणपाटाच्या पाटीपासून तयार करतात. त्याच्या तोंडाला दोरीने जोडले जाते. यालाच जाकण देणे असे म्हणतात. त्यात देवधर्माची कोथळी, सामान– सुमान टाकतात. टाबरो मध्ये ज्वारी किंवा धान्य भरले जात नाही. हे येथे विशेष होय. टाबरोच्या मध्यभागी लहान सुताने सुबक नक्षीकाम केलेले असते. त्याला गेरूने रंगवली जाते.

**. गोफण :–**

बंजारा समाज हा दऱ्याखोऱ्यात राहत असल्यामुळे हिंसक पशु पक्षी व वन्य प्राण्यापासून संरक्षण मिळावे याकरिता गोफण वापरतात. ही गोफण ते स्वतः तयार करतात. यासाठी तागाची दोरी आणि पळसाच्या पानाच्या काड्याचा याचा उपयोग करतात. त्यात लहान आकाराचा दगड घालून किमान तीनसे मीटरपर्यंत मारा करत जातो. या गोष्टी समोर दरोडेखोर पुढे येण्यास हिंमत करत नाही.

गोरबंजारा समाज हा भटका समाज आहे. शिवाय गावगाड्यापासून दूर जंगला पहाडात भटकणाऱ्या या समाजाची भौतिक संस्कृती ही नागर समाजापासून भिन्न आहे. तांड्याचा स्वतःचा स्वतंत्र गावगाडा आहे. गोरमाटी समाजाची भौतिक संस्कृती अनन्यसाधारण अशी आहे. हिंदू– मुस्लीम अशा अनेक सांस्कृतिक संकाराला ती सामोरे गेली आहे. त्यामुळे भौतिक संस्कृतीचा विचार करताना तांड्याचा गावगाडा, कौशल्याची कामे करणारा वर्ग तथा त्यांची आहार पद्धती व वेशभूषा यांचाही विचार करावा लागतो. त्याच प्रमाणे गोरमाटी समाजात प्रचलित विविध कलांचा शोध घेण्यात आला आहे. त्यात कामगार

वर्गाच्या कला व मनोरंजनात्मक कला अशा दोन्ही कलांचा विचार केलेला आहे.

***

# भुईशास्त्रातील आदिम मातृसत्ताक संस्कृतीच्या अस्पष्ट खुणा

– प्रा.डॉ.कैलास सलादे (मराठी विभाग)

शेतीचा लागलेला शोध हा मानवी संस्कृती स्थापनेतील प्रारंभ बिंदू होय.शेतीचा शोध हा स्त्रीने लावला याबद्दल सर्व अभ्यासक सहमत आहे.कृषीचा शोध स्त्रीने लावल्याने मानवी संस्कृतीच्या स्थापनेत तिचा मुख्य सहभाग स्पष्ट होतो. या संस्कृती प्रारंभावस्थेत संस्कृतीची प्रमुख म्हणून स्त्रीच होती. प्रारंभीच्या मातृसत्ताक कृषिसंस्कृतीत ''शिकार करणारा (hunter and food gatherer) पुरुष हा तिच्या आश्रयाने नांदत होता''[१]. प्रारंभ अवस्थेत स्त्रीला प्रतिष्ठा होती. कारण स्त्री आणि भूमी यांच्यातील गर्भधारणक्षमतेबद्दल मानव भांबावलेल्या अवस्थेत होता.स्त्रियांची ही सर्जनशीलता बघून स्त्रियांबद्दल त्याच्या मनात आदर आणि भीती या दोन्ही भावना निर्माण झाल्या असाव्या. कारण मातृसत्ताक कृषिसंस्कृतीमध्ये बऱ्याच कृषिदेवता ह्या स्त्रीरूपी होत्या. ''स्त्री हे विश्वनिर्मितीचे, सृजनाचे केंद्र आहे. उगमस्थान आहे. तिच्यात अलौकिक आणि विलक्षण यातुशक्ती आहे अशी त्यांची श्रद्धा होती''[२]. डॉ. रा.चिं.ढेरे एक निरीक्षण नोंदवतात की खननयष्टी(डीगिंग स्टीक) च्या साह्याने स्त्रीने शेतीला सुरुवात केली.या कालावधीत समाजजीवनात स्त्रीचे स्थान महत्वाचे होते. ''कारण अगदी प्राथमिक अवस्थेत उत्पादनाची शक्यताच नसल्याने श्रमविभागणीचा प्रश्नच निर्माण झालेला नसावा. पुरुषांकडे विशिष्ट असे काम नव्हते. स्त्रीकडे मात्र मुलांची जोपासना नैसर्गिक रीत्या असल्याने या श्रमाविभागणीला पूर्व प्राथमिक अवस्थेत स्त्रीचे स्थान अधिक महत्वाचे होते''[३]. ''लोकायत परंपरेने वामाचारात स्त्रीला प्राध्यान्य दिले होते.स्त्री हीच विश्वाची माता आहे असेही या परंपरेत मानले गेले''[४].संस्कृतीच्या निर्मितीत कृषीच्या शोधाचा वाटा महत्वाचा आहे. हा कृषीचा शोध सहजासहजी लागलेला शोध नाही.काळाच्या निरीक्षणातून आणि प्रयोगातून स्त्रियांनी प्राथमिक अवस्थेतील शेतीचा शोध लावून भटकंतीला कंटाळलेल्या मानवाला स्थिरता मिळवून दिली. म्हणून त्याकाळात समाजजीवनात ''स्त्रियांना उच्चपदस्थ भूमिका मिळाली असावी. एखाद्या गटाची व जमातीची संपत्ती नव्या पिढीच्या हातात देण्याचे काम स्त्रिया करीत असत.सर्व प्राचीन समाजामध्ये जो मातृदेवतांचा पंथ दिसतो.त्यातून स्त्रीची उच्चभूमिका दिसते''[५]. संस्कृती निर्माणात महत्वाचे योगदान देणाऱ्या स्त्रीचे नंतरच्या काळात अवमूल्यन झाले.संस्कृतीच्या प्रधानावस्थेकडून ती दुय्यम अवस्थेकडे फेकली गेली.स्त्रीचे हे अवमूल्यन ''सीमॉन द बूव्हार' एक मानवी जीवनातील, इतिहासातील पायरी व टप्पा समजतात''[६]. मुळात हे अवमूल्यन खननयष्टीच्या शेतीकडून नांगराने केल्या जाणाऱ्या कृषीकडे जी वाटचाल झाली तिच्यामुळे घडले असे रा.चिं.ढेरे मत नोंदवतात. नांगराकडे कृषीची जी वाटचाल झाली ''ती पुरुषसत्तेच्या प्रस्थापनेची नांदी ठरली.शेती (क्षेत्रासत्ता, क्षेत्रप्रतिष्ठा) संपून, तिच्या जागी कृषी (म्हणजे

कर्षसत्ता) स्थिरावली. जोवर खननयष्टीच्या साह्याने स्त्री करवी शेती होत होती. तोवर निसर्गाशी/सृष्टीशी आमौपम्यवृतीचा अनुभव घेतला जात होता.परंतु कर्षसत्तेत भूमी आणि तिच्याशी समरूपता साधणारी स्त्री केवळ भोगवस्तू बनली,भोगवासना बनली''७. नांगराच्या साह्याने शेतीला प्रारंभ झाला. या अवस्थेत स्त्री शारीरिक असमर्थतेमुळे नांगराच्या अधिक कष्टाच्या शेतीपासून दूर झाली.पुरुषाने कृषिव्यवस्था आपल्या हाती घेतली.मुळातील मातृप्रधान संस्कृती नष्ट होत गेली.आर्यांची पुरुषप्रधान संस्कृती सर्वत्र वर्चस्व निर्माणकर्ती झाली.मुळातील नैसर्गिक,आदिम अशी मातृसंस्कृती नष्ट होऊन नंतरच्या काळात स्त्री पुरुषाची गुलाम बनली.मनुस्मृतिने तिच्या अभिव्यक्तीचे,अविष्काराचे स्वतंत्र्य नाकारले.आणि तिचे अस्तित्व गौण ठरवले.

एके काळाची ही मातृप्रधान संस्कृती नष्ट झाली असली तरी कोणतीही संस्कृती ही पूर्णतः कधीच नष्ट होत नसते.तिच्यातील काही अवशेष हे नंतरच्या पिढ्यात अभौतिक संस्कृतीचे घटक म्हणून टिकून राहतात.आदिम मातृसंस्कृतीच्या अस्पष्ट खुणा या सजीवाशेष रूपाने लोकगीते,लोककथा,उखाणे,म्हणी,विधीविधानाच्या रूपाने साहित्यात टिकून राहतात. ''भारतामध्ये अगदी अलीकडेपर्यंत आसाममधील खासी जमातीमधील आणि त्रावणकोर कोचीन मधील नायर जमातीमध्ये मातृसत्ताक समाजपद्धती अस्तिवात होती''८. सातवाहन राजवटीतील राज्यकर्ते आपल्या नावाच्या अगोदर आईचे नाव लावत याकडे मातृसत्ताक संस्कृतीचा एक अवशेष म्हणून बघायला हवे.मराठी साहित्यामधून मातृसंस्कृतीच्या अस्पष्ट खुणा शोधता येतात.

ऐश्वर्य पाटेकर यांच्या 'भुईशास्त्र'(२०११) या काव्यसंग्रहातून आदिम अशा मातृसंस्कृतीच्या काही अस्पष्ट खुणा दिसून येतात.काव्यसंग्रहाच्या शीर्षकातच 'भुई' हा मातृप्रतिमेचा आदिबंध सांगणारा शब्द आहे.मुळात भूमी आणि स्त्री यांच्यातील एकरूपता हे मातृसत्ताक संस्कृतीचे एक महत्वाचे वैशिष्ट्ये होते. भूमी आणि स्त्री यांची एकरूपता माणसाच्या मनोविश्वात भूमीच्या सर्जनशीलतेचा आणि स्त्रीच्या सर्जनशीलतेचा अनुभव माणसाने परस्पर भाषेत मांडला आहे.कधी भूमीला स्त्री मानून तिच्यावर स्त्रीचे निसर्गधर्म आरोपित केले आहे.तर कधी स्त्रीला भूमी मानून तिच्यावर भूमीचे निसर्गधर्म आरोपित केले आहेत. पाटेकरांच्या भूईशास्त्र या काव्यसंग्रहातून 'स्त्री'चे,स्त्रीच्या भावजीवनाचे,समाज स्थानाचे आणि तिच्यावरील सांस्कृतिक वर्चस्वाचे अनेक रूपे व्यक्त झाली आहे. या संग्रहातील रूपांमध्ये 'माय' आणि 'भुई ' ह्या दोन रूपातील साध्यर्म्य वौशिष्ट्य पूर्ण आहे .ह्या कवितेतील स्त्री ही पुरुषप्रधान व्यवस्थेत दुय्यम स्थानावर फेकली गेलेली आहे.पुरुषीव्यवस्थेशी संघर्ष करणारी आणि आपली मातृसत्ताक जीवनपद्धती जपू बघणारी स्त्री या कवितेत आईच्या रूपाने जाणवते.मातृसत्ताक कृषिव्यवसायावर हळूहळू पुरुषांचे वर्चस्व प्रस्थापित होत गेले आणि स्त्रीच्या स्थानाचे अवमूल्यन होत गेले.ह्या गोष्टींचा संदर्भ पाटेकरांच्या मुंगीचिया विवरीया कवितेत जाणवतो. ''आईने पेरलं वावर/स्वतःच्या हातानं/उगवून आल्यावर म्हणाली/एवढा हिर्वा हिर्वा/हिर्वा हिस्सा माझा/माझ्या एकटीचा/नेमकी तितकंच/तेवढंच हिर्वं तिच्या भरताराच्या डोळ्यात खुपलं/

आईच्या हिर्व्या हिस्स्याचं जाळीत झालं..''[१०] हा संदर्भ स्त्रीच्या सामाजिक आणि सांस्कृतिक स्थित्यंतराचा आहे.मुळ मातृसत्ताक संस्कृती ज्या पुरुषी कावेबाजीतून नष्ट झाली तोच गनिमीकावा कवितेतील भ्ररताराकडून केला गेला आहे.आदिम मातृप्रधान संस्कृतीत स्त्रीच्या हातातून शेती ज्या पद्धतीने काढून घेतली व स्त्रीला दुय्यम स्थानावर आणले तो आदिम संस्कृतीतील सांस्कृतिक स्थित्यंतराचा संदर्भ संस्कृतीतिहासाची पुनरावृत्ती करतो.

मातृसत्ताक संस्कृतीमध्ये पुरुषाला फारसे महत्वाचे स्थान नव्हते.पित्याचा कुळाशी फारसा संबंध नव्हताच.आर्य संस्कृतीत मात्र 'पिता'हा सर्व कुटूंब व्यवस्थेचा प्रमुख आणि समाज व्यवस्थेत आदराचे स्थान प्राप्त झालेला होता.त्यामुळे ऐश्वर्य पाटेकर यांच्या कवितेतील वेगळ्याच बापाची प्रतिमा बघून ह्या प्रतिमेवर काहींनी आक्षेप नोंदवले आहे.आपल्या संस्कृती विचारात पाटेकरांनी चितारलेली बापाची प्रतिमा बसत नाही असे आक्षेपकर्त्यांचे म्हणणे होते.मात्र त्यांच्या कवितेतील बापाची प्रतिमा ही आदिम मातृसत्ताक संस्कृती सदर्भातून आलेली आहे.पुरुषाचा ''मातृसत्ताक समाजात पित्याच्या कुळाशी संबंध जवळ जवळ नसतोच. चिनी भाषेत कुळवाचक शब्दाचा अर्थ स्त्री पासून जन्मलेला असा होतो.अतिप्राचीन काळातील मातृसत्तकाचा हा अवशेष असावा. खासी टोळ्यांमध्ये from the women sprang the clan असा वाक्प्रचार आहे.मुलाचा वंश आईवरून ठरतो.पिता हा केवळ निमित्तकारण म्हणून जन्मदाता (begetter) होय,'स्त्रीला'भेट देणारा परका पाहुणा एवढेच त्याचे स्थान!''[११] पाटेकरांच्या कवितेतली बाप  प्रतिमाही या पेक्षा वेगळी नाही.म्हणून बापाची ओळख सांगताना कवी म्हणतो-''आईनं बोट दाखवलं तुझ्याकडे/म्हणून तुला बाप समजतो/बाकी काय खुणा आहे तुझ्या/तू माझा बाप असल्याच्या माझ्यात''[१२]. ही बापाची ओळख पुरुषप्रधान संस्कृती रक्षकांना खटकणारी आहे.मात्र कवीच्या भावविश्वात आदिम मातृसंस्कृतीच्या अस्पष्ट खुणा ह्या निमित्ताने स्पष्ट झाल्या आहे.

कवितेतील बापाच्या प्रतिमा पितृत्वआदिबंधाच्या विरोधाभासी आहे.पित्याचा किंवा बापाचा आदिबंध पाऊस,मार्गदर्शक,सावली या प्रतिमातून व्यक्त होतो.मात्र येथे बापाची प्रतिमा ''ठणक बेंबीच्या देठीला/मशागतीतून मागे राहिलेलं धसकट/खसकन खुपसलं पायात/हाच तो बाप,ज्यानं मोडला आईचा खोपा/छाकट्या छिनालगवश्या बाईसाठी''[१३]. मातृसंस्कृतीत कुटूंब व्यवस्थेची प्रमुख म्हणून स्त्रीच मुख्य होती.याचा संदर्भ भुईशास्त्रात दिसतो. ''पिकाच्या मधोमध पोहचलो/जगून राठ झालेल्या शरीराचं/भूरभूरलं जावळ/ह्याच त्या माझ्या चार बहिणी/ आईच्या जात्यापाळच्या वीतल्या चार गावच्या बारवा/ अन मी मधी जोंधळा हिरवा''[१४]. या लकगीत आणि संकेतांच्या जवळ जाणा-या कवितेत बापाचे स्थान मुळीच दिसत नाही.कारण बापानं ''गोमाशी झटकावी इतक्या सहजतेने/झटकून फेकलं नातं''[१५]. किंवा ''रानभर चरणारी चंद्रीगाय/संध्याकाळी माझ्याच गव्हाणीत आपसूक येऊन/ उभी राहते खुंट्याशी बिनदाव्याची/तू तर कधीच वळाला नाहीस/माझ्या घराकडं''[१६].

कवितेतल्या बाप प्रतिमेनं कधीच पितृत्व स्वीकारलं नाही. बाप म्हणून ज्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य असतात त्या त्याने कधीच पूर्ण केल्या नाही.

स्त्रीला भेट देणारा एक परका पाहूणा किंवा 'बिगेटर'या भूमिकेपलिकडे त कधीच गेला नाही. मातृसत्ताक पध्द्तीमध्ये पुरुष हा "In jawai he neither live not eats in his wise's house, but visites it only other dark"[१७] ह्या पुरताच मर्यादित राहिला. मातृसंस्कृतीत ''पुरुषाला स्त्रीच्या गर्भधारणेच्या प्रक्रीयेतील आपली ताकद आणि योगदान माहित नसल्याने तो तंत्र आणि यातू या दहमध्ये भांबवलेल्या अवस्थेत होता''[१८]. असे निरिक्षण विद्यूत भागवत यांनी नंदवलेले आहे.पाटेकरांच्या कवितेतील बापाच्या प्रतिमा ह्या संस्कृतीकक्षात न बसणाऱ्या अशा आढळून येतात. कारण मातृसंस्कृतीत ''पुरुषाला महत्वाचे स्थान नाही. स्त्रीच्या नात्यातील माणसांच्या दृष्टीने तो अगदी परकाच मानला जात.केवळ 'बिगेटर' या शब्दानेच ते त्याचा उल्लेख करतात.एकेकाळी अज्ञात असलेले निर्मिती क्रीयेतील पुरुषाचे स्थान ज्ञात झाल्यावर त्याला 'बिगेटर'हे स्थान तरी लाभले.परंतु व्यावहारिक जीवनात कुटूंबाच्या दृष्टीने त्याला मुळीच स्थान नसल्याने तो केवळ 'उदासिन' परका पाहूणाच राहिला''[१९].

'भुईशास्त्र' या ऍश्वर्य पाटेकर यांच्या संग्रहातील बापाची प्रतिमा यापेक्षा वेगळी नाही.या काव्यसंग्रहभर बापाची प्रतिमा नकारात्मक स्वरूपाची राहिली आहे.कारण 'भुईशास्त्र' ह्या संग्रहात आदिम मातृसत्ताक संस्कृतीच्या अस्पष्ट खुणा स्पष्ट झाल्या आहे.

**संदर्भ-**

१-ढेरे रामचंद्र चिंतामण,'श्री आनंदनायकी',पद्मागंधा प्रकाशन पुणे,प्रथम आवृत्ती,२००२,पृ.९४.

२-लोहीया शैला, 'भूमी आणि स्त्री', गोदावरी प्रकाशन औरंगाबाद,जुलै २०००,पृ.१७.

३-गाडगीळ स.रा., 'लोकायत',लोकवाङ्मय गृह प्रा.लि.मुंबई,व्दि.आ.१९९४ ,पृ.६८.

४-तत्रैव,पृ.२४.

५-विद्यूत भागवत, 'स्त्रीवादी सामाजिक विचार', डायमंड पब्लिकेशन पुणे, प्र.आ.२००८, पृ. १११.

६-तत्रैव,पृ.१११.

७-ढेरे रामचंद्र चिंतामण, उनि. पृ.९४.

८-गाडगीळ स.रा., उनि.पृ.७२.

९- ढेरे रामचंद्र चिंतामण, उनि.पृ.९३.

१०-पाटेकर ऍश्वर्य, 'भुईशास्त्र',शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्र. आ.२०११, पृ.४६.

११- गाडगीळ स.रा.,उनि.पृ.१३१.

१२- पाटेकर ऍश्वर्य, उनि.पृ.४९.

१३- तत्रैव,पृ.४१.

१४- तत्रैव,पृ.४२.

१५- तत्रैव,पृ.४९.

१६- तत्रैव,पृ.४९.

१७- गाडगीळ स.रा.,उनि.पृ.१३१.

१८- ढेरे रामचंद्र चिंतामण, उनि.पृ.१११.

१९- गाडगीळ स.रा.,उनि.पृ.१३१.

***

## आदिशक्ती महोत्सव : बोहाडा

– **प्रा. एस.एस.हरिश्चंद्रे** (सहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग)

माघ शुद्ध पंचमीपासून वसंताची चाहुल लागते. पानगळ थांबून, वृक्ष लतावेलींना कोवळी लुशलुशीत पोपटी, तांबूस पालवी फुटू लागते. आंब्याचा मोहोर, कडुलिंब, तोरणी, जांभळी, करवंदीच्या फुलांच्या घमघमाटाने सारे वन भरून जाते, दरवळते. धुंद, मुग्ध सुवास वातावरणात भरून जातो. आंबराईत, वनराईत झाडाच्या गर्द पालवीच्या आड दडून कोकिळा कुहूऽऽ कुहूऽऽ करीत तान घेऊ लागते... याच काळात ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात, विशेषत: जव्हार, मोखाडा या जनजाती बहुल लोकवस्ती असलेल्या तालुक्यातील खेड्यापाड्यात बोहाड्याची धमाल उडते.

'बोहाडा' म्हणजे श्री जगदंबेचा आदिशक्तीचा महोत्सव, 'बोहाडा' या शब्दाची व्युत्पत्ती शोधल्यावर 'बोहाडा' हा शब्द 'बाहणे' या शब्दावरून तयार झाला असावा असे वाटते. बाहणे म्हणजे बोलावणे, आवतण देणे स्तुती करणे असे अर्थ अभिप्रेत आहेत. वारली बोलीतील 'वाहारणे' हा शब्द हाक मारणे अशाच अर्थाने वापरला जातो. यावरून बोहाडा म्हणजे हाक मारणे, बोलावणे होय. या बोहाडा उत्सवात भक्तीभावाने, श्रद्धायुक्त अंत:करणाने विविध देवदेवतांना आशीर्वादासाठी गावाच्या पाड्याच्या अरिष्ट निवारणासाठी बोलावणे केले जाते.

या महोत्सवाला धुलिवंदनानंतर सुरूवात होते. मोखाडा या तालुक्यात या उत्सवाची सुरूवात धुलिवंदनापासून होते आणि सप्तमीला सांगता होते. मोखाड्यात या उत्सवाची समृद्ध परंपरा गेल्या ३०० वर्षांपासून असावी. मूळ जनजीवनातील वारली, महादेव कोळी समाजाने सुरू केलेलीही बोहाड्याची परंपरा पांढरपेशा व्यापारी वर्गाने अधिक समृद्ध केली आहे. ब्राह्मण, शिंपी, वंजारी, तेली आणि जनजातीतील वारली, महादेव कोळी या अशा जातीनिहाय घराण्यातील लोकांनी बोहाड्यात नाचवण्याच्या विविध देवतांची सोंगे आपसात वाटून घेतली. ती प्रथा त्या त्या घराण्यांनी आजही जपलेली आहे. फाल्गुन कृ. दशमीला करढण व कोगदे, ता. जव्हार, चैत्र पौर्णिमेला पोयशेत, ता. जव्हार वैशाख शु. ३ अक्षय तृतीयेला अखातीला भरसटमेट, ता. जव्हार व खर्डी, ता. शहापूर या ठिकाणी हा उत्सव साजरा होतो. या ठळक अशा बोहाड्याशिवायही अनेक खेड्यापाड्यात 'बोहाडा' मोठ्या हौसेने साजरा केला जातो.

ज्या ठिकाणी 'बोहाडा' असतो. त्या गावी बोहाडा पाहण्यासाठी पंचक्रोशीतील आबालवृद्ध, स्त्री-पुरूषांच्या झुंडीच्या झुंडी, रस्त्या-रस्त्यावरून येतात. मोखाड्यात तर मुंबई, पुणे, नाशिक, नगर, दादरानगरहवेली या

दूरददूरच्या शहरातून लोक या यात्रोत्सवाला येत असतात. येथील श्री. जगदंबा नवसाला पावते अशी भाविकांची श्रद्धा असल्याने आपले दुःख निवारण्यासाठी आणि बोललेले नवस फेडण्यासाठी असंख्य लोकांची बोहाड्याला गर्दी होत असते.

बोहाड्यासाठी पोलीस स्टेशनची परवानगी काढावी लागते. ज्या गावी बोहाडा असतो तेथील कर्त्या मंडळीची कामकाजाची लगबग सुरू असते. वर्गणी जमा केली जाते. बोहड्याचे सामान आणणे, सोंगे नाचविणाऱ्या कलाकारांचे कपडे शिवून घेणे अशी एक ना अनेक कामे त्यांना करावी लागतात. घरातील महिला वर्गही बोहाड्यासाठी आलेल्या पाहुण्यांची उठ-बस, माहेरवासीणींचे कोडकौतुक, नातवंडे, पतवंडे यांच्यामध्ये रमलेला असतो. मुलांचा उत्साह तर ओसंडून वाहत असतो. अशाप्रकारे बोहाडा संपेपर्यंत प्रत्येकाचीच लगबग सुरू झालेली असते.

सर्व कामे पुर्ण झाल्यावर बोहाडा केव्हा करायचा यासाठी तिथी पाहीली जाते. बहुतेक बोहाडे रामनवमी, हनुमान जयंती, धुलीवंदन, अक्षयतृतीया या सणवारांच्या दिवशी गावागावात होतात. मोखाड्यात बोहाडा आठ दिवस साजरा होत  असला तरी इतर खेड्यापाड्यात तीन दिवस बोहाडा साजरा केला जातो. बोहाड्यासाठी नाचवायची देवदेवतांची सोंगे-मुखवटे हे लाकडी किंवा कागदाच्या लगद्यापासून तयार केलेले असतात. कागदी लगद्यापासून तयार केलेली सोंगे ही वजनाने हलकी असल्यामुळे त्यांना पसंती अधिक असते. ही सोंगे बोहाड्याच्या गावातील जनजाती समाजातील कलाकारच तयार करत असतात. बोहाडा उत्सव तीन दिवस असतो. पहिल्या दिवशी 'थाप' असते. 'थाप'म्हणजे बोहाड्याची सुरूवात होय. या दिवशी रात्री चार-पाच सोंगे नाचवली जातात. दुसऱ्या रात्री लहान बोहाडा असतो. या रात्री मध्यरात्रीपर्यंत सोंगे नाचवली जातात. या दोन दिवसांचे आणि रात्रीचे महत्त्व या गावापुरते किंवा पाड्यापुरतेच असते. प्रेक्षकांची गर्दीही तुरळकच असते. सोंगे घेणारे नाचवणारे कलाकार सोंगे कशी नाचवायची? अभिनय कसा करायचा? तलवारी कशा धरायच्या? फिरवायच्या? याचा सराव करत असतात. ज्या वृद्धमंडळींनी आपल्या तरूणपणात सोंगे नाचवलेली असतात, लोकांची वाहवा मिळवलेली असते ते त्यांना मार्गदर्शन करतात.

बोहाड्याच्या दिवशी गल्ल्यांच्या रस्त्यावर कमानी बांधण्यात येतात. कमानींना रानफुलांच्या माळा बांधून त्या शोभिवंत केल्या जातात. सोंगे नाचविणाऱ्या कलाकाराला दगड टोचू नयेत म्हणून रस्त्यांवरील दगडधोंडे उचलून रस्ता साफ केला जातो. सोंग नाचविणाऱ्या कलाकाराला विश्रांती घेण्यासाठी गल्लीच्या मध्यभागी एक मंडप उभारण्यात येतो. मंडप पांगारा, पळस, कुडा इ. रानफुलांनी आणि आंब्याच्या डहाळ्या लावून नटविला जातो. या मंडपाला चांदणी असे म्हणतात. अशी तयारी करता करता संध्याकाळ होते. या गल्लीत विविध दुकाने थाटली जातात. पाळणे येतात सारी बोहाड्याची गल्ली

कोलाहलाने गजबजून जाते. बोहाड्यामुळे त्या गावाला पाड्याला जत्रेचे स्वरूप येते.

बोहड्याला सुरूवात होते ती मूळपाठीच्या मिरवणुकीने मुळपाठी म्हणजे नव्या कोऱ्या विणलेल्या टोपलीत नारळ, करंडाफणी, पूजेचे साहित्य ठेवून आंब्याच्या डहाळीने झाकली जाते. ही मूळपाठी गावच्या कारभाऱ्याची किंवा पाटलाची मुलगी डोक्यावर घेते. तिची पूजा केली जाते. गावातला मुख्य भगत मंत्र पुटपुटत असतो. काही देवदेवतांची गावकऱ्यांच्या वतीने देवतांची प्रार्थना, विनवणी करतो. नंतर बोहाड्याला धुमधडाक्यात सुरूवात होते. सजवलेली मूळपाठी संबळ, कहाळ्याच्या तालासुरात उभ्या गल्लीतून फिरवतात. मूळपाठी रस्त्याच्या टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत बोहाड्याच्या सीमेपर्यंत मिरविल्यानंतर नारदमुनींच्या सोंगाने महोत्सवाला प्रारंभ होतो. नारदमुनी गळ्यात वीणा अडकवून नाचत निघतात, पुढे टेंभेकरी, मागे संबळ, कहाळी वाजविणारे वाजंत्री असतात. नारदमुनींच्या सोंगांनंतर क्रमाने गणपती, सारजा (सरस्वती), मासा (मत्स्यावतार), मारूती, पाच पांडव, खंडोबा, बहिरोबा, काळबहरी, सटवाय, एकादशी, वेताळ, वीरभद्र, शिवाजी, ब्रह्मदेव, विष्णुदेव, महादेव अश अनेक सोंगे काढली जातात. प्रत्येक सोंगासाठी संबळाचा ठेका अन कहाळीचा सूर वेगवेगळा असतो. भीम-बकासुर युद्ध, पहाटे रामलक्ष्मण आणि रावणाची लढाई होते. कधी कधी सर्व सोंगे काढता काढता रात्र अपुरी पडते. त्यामुळे रात्र थोडी सोंगे फार अशी परिस्थिती निर्माण होते.

सकाळ होताच देवीचे श्री जगदंबेचे सोंग निघते. देवीचे सोंग घेणारा कलाकार गुलाबी रंगाचे पोलके व साडी नेसतो. तो देवीच्या मुखवट्याची पूजा करतो. त्याच्या तोंडावर देवीचा मुखवटा बांधण्यात येतो. मुखवट्याच्या नाकाच्या छिद्रातून त्याला पाहता येऊ शकते. संबळाचा ठेका, कहाळीचा सूर, टेंभे व सोंग मंद मंद पावले टाकत गिरक्या घेत नाचत जाते. यावेळी सारे वातावरण देवीच्या भक्तिभावनेने भरून जाते. गल्लीत फिरताना देवीला (सोंगाला) चांदणीमध्ये (मंडपात) बसविले जाते. गावातील प्रत्येक घरातील सुवासिनी स्त्री आरती घेऊन श्री जगदंबेला ओवाळून ओटी भरते. नवस फेडले जातात. हे सर्व आटोपल्यावर देवीचे सोंग नाचत-नाचत मूळ जागी येते.

देवीच्या सोंगानंतर बोहाड्याची सांगता होते आणि आनंद लुटण्यासाठी आणि वाटण्यासाठी एकत्र जमलेली मंडळी गोड-गोड स्मृतींचा ठेवा घेऊन आपआपल्या गावी जातात.

संदर्भ लोकसाहित्य जीवनकला (डॉ.माहेश्वरी गावित)

***

# लोककला, समाज आणि संस्कृती

– **प्रा. श्रीमती सोनल लक्ष्मण इचाळे** (सहाय्यक प्राध्यापक)

**प्रस्तावना:**

मराठी लोकसाहित्याचे दालन अतिशय समृद्ध असून त्यातील बराचसा भाग लोकगीतांनी व्यापलेला आहे. त्यातही पुन्हा स्त्रीगीतांचा भाग अधिक आहे. लोकगीते विविध प्रकारची असून त्यात अनेक विषय आलेले आहेत. लोकगीतांना शेकडो वर्षांची परंपरा असून, मौखिक स्वरूपात ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत आलेली आहेत. लोकगीतांतून लोकमानसाचे, त्यांच्या विचारप्रणालीचे, कल्पनावैभवाचे नीतिधर्माचे चित्रण आलेले दिसते. मराठी लोकसंस्कृतीचे चित्रण लोकगीतांतून व्यक्त झालेले आढळते. विविधता आणि भावोत्कटतेबरोबरच मानवी जीवनातील अनेक प्रसंगांचे हृदयस्पर्शी चित्रण लोकगीतात आढळते. त्यामुळे लोकगीतांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

पुराणातील कथा स्त्रियांच्या कानावर पडतात, भावूकवृत्तीमुळे व श्रद्धाशील मनामुळे पुराणातील संस्कार स्त्रियांवर चटकन होतात. जीवनाकडे बघण्याची दृष्टी आणि जीवनमूल्ये पुराणातल्या व्यक्तीप्रमाणे आपोआपच निर्माण होते याच पुराणकथा स्त्रिया गाण्याच्या रूपाने काम करताना म्हणतात. त्यापैकी जात्यावरील ओव्या पुढीलप्रमाणे–

रामकुंडावरी कोणी घातीला मांडव
आले आंघुळीला पाची लेण्याचे पांडव
रामकुंडावरी कोणी सांडिल्या नागल्या
आले आंघुळीला पंचवटीचे जागल्या
रामकुंडावरी कोणी उभारीला धज
आले आंघुळीला लेण्याचे धर्मराज
रामकुंडावरी लाल पालखी कोणाची
आले आंघुळीला सिता जानकी रामाची
रामकुंडावरी ढवळ्या धोतराचा पिळा
आले आंघुळीला रामलक्ष्मण मेळा
रामकुंडावरी लाल मांडव जाईचा
आला आंघुळीला राम कौशल्याबाईचा
रामकुंडावरी कोणी सांडिली सुपारी
आले आंघुळीला पंचवटीचे व्यापारी
रामकुंडावरी कोणी सांडिला गुलाल
आले आंघुळीला पंचवटीचे दलाल.

**

जनक राजा बोले माझ्या पाटी नाही पोटी
सिता सापडली तिथं लाकडाच्या पेटी
जनक राजा बोले माझ्या दारी नाही वशी
सिता सापडली तिथं नागराच्या पाशी
जनक राजा बोले सिता कोणाला देवावी
दशरथ येही राम शोभतो जावाई
राम लक्ष्मण आहे वुलीवुली बाळं
सिता माय बोलं कोणच्याला घालू माळ
राम-लक्ष्मण दोन सारकले बंधु
सिता माय बोलं काकण कोणच्याला बांधु
राम-लक्ष्मण जसे गुलाबाचे फुलं
वनाला निघाले राजा दशरताचे मुलं.
राम-लक्ष्मण दोघं निघाले वनाला
रेशमाचे गोंडे यांच्या धनुष्य बाणाला
जळती ग लंका जळतं सोननाणं
कोणाचा काय गेलं मस्ती केली रावणानं
लंकाचा रावण भिक्षा माघं घरोघरी

रामाजीची सिता नेली यानं बरोबरी
लंकाचा रावण स्वर्गी जळतो पालथा
रामाच्या सितावरी यानं गर्व केला होता
लंकाचा रावण स्वर्गी जळं तीनवार
रामाच्या सितावरी यानं गर्व केला फार
जळती गं लंका लंकाचं झालं कोळं
इझवाया गेले तोंड वान्हाऱ्याचं काळं.

***

विठ्ठल गं बोलं रूक्मीणी आण वांग
कशाचं आणु वांग झाड राऊळाच्या मांग
विठ्ठल गं बोलं रूक्मीणी आण भेंडी
कशाची आणु भेंडी झाड राऊळाच्या तोंडी
विठ्ठल गं बोलं रूक्मीणी वाढ दाळ
कशाची वाढू दाळ तुरी झाल्या रानोमाळ
विठ्ठल गं बोलं रूक्मीणी वाढं रोटी
कशाची वाढू रोटी गवू जमिनीच्या पोटी
विठ्ठल गं बोलं रूक्मीणी वाढं भातं
कशाचा वाढू भातं साळी पडल्या पेवातं
विठ्ठल गं बोलं वाढं रूक्मीणी ताकं
कशाचं वाढू ताकं माथनीचा गेला झोकं
विठ्ठल गं बोलं रूक्मीणी वाढं शिरा
कशाचा वाढू शिरा पाळण्यात रडं हिरा
विठ्ठल गं बोलं काढ रूक्मीणी झाडून
आपल्या भेटीला आले साधु संसार सोडून
विठ्ठल गं बोलं आणं रूक्मीणी काठी
आले साधु संत झाली राऊळाला दाटी
विठ्ठल गं बोलं आण रूक्मीणी बंडी
आले साधु संत उभे राऊळाच्या तोंडी

***

नवस बोलले भैरव बाबाच्या देवळी
व्हऊदे पुतरू वाहिल बेलाची कवळी
नवस बोलले भैरव बाबाच्या दारात
व्हऊदे पुतरू वाहिल पेड्याची परात
भैरूनाथ बाबा तुझी वाटावरी काठी
कशी पडू पाया डोई भाकरीची पाटी
भैरूनाथ बाबा तुझा वाटावरी झेंडा
कशी पडू पाया डोई पानियाचा हांडा
भैरवनाथ बाबा तुझा वाटावरी ठाणा
कशी पडू पाया माझ्या कडी बाळ तान्हा
नवस बोलले चत्रशुंगी सावित्रीला
गाडी बैलाशी येईल तुझ्या गं चैत्रीला
नवस बोलले चत्रशुंगीच्या लाडीला
सर्पाचे कासरे वाघ जुतले गाडीला
देवी आंबाबाई वाकडी तुझी मान
खांदेस माहेर उजवा दिला कान

***

रामराम म्हणं राम माझे गुरूभाऊ
स्वरगीच्या वाटं होतो देहीचा निभाऊ
राम राम म्हणं राम माझे मैतरं
देवाचं घेते नाव देही होती पवितरं
रामा तुझं नाव आज नाही मी घेतलं
एवढा माझा जीव कोण्या धंद्यात गुतलं
रामा तुझं नावं कोण पाप्या विसरला
नितळ टाकून पाणी गढूळ भरिलं
रामाच्या नावाची पाप्याला नाही गोडी
नितळ टाकून तोंड गढूळात बुडी
रामा तुझं नाव नाही पाप्याच्या वचनी
सोरगीच्या दारी याला यमाची जाचणी
पाण्यामंधी मासा खेळतो आनंदानं
घातील्यागं गळं बोईदादा वैराळानं

***

# लोककला, साहित्य व संस्कृती

– प्रा. सोनाली गोसावी (संगीत विभाग)



महाराष्ट्र हे सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न असे राज्य आहे. ग्रामीण भागातून आजही विविध समाजगट ही संपन्नता जोपासत आहेत. समाजाच्या विविध गटांतून तयार झालेली गीते, कविता, संकल्पना यांचा समावेश लोककलांमध्ये होतो लोकरंगभूमी विकसित झाली.

वासूदेवाची गाणी, दशावतार, तमाशा, लोकनाट्य, बहुरूपी, डोंबाऱ्याचे खेळ, पोवाडा, गोंधळ या लोककलांमध्ये रंगभूमीची बीजे दिसतात.

**वासुदेवाची गाणी–**

वासुदेवाला लोकसंस्कृतीचा उपासक मानला आहे.
अवो जनाबाईंच्या भक्ती– देव गुंतला
जनामातेला काम भारी
घालिते दळण जात्यांवरी विठ्ठला या हो लौकरी
यावे यावे जगजेठी
तुमच्या नावाची आवड मोठी
खुटीला घालुन मिठी
दोन बोलु सुखाच्या गोष्टी

**भारूड:**

हा एक मराठी वाङ्मयाचा प्रकार आहे. याद्वारे साध्या रूपकांमधुन धार्मिक व नैतीक तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले जाते. अनेक संतांनी समाजप्रबोधनावर भारूडे लिहिली आहेत. लोककलेच्या माध्यमातून लोकजागृती करण्यासाठी भारूडांचा उपयोग केला जातो. सर्वांना परमार्थाचा आनंद घेता यावा व अध्यात्म सुलभ व्हावे म्हणून भारूडाची व्यवस्था केली गेली हा एक वारकरी कला अविष्कार आहे.

**तमाशा :**

तमाशा हा गायन, वादन, नृत्य आणि विनोद यांनी युक्त असलेला लोकनाट्याचा एक अविष्कार आहे. तमाशाचे खेळ गावोगावच्या जत्रेत, उघड्यावर किंवा तंबूत होत असतात. गायनाला ढोलकी, कडे, झांज, बाजाची पेटी यांची साथ असते. या खेळामध्ये गण–गौळणी, बतावणी, फार्स, रंगबाजी आणि वग असे पाच प्रकारचे नाट्य असते यामध्ये लावणीगायन आणि लावणीनृत्य विशेष लोकप्रिय आहे. गण म्हणजे गणपतीला केलेले आवाहन. गण संपल्यावर गौळण सादर केली

जाते. यावेळी दोन पक्षांमध्ये विनोदी संवादही होतात. वग म्हणजे नाट्यरूपाने सादर केलेली कथा यात पौराणिक, ऐतिहासिक लोककथा असतात.

**पोवाडा:**

पोवाडा हा वीर रसांतील लेखनाचा आणि गायनाचा महाराष्ट्रातील लोकप्रिय प्रकार आहे. वीरांच्या पराक्रमांचे त्यांच्या बुद्धीमत्तेचे तसेच एखाद्याच्या सामर्थ्य, गुण कौशल्ये इ. गुणांचे काव्यात्मक वर्णन, स्तुतीस्तोत्र म्हणजेच पोवाडा. महाराष्ट्रात शिवाजी महाराजांवर केलेले पोवाडे विशेष प्रसिद्ध आहेत.

**भजन:**

देवाची स्तुतीपर काव्यरचना साग्रसंगीत म्हणून देवाला भजने किंवा आळविणे याला भजन असे म्हणतात. हा योग साधनेतील भक्तीयोगाचा भाग आहे. ही महाराष्ट्रातील प्रसिद्ध लोककला आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, सोपान, निवृत्ती, एकनाथ, नामदेव, चोखामेळा इ. संतांनी अनेक भजने तयार केली. हार्मोनिअम, तबला, ढोलकी, टाळ, मृदुंग यांच्या सहाय्याने देवळात देवासमोर बसून भजन गायिली जातात.

**कीर्तन:**

वेगवेगळ्या पद्धतीने काव्य संगीत, अभिनय आणि क्वचित नृत्य यासह सादर होणाऱ्या भक्तीरसपूर्ण कथारूप एकपात्री निवेदनाला कीर्तन म्हणतात. भारतात सर्व प्रदेशात, सर्व भाषांत व सांप्रदयात कीर्तन हा प्रकार आढळतो. महाराष्ट्रात कीर्तनाची परंपरा पूर्वापार चालत आलेली आहे. नारद हा भारतातील आद्य कीर्तनकार मानला जातो.

**गोंधळ:**

महाराष्ट्रात गोंधळी लोक गोंधळ हे पारंपारिक विधिनाट्य सादर करतात. या जातीचे लोक महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेश या प्रांतात खास आढळतात. यांनी आपल्या या विधीनाट्याला एक स्वतंत्र रंभगूमी विकसित करून दिली आहे.

गोंधळी हे देवीचे उपासक असून कोणत्याही मंगल कार्याची सांगता हे आपल्या गोंधळातुन करतात. गोंधळातील गीत प्रकारात देवीची स्तुतीगीते असतात. कृष्णकथा गुंफणाऱ्या गौळणी असतात. वीरांच्या पराक्रमांचे पोवाडे असतात हे सर्व गोंधळी रंगवून सांगतो. महाराष्ट्रातील लोककलेमध्ये गोंधळ या विधीनाट्याला मानाचे स्थान आहे.

**लेझीम:**

हे महाराष्ट्रातील एक लोकनृत्य आहे. लेझीम, हलगी, ढोल, झांज यांच्या मदतीने हे लोकनृत्य सादर केले जाते.

***

# लोकसाहित्य

– **प्रा. हेमलता चौधरी** (बी.व्होक.) (हार्टी./ॲग्री.)

आदिमकाळ, वेदकाळ पुराणकाळ इतिहास काळ, मध्ययुगीन काळ आणि पुढील काळातही लोकजीवनात लोकसाहित्याची निर्मिती व प्रचलन कायम राहिल्याचे दिसते. याचे महत्त्वाचे कारण लोकजीवन व लोकसाहित्य यांच्यातील अतूट नाते हे होय.

पारंपारिक लोकजीवनातील कृती उक्तींतूनच लोकसाहित्याची जडणघडण झालेली आहे. पारंपारिक लोकजीवनातील विधी विधाने, त्यांच्या उपासना विधी, मौखिक साहित्य, कला संगीत इत्यादींबरोबरच लोकश्रद्धा लोकसाहित्याला एक आगळा वेगळा आकार देताना दिसतात. लोकजीवनाचे स्वच्छ आणि स्पष्ट प्रतिबिंब आपणांस लोकसाहित्यात पडलेले दिसते.

मराठी लोकसाहित्यातून अविष्कृत होणारे लोकजीवन, विविध प्रकारचे जीवन वैशिष्टचे लोकसाहित्यातून प्रकट होतांना दिसतात. सामाजिक जीवन, स्त्री–जीवन, अलंकार, वस्त्रे, लोकसंस्कृती हे लोकसाहित्यात स्वाभाविकपणेच आलेले आहेत.

**१) सामाजिक जीवन**

लोकसाहित्यातून आविष्कृत समाजजीवनाचे विविध पैलू पहावयास मिळतात.

ढब्बुशाही बुडून गेली, गर्दी झाली याची
बाळतोंड्या खडक्या निघाला खोटी साळ याची।।

समाजातील ढोबळ बदलाची लोकसाहित्यात जाण आढळते. समाजाने जे जे अनुभवले त्याचाच प्रामाणिक आणि स्वाभाविक अविष्कार लोकसाहित्यातून झालेला आढळतो. समाजातील प्रमुख वर्ग श्रमकऱ्यांचा, शेतीचा व्यवसाय करणाऱ्यांचा. आपल्या काळ्या आईत घाम गाळणाऱ्या अशा सामाजिक अवस्थेत जीवन जगणाऱ्या मनातील विविध भावछटा त्यांच्याच प्रतिमांच्या सहाय्याने लोकसाहित्यातून व्यक्त होताना दिसतात.

बारा बैलांशी कशी मव्हाणी दाटली
साखर मुठीनं वाटली

असे यथार्थ वर्णन लोकसाहित्यात विविध स्वरूपांत लोकजीवनाची संपन्नता स्पष्ट करते.

**२) लोकसंस्कृतीचे दर्शन**

लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे जतन आणि जोपासना होत असते. लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे.

उगवला नारायण, तुळशीच्या डोक्यावर
उजेड पडला मारूतीरायावर।।

सकाळच्या प्रहरी उगवणाऱ्या सूर्याला साक्षी ठेवून नव्या दिवसाची मंगलमय सुरूवात करत मराठी स्त्री आपल्या देवांविषयीच्या श्रद्धा व्यक्त करते.

**३) लोकसाहित्यातून चित्रित होणारे स्त्री–जीवन**

मराठी साहित्यात स्त्री गीते विपुल प्रमाणात आहे. शहरी जीवनापेक्षा ग्रामीण भागातील स्त्री–जीवन वेगळे असते.

सकाळच्या पात्यामंदी, हात माझा ग जोंधळ्यात
देव नारायण, उगवते कंबळात ।।

दैनंदिन जीवनाची अशी सुरूवात लोकसाहित्यातील स्त्रीची होते. प्रात:काळी उठून जात्यावर बसणारी ही स्त्री जात्याच्या फिरत्या चाकाबरोबर तिच्या अंत:करणातील भावतरंग ओवीच्या माध्यमातून गिरक्या घेत साकार होतात.

**४) लोकसाहित्यातून घडणारे अलंकार दर्शन**

लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या स्त्रीजीवनात अलंकारांना, दागदागिन्यांना विशेष महत्त्व आहे. विविध अलंकाराची स्त्री-गीतात केलेली गुंफन अलंकाराइतकी व लोकसाहित्याचे सौंदर्य खुलविणारी आहे.

माथ्यावर चंद्र सुर्ये तारा तुट
भांगांत भरले मोती, कोकणी थाट
नाकात नथ सज्यांची, पुरभा घनदाट
गळ्यात मोहनमाळ केवळ कंठ
दंड पेट्या, बाजबंदाला गोडं लटपटं
हिच्या मुदीवर हिरकणी हिव्याचं बुट
पायी आलपट पैंजण पोलार दाटं

असे विविध अलंकार लोकसाहित्यातून पहावयास मिळतात. लोकसाहित्यातून दिसणारे हे अलंकार अस्सल मराठी घडणीचे असून त्यांची मानवी भावनेशी केलेली गुंफण मनोज्ञ व आकर्षक आहे.

***

## लोककला व लोकसंस्कृती

– **श्रीमती ठुबे एम.एल.** (ज्यु.कॉलेज टिचर)

महाराष्ट्राला महान अशी सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. यात अनेक कलांचा, परंपरांचा समावेश होतो. वेगवेगळ्या जाती, जमातींमध्ये पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या कलांना लोककला म्हणतात. यातील बऱ्याच कला ह्या मौखिक रुपाने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित आलेल्या दिसतात. या लोककलांमध्ये गीते, नृत्य, चित्र, कविता, खेळ, वाद्य, संगीत अशा अनेक कलांचा समावेश होतो.

या लोककलांमधून समूहमनाची निर्मिती होते. लोककला ह्या निखळ मनोरंजनाबरोबरच समाजप्रबोधन, जनजागृती, धार्मिक-आध्यात्मिक शिकवण, नैतिक शिकवण, कौटूंबिक शिकवण अशा वेगवेगळ्या प्रेरणांमधून निर्माण झाल्या.

अशा लोककला प्रकारांमध्ये कीर्तन, दशावतार,तमाशा, वगनाट्य, भारूड, जागरण, गोंधळ, डोंबाऱ्याचा खेळ, पोवाडे, वासुदेव गीते, बहुरूपे, लावणी, लेझीम, भजन इ. कला प्रकारांचा समावेश होतो. त्यातीलच एक लोककला प्रकार म्हणज भारूड.

**भारूड:** 'भारूड' म्हटले की, संत एकनाथांचे नाव आपल्या डोळ्यासमोर येते. संत एकनाथांनी या कला प्रकाराला प्रसिद्धीच्या शिखरावर नेवून ठेवले. 'अग गग गग विंचू चावला', 'दादला नको ग बाई' 'या शेजारणीनं बर नाही केल ग बया' असे कितीतरी भारूडे आहे की जी आपल्या तोंडपाठ आहे.

असा भारूड हा महाराष्ट्रातील प्रसिद्ध लोककला प्रकार आहे. हा पद्य वाङ्मयप्रकार आहे. 'भारूड' या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ 'धनगर' असा आहे. महानुभाव पंथाच्या ऋद्धपूर वर्णन या ग्रंथात याचा पुरावा सापडतो. 'भारूड' हा शब्द २००० वर्षे इतका प्राचीन असण्याची शक्यता आहे. वेदकाळात भारूडाचा जन्म

झाला म्हणजे वेदकालीन जानपदे जी आहे त्याचेच रूपांतर कालांतराने भारूडात झालेले आहे.

भारूडाचे उगमस्थान म्हणजे हरिकिर्तन आणि कीर्तन परंपरेचे जनक म्हणजे नामदेव महाराज. नामदेव महाराज नाचून जे कीर्तन करायचे त्याला लळीत म्हणतात. लळितातून रूपकाचा जन्म झाला. अध्यात्म सांगायचे ते एखाद्या रूपकाच्या माध्यमातून. भारूडाचा ही हाच प्रधान हेतू आहे. रूपकाच्या माध्यमातून नैतिक, आध्यात्मिक, धार्मिक, कौटूंबिक शिकवण देणे.

तसेच 'बहुरूढ' या शब्दाचा अपभ्रंश म्हणजे 'भारूड' असेही काहींचे म्हणणे आहे.

**स्वरूप:** एकनाथांच्या भारूडांतून त्यांचा आध्यात्मिक अनुभव सोप्या भाषेत मांडला आहे. सदाचार, नीती यावर संत एकनाथांची अनेक भारूडे आहे. रूपकाच्या माध्यमातून त्यांनी सदाचार, नीती लोकांना पटवून दिली. त्यांच्या भारूडांमध्ये विविधता असलेली दिसून येते. अध्यात्म, दोष-दुर्गुण, प्रबोधन, लोकरंजन, उद्‌बोधन अशा अनेक विषयांवर त्यांची भारूडे आहे. भारूडांमध्ये नाट्यतत्त्व ठासून भरलेली आहे. म्हणजे भारूडाचे गायन व सादरीकरण करावे लागते.

संस्कृत किंवा प्राकृत भाषेत भारूड हा शब्द गीत प्रकारला उद्देशून जरी असला तरी त्या भाषांमध्ये भारूड रचना उपलब्ध नाही. त्यामुळे या काव्यप्रकाराचा उगम मराठी भाषा आहे. संत ज्ञानेश्वर हेच भारूडाचे आद्य रचनाकार असावे असा एक प्रवाह मानतो. मात्र संत एकनाथांनी भारूड ह्या काव्यरचनेला प्रसिद्धीच्या शिखरावर नेवून पोहचविले.

संत एकनाथांच्या भारूडांमध्ये व्यवसाय, नाती-गोती, सामाजिक प्रवृत्ती, गाव, दैवी भूमिका, भूत-पिशाच्च, पशु पक्षी, सण-उत्सव, देव अशा वेगवेगळ्या विषयांवर वर्णन केलेले दिसून येते.

**प्रकार:** भारूडाचे साधारणपणे भजनी भारूड, सोंगी भारूड, कुट भारूड असे तीन प्रकार मानले जातात. त्यापैकी भजनी भारूड हे कीर्तनासारखे असते. कुट भारूड म्हणजे त्याला अर्थ लावावा लागतो. ज्यात रहस्य असते. सोंगी भारूडात वेशांतर केले जाते.

असे हे भारूडे म्हणत असतांना त्याचा अभिनय ही करावा लागतो.

**संत एकनाथांची काही निवडक भारूडे**

१) विंचू चावला

विंचू चावला वृश्चिक चावला ।।धृ।।<br>
कामक्रोध विंचू चावला। तम घाम अंगाशी आला।<br>
पंचप्राण व्याकुळ झाला। त्याने माझा प्राण चालिला।<br>
सर्वांगाचा दाह झाला।।१।।<br>
मनुष्य इंगळी अति दारूण। मज नांगा मारिला तिने।<br>
सर्वांगी वेदना जाण। त्या इंगळीची ।।२।।<br>
त्या विंचवाला उतारा। तमोगुण मागे सारा।<br>
सत्वगुण लावा अंगारा। विंचू इंगळी उतरे झरझरा ।।३।।<br>
सत्त्व उतारा देऊन। अवघा सारिला तमोगुण।

किंचित राहिली फुणफुण। शांत केली जनार्दने।।४।।

२)पंढरीला नेल गं बया

या शेजारणीन बरं नाही केलं गं बया।

मला पंढरीला नेल गं बया।।

पंढरीची वाट लयी व्दाड।

माझ्या पायाला आले फोडं ।।

या शेजारणणीनंन बरं नाही केल गं बया।

मला पंढरीला नेल गं बया ।।

चंद्रभागेचे गढूळ पाणी।

नाही शिवत मी वंगळावाणी।।

या शेजारणीननं बरं नाही केलं गं बया।

मला पंढरीला नेल गं बया।

टाळ-मृदुंगाची घाई।

माझे कपाळ उठले बाई।

या शेजारणीनं बरं नाही केल गं बया।

मला पंढरीला नेल गं बया।।

एका जनार्दनी पंढरीची वारी।

चुकती जन्मा-मरणाची फेरी।

ह्या शेजारणीनं बरं नाही केल गं बया।

मला पंढरीला नेल गं बया।।

३) दादला

मोडकेसे घर तुटकेसे छप्पर।

देवाला देवघर नाही ।।१।।

मला दादला नलगे बाई ।।धृ।।

फाटकेच लुगडे तुटकीसी चोळी।

शिवाया दोरा नाही ।।२।।

मला दादला नलगे बाई।

जोंधळ्याची भाकर आंबाड्याची भाजी।

वर तेलाची धार नाही ।।३।।

मला दादला नलगे बाई।

मोडका पलंग तुटकीसी नवार।

नरम बिछाणा नाही ।।४।।

दादला नको गं बाई।

सुरतीचे मोती गुलघाव सोने।

राज्यांत तेणे नाही ।।५।।

दादला नको गं बाई ।

एका जनार्दनी समरस झाले।

तो रस येथे नाही ।।६।।

मला दादला नलगे बाई।

***

## माझी देवनगरी

– खैरनार तेजस्विनी दिनकर (एफ.वाय.बी.कॉम.)

सटाणा हे विंचूर-प्रकाश महाराष्ट्र राज्य महामार्गी क्रमांक १७ वर वसलेले असून २०११ च्या जनगणनेनुसार गावाची लोकसंख्या ३७,७१६ इतकी आहे. महाराष्ट्र राज्यातल्या नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुका म्हणजे सटाणा तालुका. सटाणा हे तालुक्याच गाव. सटाण्यापासून वायव्य दिशेला गुजराथ राज्यातील डांग भागाची सीमा ४० किमी अंतरावर आहे. गावाजवळ वायव्य-आग्नेय या दिशेने आरम नावाची लहान नदी वाहते. सटाण्यापासून दहा किमी पुढे गिरणा नावाच्या नदीशी आरमचा संगम होतो. गावाच्या आसपासची जमीन काळी कसदार असून शेतीला अतिशय उपयुक्त अशी आहे. बाजरी, गहू, हरभरा, ऊस, कपाशी, मका, कांदा, कडधान्य ही पारंपारिक खरीप-रब्बी पिकं असून अलिकडे द्राक्ष आणि डाळींबची मोठ्या प्रमाणात व्यावसायिक लागवड होऊ लागली.

बागुल राजाच्या नावावरून या प्रातांचं नाव बागलाण आहे. बागुल या राठोडवंशीय राजांची वंशावळ इ.स. १३०० पासून सापडते. बागुल राजघराण्यातील चौपन्न राजांची नामवलीही आज उपलब्ध आहे. बागुलांकडून बागलाण पेशव्यांकडे गेले आणि पेशव्यांकडून इंग्रजांकडे. वाघांच रान म्हणजे बाघाचं रान. बाघरानचा अपभ्रंश बागलाण झाल्याचीही व्युत्पत्ती सांगितली जाते.

बागलाण प्रांताचे राजे बागुल यांनी सहा ठाणे वसवले होते असे म्हटले जाते. हा काळ दंतकथातून इंग्रजांच्या काळापर्यंत पुढे सरकत राहतो. चौदाव्या पंधराव्या शतकापासून आजच्या सटाण्याच्या आजुबाजूला जी सहा ठाणे वसली. त्या ठाण्यांच्या मध्यवर्ती स्थानी सटाणा शहर वसले. सहा ठाण्यांचा अपभ्रंश म्हणजे सटाणा झाले असावे, अशी एक व्युत्पत्ती सांगितली जाते. सटाण्याच्या जागी शहराचे ठाणे वसले होते. सहा ठाण्याचा अपभ्रंश सटाणा झाले असेही सांगितले जाते. सटाण्याचे पूर्वीचे नाव सत्य नगरी वा सत्यायन होते, अशा सटाणा नावाच्या काही पारंपरिक दंतकथा रूढ आहेत. बागलाण तालुक्यातील ऐतिहासिक साल्हेर-मुल्हेरचे किल्ले संपूर्ण महाराष्ट्राला ज्ञात आहेत. सुरत लुटीतून परतताना साल्हेर किल्ल्यावर शिवाजी महाराज थांबले होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आजही अनेक पर्यटक व गिर्यारोहक साल्हेर किल्ल्याला भेट द्यायला येत असतात. महाराष्ट्रातील पहिल्या क्रमांकाचे उंच शिखर कळसुबाईचे शिखर असून दुसऱ्यास क्रमाकांचा उंच शिखर हा साल्हेर किल्ला आहे. या किल्ल्यांवर पूर्वी प्रचंड जंगल होते. मात्र आज हे किल्ले पूर्णपणे उघडे बोकडे झालेत. पूर्वीच्या बागलाण प्रांतात संपूर्ण खानदेश सामावलेला होता, इतका लांबी रूंदीने विस्तृत होता. बागलाण म्हणजे गिरणा, तापी, नर्मदा या नद्यांचा प्रदेश. दुर्गम आणि डोंगराळ भाग. उत्तरोत्तर या प्रांताचे आकुंचन होत गेले आणि तो आज एक तालुक्यापुरता उरला. सटाणा आणि परिसर म्हणजे बागलाण परिसराची संस्कृती ही ग्रामसंस्कृती आहे. भाषिकदृष्ट्या अहिराणी भाषिक संस्कृती आहे. आणि शेती ही तर या भागाची मूळ लोकसंस्कृती आहे.

सटाण्याला पूर्वी मामलेदार हे पद नव्हते. सटाणा मालेगावच्या अखत्यारीत येत होते. १८६९ ला यशवंत भोसेकरांच्या नियुक्तीने बागलाणला पहिले मामलेदार मिळाले. ब्रिटीश सरकारने बागलाण तालुक्यासाठी सटाण्याला मामलेदार कचेरी स्थापन केली. ८ मे १८६९

रोजी सटाणा येथे पहिले मामलेदार म्हणून यशवंत भोसकर रूजू झाले. ते १८७३ पर्यंत बागलाणात मामलेदार होते. ते देवध्यानी, धार्मिक आणि परोपकारी वृत्तीचे होते. १८७२ साली या परिसरात ओला दुष्काळ पडला. लोक भुकेने मरत असलेले पाहून मामलेदार अस्वस्थ झाले आणि त्यांनी सरकारी खजिना लोकांना वाटून दिला. इंग्रज सरकारने त्यांना बरखास्त केले तरी ते लोकांचे देव झाले. म्हणून देवमामलेदार त्यांच्या मृत्युनंतर सटाण्यात त्यांचे भव्य मंदिर बांधण्यात आले. दरवर्षी भव्य रथ निघतो. पंधरा दिवस मोठी यात्रा भरते. देवमामलेदार हे सटाण्याचे लोकदैवत झालेय. गावाजवळ आराम नदीकाठी देवमामलेदार यांच्या मंदिरात दर्शन घ्यायला आजूबाजूच्या खेड्यावरील लोक कायम येत असतात. गावात कोणाकडे येणारे पाहुणे या देवतेचे दर्शन घेतात.

१८७३ साली आजचे मुल्हेर म्हणजे त्यावेळच्या मयुर नगरीतल्या तळ्यात सापडलेल्या दोन मुर्तींपैकी नारायणाच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा मुल्हेर येथील उध्दव महाराजांच्या मंदिराजवळ केली, तर दुसरी मुर्ती महालक्ष्मीची होती. ती मामलेदार भोसेकर यांनी सटाण्याला आणून तिची प्राणप्रतिष्ठा आरम नदीच्या काठी केली. तिथे नंतर छोटेसे मंदिर बांधण्यात आले. ते आजतागायत आहे. हे दैवतही सटाण्याचे वैभव आहे. बागलाणात अनेक विभुती, मंदिरे, तिर्थक्षेत्र आणि पर्यटन क्षेत्र आहेत. यात उपासनी महाराज, उद्धव स्वामी, पद्मनाथ स्वामी, नयन महाराज, दावल मलीक आदी विभूती आणि मांगीतुंगी, आलियाबाद, देवळाणे, कपालेश्वर, दोधेश्वर येथील मंदिरे व साल्हेर-मुल्हेर किल्ले यांचा समावेश करावा लागेल.

तालुक्यातील विरगावला कान्हेरी नदीच्या थडीवर पद्मनाथ स्वामींची समाधी बांधली आहे. ह्या समाधीला श्यामदेऊळही म्हणतात. लहानपणापासून मी ती समाधी पाहात आली. पद्मनाथ स्वामी हे मुल्हेरच्या उद्धव स्वामीचे शिष्य होते. विरगावला ज्या ठिकाणी आज त्यांची समाधी आहे तिथे ते कुटी बांधून राहतात. पद्मनाथ स्वामींचा पूर्वइतिहास आज विरगावात कोणालाही ज्ञात नाही. ते कुठून आले वगैरेही माहिती नाही. त्यांनी संजीवनी समाधी घेतली असे परंपरेने सांगितले जाते. त्यांचा काळही आज्ञात आहे. त्यावेळी विरगावातील लोकांनी त्यांची प्रशस्त समाधी बांधली. दरवर्षी आषाढी महिन्यात आषाढ वद्य सप्तमी ते चतुर्दशीपर्यंत श्रीमद्‌भागवत ग्रंथाचे वाचन करण्यात येते. आषाढ वद्य चतुर्दशी या पद्मनाथ स्वामींच्या पुण्यतिथीला समाधीला अभिषेक केला जातो. व याच दिवशी श्रीमद्‌भागवत ग्रंथवाचन समाप्तीचा कार्यक्रम होतो. ग्रंथ वाचन समाप्तीनंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे आषाढ अमावस्येला दरवर्षी यात्रा भरते.

सटाण्यापासून पंचवीस किलोमीटर पश्चिमेला कपालेश्वर नावाचे तिर्थक्षेत्र आहे. हे तिर्थक्षेत्र हत्ती नदीच्या काठी असून पूर्वी ही नदी वर्षभर वहायची. मंदिराजवळ नदीच्या काठाला घनदाट केवड्याचे बन होते. त्यातून आलेले झिळांचे पाणी गायमुखातुन एक तलावावर पडत. या तलावावर भक्त स्नान करीत असत. पण आज तिथे केवड्याचे बन उरले नाही आणि नदीला पाणीही नाही. म्हणून या मंदिराचा परिसर भकास वाटतो. दोधेश्वर हे तिर्थक्षेत्र अवघ्या नऊ किमी उत्तरेला डोंगराच्या कुशीत वसलेलं आहे. हे तिर्थक्षेत्र पूर्वी हिरवेगार निसर्गाने नटलेले असायचं. चहुबाजूने डोंगरावर हिरवेगार जंगल होते. मंदिर परिसरात तलाव, विहीर आजही असले तरी स्नान करण्यासाठी तलाव आज कोरडा झाला आहे.

असेच विविध गावात वेगवेगळे मंदिर, विभुती आहेत आणि हे आमच्या बागलाणची शान आहे.

***

# इतिहास बागलाणच्या देवमामलेदारांचा

**– सोनवणे यामिनी योगेश** (एफ.वाय.बी.कॉम.)

उभ्या महाराष्ट्रात सरकारी अधिकाऱ्यांचे मंदिर सटाण्या शिवाय कोठेही दिसणार नाही. श्री. यशवंतराव महाराज देवस्थान हे जागृत देवस्थान आहे. नाशिक पासून अवघ्या ९० कि.मी. अंतरावर असणारे सटाणा (बागलाण) येथील श्री यशवंतराव महाराज मंदिर या पंचक्रोशीतील आराध्य दैवत मानले जाते. देवमामलेदार ट्रस्टच्या वतीने मार्गशीर्ष वद्य ११ ला विद्यमान तहसिलदार व ट्रस्टी अध्यक्षांच्या हस्ते महापूजा होऊन यात्रोत्सव सुरू होतो. त्या निमित्ताने भाविकांची मोठी गर्दी होत असते. हा यात्रोत्सव १५ दिवस चालतो. संत यशवंतराव महाराज हे देवत्वाला पोहोचलेले महापुरूष होते.

''देवासी अवतार ! भक्तासी संसार ! दोहोंचा विचार एकपणे'

देवअवतार घेतात आणि भक्त प्रपंच करता करता परमार्थिक विचारांनी व आपल्या कार्याने देव होऊन जातात. देवमामलेदार हे असेच महापुरूष होते की, ज्यांनी ग्रामीण भागातील अतिशय छोट्या अशा 'भोसे' जि. सोलापूर या गावी जन्म घेतला. पुढे ते भोसेकर या आडनावाने ओळखले जाऊ लागले. यशवंत महादेव भोसेकर हे महसूल विभागात नोकरीस लागले आणि नोकरी करत करत काही वर्षांनी ते सटाणा या गावी मामलेदार म्हणून बदलून आले. इ.स. १८६९ साली सटाणा येथे स्वतंत्र मामलेदार कचेरी ब्रिटीश काळात स्थापन झाली. बागलाण तालुक्याचे पहिले मामलेदार होण्याचा मान देवमामलेदार यशवंतराव महाराज यांना मिळाला त्यांच्या येण्यापूर्वी बागलाण तालुक्यात दुष्काळ होता. पाण्याचे दुर्भिष्य होते, महागाई भडकली, लोकजीवन अतिशय कष्टमय व दुःखमय होते. परंतु महाराज आले आणि त्यांच्या पायगुणांमुळे पावसाळा चांगला झाला.

धनधान्याची शेती फुलली, गरिबांचे दुःख हालके झाले. त्यांचे प्रशासकीय काम अतिशय न्यायप्रिय आणि चोख होते. त्यामुळे अशा सात्विक न्यायप्रिय प्रशासनाला लोक 'देवमाणूस' म्हणू लागले. त्यांचे दर्शन सुद्धा सुखकारक होते. मुल्हेर येथून 'महालक्ष्मी' मुर्ती आणली आणि आराम नदीच्या किनाऱ्यावर तिची प्राणप्रतिष्ठा केली. भक्तीचे पर्व सुरू झाले. प्रपंचामध्ये रमलेली माणसे परमार्थ करू लागली. चांदण्याला सुगंध यावा अशी स्थिती सटाण्यात म्हणजेच बागलाण तालुक्यात झाली.

''निश्चयाचा महामेरू बहुत जनासि आधारू'' असे शिवछत्रपतीचे वर्णन केले जाते. देवमामलेदार हे बहुतजनांचे आधार होते. लोकांना त्यांनी कधी कमी पडू दिले नाही. शासनाचा पैसा लोकांना वाचविण्यासाठी आणि त्यांचे दुःख हलके करण्यासाठी त्यांनी प्रामाणिकपणे वापरला. प्रेम, कणव, मानवता, प्रामाणिकपणे सेवा आणि कार्य अशी कितीतरी मूल्ये त्यांनी या मातीत रूजविली.

**देवमामलेदार श्री. यशवंतराव महाराज यांचा जीवनपट**

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नाव | – | पूज्य श्री यशवंत महादेव भोसेकर |
| मूळ गाव | – | करमभोसे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर कुलकर्णी हे जहागीरदार घराणे. |
| जन्मतारीख | – | बुधवार दि. १३ सप्टेंबर १८९५ |
| वडिल | – | पूज्य श्री महादेव धोंडोपंत भोसेकर |
| आई | – | पूज्य सौ. हरिदेवी (माहेर-पुणे) |
| भावंडे | – | एकूण ९ (भाऊ ८, बहिण १) |
| गुरूंचे नाव | – | भगवान श्री स्वामी समर्थ, अक्कलकोट |
| लग्नतारीख | – | वयाच्या १२ व्या वर्षी सन १८२७ |
| पत्नी | – | पूज्य सौ. सुंदरादेवी (सासरचे नाव : सौ. रूक्मिणीदेवी) |
| सन १८६९ | – | सटाणा (बागलाण) येथे इंग्रज सरकारने बागलाण तालुका मामलेदार - तहसिल कचेरी स्थापना केली. ८ मे १८६९ रोजी सटाणा येथे पहिले मामलेदार तहसिलदार म्हणून श्री. यशवंतराव महाराज रूजू झाले. |

सन १८७०-७१ = सटाणा-बागलाण तालुक्यात भीषण दुष्काळ परोपकारी-मातृहृदयी महाराजांनी स्वत:च्या अधिकारात गोरगरिब भुकेल्या याचक लोकांना १ लाख २७ हजार रूपये एवढा सरकारी खजिना वाटला. प्रांतसाहेबांचा संताप. खजिना तपासणी पण खजीना पूर्ववत भरलेला दिसला. प्रांतसाहेब महाराजांपुढे नतमस्तक झाले.

सन १८७५ = देवमामलेदार म्हणून सटाणा-बागलाण वासियांनी गौरविले.

सन १८८७ = रविवार दिनांक ११ डिसेंबर, १८७७ मार्गशीर्ष वद्य एकादशी या दिवशी महाराज नासिक येथे स्वर्गवासी झाले.

सन १८८८ = सटाणा बागलाणवासीयांनी लवकरच आरामतही पूर्वीच्या बागलाण कचेरीसमोर महाराजांचे स्मारक म्हणजे मंदिर बांधकामास सुरूवात केली. एखाद्या शासकीय अधिकाऱ्याचे असे पहिलेच स्मारक म्हणजे येथील मंदिर.

सन १९०० = ११ डिसेंबर, मार्गशीर्ष वद्य एकादशी साधू देव मामलेदार श्री. यशवंतराव महाराजांचा पुण्यतिथी दिवस. सटाणा येथील पहिला यात्रोत्सव सुरू झाला.

देवमामलेदार हे शब्द म्हणजे सात अक्षरांचा मंत्र, त्यांच्या स्मरणात भक्तीची प्रेरणा आहे. जो त्यांना भजेल त्यांच्या जीवनाचा ते आधारस्तंभ बनतील. सामान्य माणसांचा आधार संतच आहेत. संत, माणुसकी स्वत:त आणि दुसऱ्यात जडवितात, हेच संत मामलेदारांनी केले. त्यांची मामलती म्हणजे सर्वांना न्याय होता, जरा ही भ्रष्टाचाराला वाव नव्हता. त्यामूळे शिष्टाचारांनाही तोच न्याय जो गोरगरिबांना न्याय असे. असे श्री. यशवंतराव देव बनले. देवाचे सौंदर्य, सामर्थ्य, ज्ञान यांच्यातच प्रगट झाले. अशा देव माणसांच्या किंवा देवपुरूषाच्या चरणी आमचं सदैव वंदन असो.

***

## ।। श्री यशवंत प्रार्थनाष्टक ।।

महाजान्हवी तैसि गोदावरी हे ।
सदा राम पद्मी यथास्थीर वाहे ।
तया गौतमी तीर महंता ।
नमस्कार माझा तया यशवंत ।।१।।
चिदानंद आनंद सानंद मूर्ती ।
सुकिर्ति सुखानंद पुर्णे दुदोप्ती ।
जगन्मान्य सामान्य आदित्य ज्योती ।
तथा चिंतने सर्व ही सिद्ध होती ।।२।।
जगी मान्य तो धन्य त्रैलोकी झाला ।
क्षमा शांती वैराग्य निर्वेर ठेवला ।
जगी शत्रूमित्रा समत्वे द्याब्धि ।।३।।
जगी आर्य औदार्य धैर्यासी वाणी ।
जपे नरसिंहा मुखी नम्रवाणी ।
सदा वाहिला दान धरमासी पाणी ।
दया सिंधू हे ब्रीद लोकात वाणी ।।४।।
महातत्त्व ज्ञाना हृदी साठवले ।

**-सोनवणे यामिनी योगेश**
(एफ.वाय.बी.कॉम.)

# बागलाणचा भूगोल

– **पवार रोहिणी भावसिंग** (टी.वाय.बी.ए.)

बागलाण हा महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यामधील समृद्ध असा तालुका आहे. बागलाण तालुक्यालाच सटाणा तालुका असे म्हणतात.

**भौगोलिक माहिती :–**

बागलाण तालुक्याचे क्षेत्रफळ १६१४.५ चौ.की.मी. असून बागलाणच्या पश्चिमेकडील भाग डोंगराळ आहे. सह्याद्री पर्वताच्या रांगा पसरलेल्या असून साल्हेरचा किल्ला, मुल्हेरचा किल्ला, तिळवणचा किल्ला, मांगीतुंगीचे डोंगर असा विस्तृत डोंगराळ परिसर आहे.

सटाणा हे शहर आराम नदीच्या काठावर बसलेले शहर आहे. बागलाण तालुक्यात आरम व मोसम या प्रमुख नद्या वाहतात. आरम नदीवर केळझर येथे धरण बांधलेले असून त्याचा बागायती शेतीसाठी उपयोग होतो. मोसम नदीवर हरणबारी येथे धरण बांधलेले असून त्याचा डावा व उजवा कालवा काढलेला आहे. त्या पाण्याचा शेतीसाठी मोठ्या प्रमाणात उपयोग होतो.

बागलाण तालुका १७१ गावांमध्ये विखुरला आहे. नामपूर, ताहाराबाद, डांगसौंदाने, ठेंगोडा, लखमापूर, जायखेडा ही प्रमुख शहरे आहेत. सटाण्यापासून ४०–५० किलो मी. अंतरावर नाशिक शहर आहे. २०११ च्या जनगणनेनूसार येथील लोकसंख्या ३७७०१ होती. सटाणा शहराची विविध नगरांमध्ये विभागणी झालेली आहे. मोरे नगर, आहिल्याबाई नगर, पाठक नगर, शरद नगर, पिंपळेश्वर इ. हे शहर देवमामलेदार यांचे कार्यक्षेत्र आहे. सटाणा शहरात देवमामलेदार यशवंत महाराज यांची १५ दिवसांसाठी यात्रा उत्सव त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त साजरा करतात.

सटाणा शहरात साक्षरतेचे प्रमाण ७५% असून ती भारताच्या सरासरी साक्षरतेपेक्षा ५९.९% जास्त आहे. सटाणा शहराला उत्कृष्ट दर्जाचे महाविद्यालय प्राप्त झालेले आहे. या महाविद्यालयात बागलाण तालुक्यातील तसेच इतर तालुक्यातील विद्यार्थिही शिक्षण घेण्यासाठी येतात. या महाविद्यालयात होस्टेलची उत्तम अशी सुविधा उपलब्ध आहे.

बागलाण तालुक्यात शैक्षणिक सुविधा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उर्दु शाळा, खासगी शाळा, महाविद्यालये, कला विद्यालये, इंग्रजी माध्यम शाळा व औद्योगिक प्रशिक्षण संस्था इत्यादी यात सर्वधर्मांचे लोक शिक्षण घेतात.

बागलाण हा एक कृषी प्रधान तालुका आहे. बागलाणच्या पुर्वेकडील भाग सखल व सुपीक जमिनीचा आहे. या भागात ऊस व कांदा ही बारमाही पिके घेतली जातात. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करून द्राक्ष व डाळींब बागा विकसित केल्या आहेत. तसेच बाजरी, भुईमुग, मका, कपाशी, गहु व हरबरा ही पिके घेतली जातात.

बागलाण तालुक्यात सर्व प्रकारच्या मार्केटची सोय उपलब्ध आहे. उदा. सटाण्यातील कांदा, मार्केट, धान्य मार्केट, नामपुरचे कांदा मार्केट, ताहाराबादचे भाजीपाला मार्केट इ. तालुक्यातील सर्व शेतकरी आपला शेतमाल या मार्केटांमध्ये विकण्यासाठी येतात.

या सर्व सुविधांबरोबरच तालुक्यात आरोग्य सुविधा सुद्धा उत्तम दर्जाची आहे. सरकारी दवाखाण्याबरोबरच खाजगी दवाखानेही उपलब्ध आहेत. तसेच सटाणा शहराला उत्तम दर्जाचा बस स्टॅण्ड सुद्‌धा उपलब्ध आहे. सटाणा शहरात शनिवारी आठवडा बाजार भरतो. शहरात किंवा तालुक्यात चलनव्यवहारासाठी बँक सुविधाही उपलब्ध आहेत.

बागलाण तालुक्यात ठेंगोडा येथे सुतगिरणी व शेवरे येथे साखर कारखाना कार्यरत आहेत. बागलाण तालुक्यात हिंदू, मुसलमान, जैन इ. मुख्य धर्मातील लोक गुण्यागोविंदाने एकत्र वास्तव्य करतात. सामाजिक परंपरेनुसार सण व उत्सव साजरे केले जातात. त्यात सटाणा येथे देवमामलेदार यात्रा, मुल्हेर येथे 'रासक्रिडा' हे उत्सव होतात.

सटाण्याच्या शेजारी ८ ते ९ किलो मीटर अंतरावर ठेंगोडा हे गाव आहे. ते गिरणा नदीच्या काठावर बसलेले आहे. तिथे श्री सिद्धी विनायकाचे मंदिर आहे. हे ठेंगोडा गावचे ग्रामदैवत असून पंचक्रोशीत सुप्रसिद्ध आहे. हा तालुका सांस्कृतिक परंपरेबाबत नाशिक जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. तसेच बागलाण तालुक्यात श्री क्षेत्र दोधेश्वर, तिलकेश्वर कपालेश्वर या शिवलिंग आहेत. अनेक भाविक तेथे दर्शनाला येतात.

**ऐतिहासिक वैशिष्ट्ये :-**

बागलाण तालुक्याला पुरातन काळापासून ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. बागलाण तालुक्यात इ.स. १३०० ते १७०० या कालखंडात बागुल घराण्यातील राज्य करीत होते. त्यांच्या नावावरून या प्रदेशाला बागलाण हे नाव पडले.

छत्रपती शिवाजी महाराज सुरतेची लुट करून या तालुक्यात परतीला निघाले होते. त्यावेळी साल्हेर-मुल्हेरची लढाई झाली. या लढाईचा "Rise of the Maratha Power" या पुस्तकात रानडेंनी उल्लेख केलेला आहे.

बागलाण संतांची भूमी आहे. वैकुंठवासी यशवंतराव महाराजांनी भीषण दुष्काळात दामाजी पंतासारखी भूमिका बजावून भूकेलेल्यांना अन्न दिले, जनावरांचे प्राण वाचविले. त्यांना देव मामलेदार नाव भूषविले.

असा हा बागलाण तालुका मनमोहकवणारा ऐतिहासिक आणि भौगोलिक दृष्ट्या बघण्यासारखा आहे. तसेच सामाजिक, सांस्कृतिक दृष्ट्या ही बागलाण तालुका अतिशय समृद्‌ध आहे. म्हणूनच नाशिक जिल्ह्यात समृद्‌ध असा तालुका म्हणून ओळखला जातो.

***

## महाराष्ट्र की लोककला

– **पवार रोहिणी भावसिंग** (टी.वाय.बी.ए.)



महाराष्ट्र के लोकसाहित्य मे गीत, कथार, कहावते, मुहावरे, लोकनाट्य आदि का प्रमुखता से समावेश होता है । इन सारी लोकसाहित्य की विद्याओं का अपना अपना अलग महत्त्व एवं विशेषताएँ है । इसमें भी लोकनाट्य तमाशा महाराष्ट्र में प्रसिद्ध है । तमाशा नाटक का ही एक रूप है । तमाशा शब्द का अर्थ मनोरंजन है । कुछ शोधकर्ताओंका मानना है कि संस्कृत के नाटक रूपों– प्रहसन और भान से इसकी उत्पत्ती हुई है । इस लोककला के माध्यम से महाभारत और रामायण जैसी पौराणिक कथाओंको सुनाया जाता है । इसमे वाद्य के रूप में ढोकली, ड्रम, तुनतुनी, मंजीरा, डफ, हलगी, कड़े, हारमोनियम और घुघरूओं का प्रयोग किया जाता है ।

महाराष्ट्र के कोल्हाटी समुदाय द्वारा तमाशा प्रस्तुत किया जाता है । इसे प्रस्तुत करने के लिए किसी मंच इत्यादी की जरूरत नही होती है । किंतू मंच सज्जा से तमाशा मे अधिक सजीवता एवं सरसता आ जाती है । तमाशा किसी भी खुले स्थानपर भी किया जा सकता है।

भारत में नाट्य की परंपरा अत्यंत प्राचिन काल से चली आ रही है । भरत मुनि ने 'नाट्यशास्त्र' ग्रंथ मे नाटक पर विशद वर्णन किया है । नाट्यशास्त्र ग्रंथ को नाट्यविद्या का सबसे मौलिक तथा स्रोतग्रंथ माना जाता है । महाराष्ट्र मे तमाशा की शुरूआत १६ वी सदी में हुई थी । तमाशा लोकमनोरंजन का प्रमुख साधन है । मनोरंजन के साथ इसमें रामायण तथा महाभारत जैसी पौराणिक कथाओं को सुनाया जाता है । तमाशा की शुरूआत भगवान गणेश की वंदना से होती है । इसके बाद गलवाना या गौलनियर गार जाते है । मराठी धर्म–साहित्य में ये कृष्णलीला के रूप में है, जिसमें भगवान कृष्ण के जन्म की विभिन्न घटनाओं को दर्शाया जाता है । तमाशा मे जिस कथा को प्रस्तुत किया जाता है । उस कथानुसार उसकी भाषाशैली एवं रंगमंचियता होती है । तमाशा नाट्य को चार भागो या अंको में प्रदर्शित करते है, ये क्रमश: गण, गवलान, बताऊनी और वद्य के रूप में होता है ।

लोककला को महाराष्ट्र में मूल्यवान वैभव की तरह सम्हाल करके रखा गया है । यहां इन कलाओं का उद्‌भव ग्रामीण लोकरंजन और ज्ञानोपदेश के लिए हुआ । यद्यपि कुछ लोककलाएं धार्मिक एवं अध्यात्मिक आस्था से भी जुडी है । जिस समय आर्थिक एवं शैक्षणिक दृष्टी

से दुर्बल समाज को शिक्षा के अवसर प्राप्त नही थे तब इन लोककलाओं के माध्यम से उन्हे ज्ञान प्रदान किया जाता था । महाराष्ट्र को सुत्र में जोडे रखने का काम भी इन लोक कलाओं ने किया है । इसलिए ज्ञान से लेकर मनोरंजन तक यहां की सप्तरंगी एवं सप्तसुरों की लोककला का महत्त्व बना हुआ है ।

भारत वर्ष के विभिन्न प्रांतो मे अनेक प्रकार के लोकनाट्य जैसे-उत्तर प्रदेश में स्वांग या नौटंकी, गुजरात में भवाई, बंगला व बिहार मे जात्रा, गम्भीर इत्यादी प्रचलित है । दक्षिण-भारत में यक्षगान, विधिनाटक, कामन-कोटू इसी कोटी के है । महाराष्ट्र में इसी तरह परम्परागत लोकनाट्य, भारूड, दशावतार, और तमाशा प्रसिद्ध है ।

महाराष्ट्र संतो, महर्षियो, वीरों, वीरांगनाओं और साहित्य कला परखियो का प्रदेश है । यहां की ग्रामीण अज्ञानी, अंधश्रद्धालु, निर्धन व रुग्ण समाज को आगे लाने के लिए समाज सुधारकों के साथ ही कलाकारों कवियों, संगीतकारों बडा परिश्रम किया है । उन्होने अपनी कला के माध्यम से मनोरंजन, प्रबोधन, सजगता देशभक्ति, राष्ट्रीय एकात्मता बढाकर समाज को एक नयी दिशा दिखायी ।

'तमाशा' मुलत: अरबी भाषा का शब्द है, जिसका अर्थ है आनंद, लुफ्त, नाटक आदि का खेल या स्वांग इसतरह तमाशा मनोरंजन, सांत्वना और प्रबोधन का साधन था । इसमें किसी प्रकार के जाति, धर्म, संम्प्रदाय का बंधन नही था । आज भी महाराष्ट्र मे पचास से अधिक संगीत पार्टियों के थिएटर, कला केंद्र व रंगमंच है । यद्यपि पहले शहरी व पढे-लिखे समाज द्वारा तमाशा को अस्पृश्य मानकर, उसकी उपेक्षा की गयी, किन्तु अब वही वर्ग सिनेमा की तरह रंगमंच की 'लावणी' का आनंद ले रहा है । यही नही आज लावणी अमेरिका, यूरोप, ऑस्ट्रेलिया में सन्मान पा रही है ।

खेतिहर एवं श्रमनिष्ठ पुरूषों का रंगीला अंदाज तमाशा मे ही देखने को मिलता है । पेशवा काल मे युद्ध भूमि से थके-मांदे लौटे सैनिकों के मनोरंजन का यह प्रमुख साधन था । आनंद के भावातिरेक में झूमना, सीटियों की सनसनाहट, अत्यंत प्रसन्नता मे हवा मे उछाला गया । साफा तमाशा देखने के दौरान ही दृष्टिगोचर होता है । मराठी मन जिसतरह से अध्यात्म को अपने जीवन में महत्त्व देता है, उसी तरह रंगबाजी और मनोरंजन को भी हृदय के दरवाजे खुले रखता है । दर्शको को अपने ताल में बांधकर रखनेवाली ढोलकी के तालपर पैरों में घुंगरू बांधकर थिरकनेवाले 'नर्तक' या नर्तकियाँ महाराष्ट्रीय मन को मोहित करती है ।

महाराष्ट्र की लोककलाओं में पहले से ही प्रचलित गोंधल, मुरकी, पोवडा इत्यादी मे से एक-एक गुण लैकर एक अलग लोककला तमाशा की रचना की गयी आज तमाशा पुरे महाराष्ट्र में प्रस्तुत किया जाता है । तमाशा के कलाकारों के दल को 'फड' कहा जाता है । फड का मुखिया 'नाईक' कहलाते है । पहले ये ढ़ोलकी या हलगी बजाने मे भी माहिर होते थे ।

तमाशा के पात्रों मे नायक, नायिका, सोंगाड्या (भांड) प्रमुख होते है । नर्तक के साथ तिन-चार अन्य नर्तकियाँ होती है । जो नायिका के साथ नाचति है । इनके साथ बाजा बनानेवालो में तुणतुणेवाला, हलगीवाला, खंझडीवाला, हॉर्मोनियमवाला होता है । तमाशा प्रस्तुत करने के लिए किसी तरह की विशेष वेशभूषा या परदा की आवश्यकता नही होती किसी वृक्ष के चतुर्दिक बनाये गए चबूतर किसी उंची जगह खुले मैदान में या दर्शकों के घेरे में तमाशा आयोजित किया जा सकता है । उत्तम ग्रामिण भाषा में देवेअर्थक संवाद बोलते तमाशा के पात्र रसिकजनों को हसते-हसते लोट-पोट कर देते है ।

महाराष्ट्र के लोककला के अंतर्गत लोकनाट्य तमाशा का अपना अलग स्थान एवं महत्त्व है ।

***

# गोंधळ : संस्कृति और कला का सुंदर रूप

– **डॉ. दीपा दत्तात्रय कुचेकर** (टी.वाय.बी.ए.)



गोंधळ विधिनाट्य को प्रस्तुत करनेवालों को गोंधळी कहा जाता हैं । इनकी उपजीविका माता भवानी के नाम का गजर करना और भिक्षा मांगना है । गोंधळी देवी के उपासक होते है । घर के मंगलकार्यों का समापन गोंधळ से किया जाता हैं महाराष्ट्र में गोंधळीयों की मराठे, कुंभार, कदमराई और रेणुराई उपजातियाँ है । रेणुराई यह माहुर की रेणुका माता के भक्त होने से उसी की उपासना करते है । इन्हें रेणुरारा या कदमराव कहाँ जाता हैं । कदमराई यह तुलजापुर की भवानी माता के भक्त होने से उसी की पूजा अर्चना करते है । उसी को विराजित करते है । गोंधळ का विधिनाट्य होने से इसे 'गोंधळ घालने' कहाँ जाता है । गोंधळ यह विवाह संस्कार में की एक विधि है । जो कुलाचार के रूप में अनन्य साधारण स्थान रखती हैं । इनमें स्त्री नहीं होती केवल चार या आठ पुरुष होते हैं । इनमें एक मुख्य और अन्य उसके साथी होते हैं।

गोंधळ आरंभ करने से पूर्व पाँच गन्नों की मखर की जाती है । उस में बीचों-बिच देवी रूप में घट रखा जाता हैं । कलश की पूजाकर देवी का आवाहन किया जाता हैं और गोंधळ को शुरुआत होती है । गोंधळी गुरु परंपरा के रूप में गोंधळी समाज के लोक ही इसे प्रस्तुत करते है । प्राचीन काल से विशेषतः तुळजाभवानी और रेणुका माता इन देवताओं के संदर्भ में गोंधळ घालने की पैतृक परंपरा है । अब अन्य देवियों के भी गोंधळ किए जाते है । अनेक देवताओं को आवाहन कर बुलाया जाता है । संबळ के नाद पर या काकडों को थामकर, दिवटी जलाकर गोंधळ किया जाता है ।

गोंधळ की शुरुआत गन से होती है । इस में गणेश जी को नमन किया जाता हैं । इसके पश्चात देवताओं को आमंत्रित किया जाता हैं । पारंपरिक रूप में पृथ्वी, आकाश, पाताल आदि सभी देवता को जी कहते है –

**द्वैत सारुनी माळ मी घालीन**
**हाती बोधाचा झेंडा मी घेईन**
**भेद रहित वारीस जाईन**
**ऐसा जोगवा जोगवा जोगवा मागेल ।**

जोगवा मांगकर इस गोंधळ विधि का समापन किया जाता हैं और आरती उतारी जाती हैं । फिर सभी को प्रसाद रूप में भोजन पाया जाता हैं ।

***

# 'बहुरूपी' एक लोककला

– **अनिस पटेल** (हिंदी विभाग, कनिष्ठ महाविद्यालय)



**तुंबडी भरना, बाजीराव नाना**
**घरी नाही दाना, हवालदार माना**
**सशावानि ताना, नाव ठेवा नाना**
**धनवकी माल बोलो, परभणी का जाना**
**राजा का घोडा बोले, बैठने को देना**
**चिंदे की बाल बोले, बुड्ढे को देना ।**

काही वर्षांपूर्वी हे लोकगीत गावा गावांमध्ये कायम कानावर पडत असे, पूर्वी एखादे रूप किंवा सोंग घेऊन चेहऱ्यावर मुखवटा चढवून गावा-गावात बहुरूपे येत असत व हे बहुरूपे या प्रकारची लोकगीते गाऊन दारोदारी फिरून धान्य किंवा काही द्रव्य मागत असत व आपल्याकडे असणाऱ्या कलेद्वारे लोकांचे मनोरंजन करत असे, त्याकाळी मनोरंजनाची इतर साधने उपलब्ध नव्हती व लोकगीते पसंत केली जायची, हे लोक विविध सोंग घेऊन करमणूक करून मिळालेल्या दानातून किंवा भिक्षेतून आपला उदरनिर्वाह करत असत. बारा बलुतेदार पद्धतीने गावाचा सर्व व्यवहार चालत असे, परंतु कोणत्याही विशेष जाती जमाती मनोरंजन करण्यासाठी मात्र हे काम करत नसत किंवा बहुरूपी यांच्या जाति संस्था नव्हत्या, ज्या लोकांमध्ये कला होती ते आपली कला दाखवून लोकांचे मनोरंजन करण्याचे काम करत असत, त्यातीलच एक वर्ग बहुरूपी म्हणून नावारूपास आलेला होता.

बहुरूपी म्हणजे अनेक रूपे घेऊन किंवा सोंग घेऊन लोकांचे मनोरंजन करणारा. 'रायरंद' 'रायविनोदी' 'विदूषक' किंवा 'खुशमस्कऱ्या' या अर्थाने बहुरूपींना संबोधले जात असत. 'बहुरूपी' या शब्दाची व्युत्पत्ती भारतीय संस्कृती कोशात भिक्षेकरी म्हणून केलेली आहे. बहु-म्हणजे अनेक व रूपे म्हणजे ठराविक भूमिकेचं दृश्य स्वरूप, ही जमात मुख्यत्वे महाराष्ट्रात आणि इतरत्रही आढळते, संतांनी सुद्धा बहुरूपी या शब्दाचा उपयोग केलेला आहे, संतांनी ईश्वराला सुद्धा 'खेळीया' असे म्हटलेले आहे खेळीया म्हणजे खेळ करणारा, नाना रूपे घेणारा तो बहुरुपी ईश्वर... संत तुकारामांनी आपल्या एका अभंगात ईश्वरा विषयी ''बहुरूपी रूपे नटला नारायण, सोंग संपादून जैसा तैसा...'' असा उल्लेख केलेला आहे. म्हणजेच भारतीय जीवन रीती मध्ये बहुरूपी या संकल्पनेचा सांस्कृतिक व धार्मिक संदर्भही जोडला गेलेला आहे,

शिवाजी महाराजांच्या काळातही अशा बहुरूप्यांची स्वराज्यासाठी गुप्तहेर म्हणून कार्य केल्याची उदाहरणे इतिहासात सापडतात यांचे प्रमुख वाद्य म्हणजे तुंबडी, तुंबडी एक वाळलेला कोहळा असतो या कोहळ्याला वरून काठी लावतात आणि एक तार जोडून वर घुंगरू

बांधतात व काही वेळेस वेशभूषा किंवा सोंगाच्या आवश्यकतेनुसार बहुरूपे पायात घुंगरू बांधून नृत्य करतात. ही भटकी जमात शिक्षण, रोजगार, व्यवसाय या सुविधांपासून अतिशय अलीप्त राहिलेली जमात काम मिळत नाही रोजगारासाठी भांडवल नाही व पर्यायी व्यवस्था पोटापाण्याची सोय व्हावी म्हणून सकाळीच एखादं सोंग घेऊन घराबाहेर पडतात व दिवसभर उन्हातान्हात भटकून नाचून गाऊन शे पन्नास रुपये मिळाले तरी खूश होतात. दिवसभरात काही मिळाले नाही तर रात्रीची चूल पेटणारी नसते म्हणून दिवसभर वणवण भटकणारी ही जमात खिशात दमडी नसतानाही जगण्याचा आनंद देतात व स्वतःही घेतात. ज्यांच्या दारात हे बहुरूपी म्हणून उभे राहतात त्यांना ते क्षणिक का होईना आनंद देऊन जातात. कुणाच्या दारातून ओंजळी भर धान्य, पाच दहा रुपये मिळाले तरी ते त्याबदल्यात भरभरून आशीर्वाद देतात. दोन वेळेच्या जेवणाची सोय व्हावी एवढीच त्यांची माफक अपेक्षा असते.

अनेक जण आपलं जगणं समृद्ध व्हावं म्हणून समाजात वेगवेगळे मुखवटे लावून जगत असतात त्याद्वारे लोकांची फसवणूकही करत असतात व आपला फायदा करून घेतात. आणि हे करत असताना आपला खरा चेहरा जगासमोर येऊ देत नाही. परंतु बहुरुप्याचा मुखवटाच त्यांचा खरा चेहरा असतो. त्यांच्या रूपातून व मुखवट्यातून अनेक ज्वलंत विषय ते जगासमोर मांडत असतात. अंधश्रध्दा निर्मूलन, स्वच्छता, आरोग्य, देवी-देवतांची कार्ये, नीती, अनीती, मानवता तसेच मानवी जीवनाच्या संघर्षाच्या अनेक कथा ते आपल्या मुखवट्याच्या माध्यमातून व्यक्त करत असतात. त्यानिमित्ताने त्यांच्याकडून समाज सुधारण्याचे कार्य ही घडत असते. हे बहुरुपी कोणत्याही प्रकारचे सोंग घेण्यात अतिशय पटाईत असतात. विविध पक्षांचे आवाज काढणे, नकला करणे, नृत्य करणे, गाणे म्हणणे, आणि विशेष म्हणजे त्यांच्या जिभेवर साक्षात सरस्वती नांदते. त्यामुळे जन माणसांना आकर्षित करून घेण्याची कला त्यांना चांगली अवगत असते. यांची सोंगे वेगवेगळ्या प्रकारची असतात. हे रामायणाचे पात्र घेऊन येतात. महाभारत असेल पुराणातील कथा, देवी-देवतांची सोंगे, पोलीस, व्यापारी, अधिकारी, लुळे-पांगळे, व्यक्ती, जर्जर म्हातारे, साधू, यमराज, असे विविध प्रकारचे मुखवटे किंवा तसा पोशाख करून येतात आणि सर्वांना खूप हसवतात यांच्या नकला इतक्या हुबेहूब असतात की त्या कधी कधी खऱ्या वाटायला लागतात आणि त्यातून मग आपोआपच विनोद निर्माण होतात आणि चांगल्या प्रकारचे मनोरंजन याद्वारे ते करतात.

या जमातीचा पूर्वीपासून आजही संघर्ष सुरूच आहे. यांच्या मुलांना शिक्षण मिळत नाही, घरात खायला अन्न मिळत नाही, सुरक्षित निवारा उपलब्ध नाही या साधारण सर्व सामान्य गरजा सुद्धा पूर्ण करण्यासाठी यांना धडपड करावी लागते. गावोगाव भटकावे लागते, परंतु या लोककला या जमाती मुळेच जिवंत राहू शकलेल्या आहेत. नाहीतर ही उत्तम कला कधीच संपुष्टात आली असती. या कलेतून त्यांना खूप काही उत्पन्न मिळत नाही तरीही ते कला जिवंत रहावी म्हणून प्रयत्न करत असतात.

इतर भटक्या जमातीं सारखेच हे लोकही अंधश्रद्धेला बळी पडलेले आहेत. कोंबडे कापणे, नवस करणे, गंडे-दोरे बांधणे हे सर्व प्रकार बहुरूपी समाजा मध्येही बघायला मिळतात. परंतु तरीही एकूणच विचार केला तर लक्षात येते की बहुरूपी जमात ही आजच्या शहरीकरणात व आधुनिक झगमगाटात सुद्धा पोटासाठी गावोगाव भटकताना दिसते. आपणही त्यांना आधार दिला पाहिजे, त्यांना मदत केली पाहिजे, त्याद्वारे त्यांचा उदरनिर्वाह होईल आणि आपली लोककला सुद्धा सुरक्षित राहील.

***

# बागलाण : समाज आणि संस्कृती

– **छाया वनाजी पगारे** (एफ.वाय.बी.एस्सी.)

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यातल्या नाशिक जिल्ह्यातील (नाशिकपासून ९० किमी ईशान्य दिशेला) बागलाण तालुका म्हणजेच सटाणा तालुका. सटाणा हे तालुक्याचं गाव. सटाण्यापासून वायव्य दिशेला गुजरात राज्यातील डांग भागाची सीमा फक्त ४० किमी अंतरावर आहे. गावाजवळून वायव्य-आग्नेय या दिशेने आरम नावाची लहान नदी वाहते. सटाण्यापासून दहा किमी पुढे गिरणा नावाच्या नदीशी आरमचा संगम होतो.

बागलाण हा नाशिक जिल्ह्यामध्ये सर्वात समृद्ध असा तालुका म्हणून ओळखला जातो.

**बागलाण :**

बागलाण तालुक्याला पुरातन काळापासून ऐतिहासिक महत्त्व आहे. बागलाण तालुक्यात इ.स. १३०० ते १७०० या कालखंडात बागुल घराण्यातील राजे राज्य करीत होते. बागुल राजाच्या नावावरून या प्रांताच नाव बागलाण आहे. बागुल या राठोडवंशीय राजांची वंशावळ इ.स. १३०० पासून सापडते. बागुल राजघराण्यातील चौपन्न राजांची नामावली ही आज उपलब्ध आहे. बागुलांकडून बागलाण पेशव्यांकडे गेले आणि पेशव्यांकडून इंग्रजांकडे. वाघांचं रान म्हणजे बाघांचं रान. बाघरानचा अपभ्रंश बागलाण झाल्याचीही व्युत्पत्ती सांगिली जाते.

**बागलाणचा समाज आणि संस्कृती –**

बागलाण तालुक्यातील समाज १७१ गावांमध्ये विखूरला आहे. सामाजिक रचनेनुसार ६६ गावातील आदिवासी समाजामुळे आदिवासी गावे, १०५ गावात बिगर आदिवासी समाज असे दोन विभाग पडले आहेत. बागलाणची प्रमुख बोली भाषा 'अहिराणी' आहे. आदिवासी भागात आदिवासी, कोकणी, भिल्ली इत्यादी पोटभाषा बोलल्या जातात.

बागलाण तालुक्यात पारंपारिक सण-उत्सव साजरे केले जातात. त्यात गुढीपाडवा, नागपंचमी, होळी, रंगपंचमी, पोळा, दसरा, दिपावली, नवरात्र, गणपती उत्सव इत्यादी सण-समारंभ साजरे केले जातात.

तालुक्यातील जमीन काळी, कसदार असून शेतीला अतिशय उपयुक्त अशी आहे. बाजरी, गहू, हरभरा, ऊस, कपाशी, मका, कांदा, कडधान्य (कठान) ही पारंपारिक खरीप-रब्बी पिके असून अलीकडे द्राक्षे आणि डाळींबची मोठ्या प्रमाणात व्यावसायिक पिक घेतली जातात.

बागलाण तालुक्यात प्रामुख्याने शेती हा मुख्य व्यवसाय आहे तसेच पशुपालन, कुक्कुट पालन, घोंगड्या विणने, फडक्या रंगवीणे हे व्यवसाय परंपरागत आहेत. बागलाणचे प्रमुख स्वातंत्र्य सैनिक नरहर गोपाळशेठ व त्यांचे सहकारी यांनी सामाजिक परंपरा जिवंत ठेवल्या आहेत.

बागलाण तालुक्यात ठेंगोडा येथे सूतगिरणी, शेवरे येथे साखर कारखाना कार्यरत आहेत. बागलाण तालुक्यात हिंदू, मुसलमान, जैन इ. मुख्य धर्मातील लोक गुण्यागोविंदाने एकत्र वास्तव्य करतात. सामाजिक, परंपरेनुसार सण व उत्सव साजरे केले जातात. त्यात सटाणा येथे देवमामलेदार, मुल्हेर येथे ''रासक्रिडा'' हा उत्सव तसेच सटाणा नगरी येथे ''दही-हंडी'' हे उत्सव होतात.

बागलाण प्रांताचे राजे बागुल यांनी सहा ठाणे वसवले होते असे म्हटले जाते. हा (सहा ठाणे वसण्याचा) काळ दंतकथातून. इंग्रजांच्या काळापर्यंत पुढे सरकत राहतो. चौदाव्या पंधराव्या शतकापासून आजच्या सटाण्याच्या आजूबाजूला जी सहा ठाणे वसली त्या

ठाण्यांच्या अपभ्रंश म्हणजे सटाणा झाले असावे, अशी एक व्युत्पत्ती सांगितली जाते. कसमादे मधील स म्हणजे सटाणा म्हणजेच 'बागलाण'. २०११ च्या जनगणेनुसार येथील लोकसंख्या ३७७०१ होती.

बागलाण भुप्रदेश हा दख्खनच्या पठाराचा लहानसा भुभाग आहे. जो कठीण व काळ्या अग्निजन्य खडकापासून बनलेला आहे. या पठाराची पश्चिम कडा तीव्र उताराची असून त्यास सह्याद्री असे म्हणतात. सह्याद्री पर्वत रांगाचा उगम बागलाणातूनच होतो त्यात सेलबारी व डोलबारी असे दोन प्रकार पडतात.

धार्मिक, अध्यात्मिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक, निसर्गाची साथ लाभलेल्या, देवतेंचा आशिर्वाद लाभलेल्या, संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या, महापुरूषांच्या आशिर्वादाने परिपूर्ण झालेल्या, स्वत:ची एक वेगळी ओळख, वेगळी बोलीभाषा, कणखर, धाडसी व तेवढाच मनमिळाऊ माणूस घडविणाऱ्या बागलाणची थोडक्यात ओळख ''बागलाण: समाज आणि संस्कृती'' यातून आपणा समोर मांडत आहोत !

बागलाण संताची भूमी आहे. वैकुंठवासी यशवंतराव महाराजांनी भीषण दुष्काळात दामाजी पंतासारखी भूमिका बजावून भुकेलेलांना अन्न दिले, जनावरांचे प्राण वाचवले. म्हणून त्यांना पुढे 'देवमामलेदार' म्हणून नाव भूषविण्यात आले. सटाणा हे देवमामलेदार यशवंतराव महाराजांचे निवासस्थान होते. त्यांच्या मृत्यूनंतर सटाण्यात त्यांचे भव्य मंदिर बांधण्यात आले. दरवर्षी भव्य रथ निघतो. डिसेंबर महिन्यामध्ये पंधरा दिवस मोठी यात्रा भरते. लाखोंच्या संख्येने भाविक दरवर्षी यात्रेला येतात.

देवमामलेदार हे सटाण्याचे लोकदैवत आहेत. गावाजवळच्या आराम नदीकाठी देवमामलेदार यांच्या मंदिरात दर्शन घ्यायला आजुबाजूच्या खेड्यांवरील लोक कायम येत असतात. त्यांनी केलेले काम पुढच्या पिढिला



समजावे म्हणून त्यांच्या मंदिराजवळच भव्य स्मारक उभारण्यात आले आहे.

बागलाणात अनेक विभुती मंदिरे, तिर्थक्षेत्रे आणि पर्यटन क्षेत्रे आहेत. यात उपासनी महाराज, उध्दव स्वामी, पद्मनाभ स्वामी, नयन महाराज, दावल मलिक आदि विभुती आणि महालक्ष्मी मंदिर, मांगीतुंगी, आलियाबाद, देवळाणे, कपालेश्वर, दोधेश्वर येथील मंदिरे व साल्हेर-मुल्हेर किल्ले यांचा समावेश आहे.

महालक्ष्मी मुर्ती मुल्हेर येथील गणेश तलावात सापडलेली होती. तेथील लोकांनी महालक्ष्मी व प्रद्युम्न नारायण तलावातून बाहेर काढून किल्ल्यावरील एका झाडाजवळ ठेवल्या होत्या. सन १८७५ मध्ये विष्णुदास महाराजांनी महालक्ष्मी व नारायण प्रतिष्ठापने करिता विष्णुयाग यज्ञ केला. व त्या यज्ञाच्या यजमान पदी श्री. देवमामलेदार यशवंतराव महाराज होते. त्यांनी ती महालक्ष्मीची मुर्ती सटाण्यात आणली तेव्हा पासून खऱ्या अर्थाने सटाण्यात ऐश्वर्य आले.



कंपार भावना हे हरगड किल्ल्याच्या पाठीमागे असलेल्या किल्ल्यात, डोंगरांच्या कपारीत ६५ फुट आत अष्टभुजा देवीची स्वयंभू मुर्ती आहे. इतिहास-शिवचरित्रात दोन वेळा या मंदिराचा उल्लेख आहे.

मार्ग-सटाणा-मुल्हेर-जाभोटी.



सटाण्यापासून ३० किमी अंतरावर मांगीतुंगी नावाचे जैन लोकांचे तिर्थक्षेत्र आहे. इथे संपूर्ण भारतातून श्रद्धेने जैन धार्मिक लोक येतात. काही पर्यटक म्हणून भेट द्यायला येतात. मांगीतुंगी मंदिरापासून डोंगराचा पायथा दोन कि.मीटर अंतरावर आहे.

मांगीतुंगी मंदिरात दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक भेट द्यायला येतात.




मांगीतुंगी हे जैन धर्मियांचे पवित्र क्षेत्र समजले जाते. तिथल्या डोंगराला मांगी व तुंगी या नावाची दोन शिखरे आहेत. या शिखरांच्या नावावरून या तिर्थक्षेत्राला व त्या गावालाही ''मांगीतुंगी'' हे नाव पडले.

डोंगराच्या पायथ्या जवळच्या गावाचे जुने नाव भिलवाड होते. परंतु आज ते मांगीतुंगी या नावानेच ओळखले जाते.

श्री क्षेत्र मांगीतुंगी हे क्षेत्र असे आहे की जेथे ९९ कोटी मुनी मोक्षाला गेले आहेत. डोंगरात ऋषभदेव भगवान महावीरांचे भव्य १०८ फुट उंचीचे शिल्प कोरले आहे.

मुल्हेर हा किल्ला महाभारतकालीन मयूरध्वज राजाने बांधला. ह्या किल्ल्याचा ७५०० वर्षाचा इतिहास आहे. तसेच ह्या किल्ल्यात ३५०० वर्षापूर्वीच्या भिक्षू लेणी





अजूनही अस्तित्त्वात आहेत. त्या किल्ल्यात सन १६३२ मध्ये राजा प्रताप शहा बागुल यांचा शिलालेख आहे.

महाराष्ट्रात जसा सर्वच उंच शिखराचा मान कळसूबाईचा तसा गड किल्ल्यांमध्ये सर्वाधिक उंचीचा मान साल्हेरचा. बागलाण हा मोक्षगंगा आणि अक्षगंगा या नद्यांमुळे समृध्द झालेला प्रदेश आहे. साल्हेर गडाचा घेरा साधारणपणे ११ किमी असून व्यापलेले क्षेत्र ६०० हेक्टर आहे.

दोधेश्वर हे तिर्थक्षेत्र सटाण्यापासून अवघ्या ९ कि.मी.वर उत्तरेला डोंगरांच्या कुशीत वसलेले आहे. हे तिर्थक्षेत्रही पूर्वी हिरव्यागार निसर्गाने नटलेले असायचे. चहुबाजूने असलेल्या डोंगरांवर हिरवेगार जंगल होते. मंदिर परिसरात तलाव, विहीर आजही आहेत.

बागलाण तालुक्यातील विरगावला कान्हेरी नदीच्या थडीवर पद्नाभ स्वामींची समाधी बांधली आहे. ह्या समाधीला श्यामदेऊळ ही म्हणतात.



पद्नाभ स्वामी हे मुल्हेरच्या उद्धव स्वामीचे शिष्य होते. विरगावला ज्या ठिकाणी आज त्यांची समाधी आहे तिथे ते कुटी बांधून राहात.

दरवर्षी आषाढ महिन्यात आषाढ वद्य सप्तमी ते चतुर्दशी पर्यंत श्रीमद्भगवत ग्रंथाचे वाचन करण्यात येते. आषाढ वद्य चतुर्दशी या पद्मनाभ स्वामींच्या पुण्यतिथीला समाधीला अभिषेक केला जातो. व याच दिवशी श्रीमद्भागवत ग्रंथ वाचन समाप्तीचा कार्यक्रम होतो. ग्रंथवाचन समाप्तीनंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे आषाढ अमावस्येला दरवर्षी यात्रा भरते व तेथील गावकरी तसेच आजूबाजूच्या खेड्यांवरील लोक तेथे दर्शनास येतात.

असा हा बागलाण तालुका ऐतिहासिक, धार्मिक, अध्यात्मिक, निसर्गाच्या स्पर्शाने पावन झालेल्या, महापुरूषांच्या आशिर्वादाने परिपूर्ण झालेल्या प्राचीन वसाहती व सांस्कृतिक वारसा पदोपदी पुढे नेण्याचा प्रयत्न बागलाणचे नागरिक करत आहेत.

***

# गीत देवा तुच यशवंत

## देवा तुच यशवंत, देवा तुच यशवंत,

दैवा तुच यशवंत, दैवा तुची आहे संत
माझा दैव यशवंत, माझा दैव यशवंत
माझा देव यशवंत, तुच साधु रूपी संत
प्रकट झाले दैव सत्ययान नगरीत, साधु संत रूपी दैव यशवंत
सटाण्याचा झाला तू दैव यशवंत, मामलेदार रूपी देवा तुच आहे संत
दैवा तुच यशवंत, दैवा तुच यशवंत........
माझा देव यशवंत, माझा देव यशवंत........
तुझी माने दैव एकची धर्म, तुची माने मातृ हृदयी प्रेम
तुची माने विकसित जीवन, तुची माने तेच प्रभू पूजन
दैवा तुच यशवंत, दैवा तुच यशवंत........
माझा देव यशवंत, माझा देव यशवंत........
तुझ्या येण्याने झाली पावन सत्यवान नगरी, पुण्यभूमी म्हणून ओळखली गेली सगळी
दैवा तुझी ही किर्ती गगनात मावेना, दैवा तुझी ही भक्ती मनात साठेना
दैवा तुच यशवंत, दैवा तुच यशवंत........
माझा देव यशवंत, माझा देव यशवंत........
गोरगरीबा केली मदत देवा तुम्ही, इंग्रज सरकारच्या किर्दित खजिना वाटुनी
दुष्काळात धाधून आले सत्यवान नगरी साठी, आशिर्वाद देवून जायी सर्व गण भक्तासाठी
दैवा तुच यशवंत, दैवा तुच यशवंत........
माझा देव यशवंत, माझा देव यशवंत........

**– तेजस मुळे**
(संगीत विभाग)

## जगण्याचा काय अर्थ

जगण्याला काय अर्थ
जगून पाहावं लागतं
दुःखाला काय अर्थ
हसून पाहावं लागतं
मरणाला काय अर्थ
जगून पाहावं लागतं
अभ्यासाला काय अर्थ
समजून घ्यावं लागतं,
यशाला काय अर्थ,
त्यासाठी धाडस असावं लागतं
बोलण्याला काय अर्थ
करून दाखवावं लागतं
शाळेत जायला काय अर्थ
घरी अभ्यास करावा लागतो.
शिक्षक शिकवतात त्याला काय अर्थ,
लक्ष देऊन ऐकावं लागतं.
पुस्तक धरून बसायला काय अर्थ
पुस्तक वाचून पाहावं लागतं.
परीक्षा देण्याला काय अर्थ
काय साध्य झाले ते पाहावं लागतं
जगण्याला काय अर्थ जगून पाहावं लागतं

**– मयुरी जाधव**
(एफ.वाय.बी.ए.)

## रथ निघाला

रथ निघाला निघाला
रथ निघाला
टाळ मृदुंग वाजे, डी.जे. बॅण्ड वाजे
आज आनंदी आनंद झाला
रथ निघाला निघाला...

या रथामध्ये माझ्या यशवंत देवाची स्वारी
आज गजबजली हो ही आमुची सटाणा नगरी
भक्त तल्लीन झाले. उत्सव जल्लोष झाले
भावभक्तीचा महापूर आला...
रथ निघाला निघाला...

बघा कसे सजले आमुचे सटाणा शहर
सडा रांगोळ्यांनी व्यापले सारे आवार
सुवासिनी येती, पूजा अर्चा करीती
दर्शनाने जीव शांत झाला...
रथ निघाला निघाला,...

आज सगळीकडे देव मामलेदारांचा गजर
फुल हारांचा हो दरवळला चोहीकडे गंध
मिरवणूक ही मोठी झाली दाटा-वाटी
सटाण्यात हा सोहळा झाला
रथ निघाला निघाला...

**– महेश मोहन पाटील**
(टी.वाय.बी.ए.)

# बागलाणची खाद्यसंस्कृती

– **साक्षी सर्जेराव ठाकरे** (एफ.वाय.बी.एस्सी.)

दर कोसावर भाषा बदलते असं म्हणतात. महाराष्ट्रा पुरतं बोलायचं तर इथे फक्त भाषाच नाही तर खाण्यापिण्याची रीतही बदलते. महाराष्ट्राला जसा संपन्न ऐतिहासिक वारसा मिळाला आहे. तसेच स्थिर, संपन्नता देणारे भौगोलिक स्थानही लाभले आहे. यामुळेच की काय, चौरस आहार ही संकल्पना मराठी माणसाच्या रोजच्या साध्या जेवणातही प्रत्यक्ष उतरली आहे. आणि हीच चौरसता आणि संपन्नता आमच्या बागलाण तालुक्याला लाभली आहे.

सुपीक जमीन, अनुकूल हवामान यामुळे आमचा बागलाण अन्न-धान्याच्या बाबतीत अधिक संपन्न आहे. बऱ्याच प्रकारची फळे, धान्य, कडधान्य, भाज्या यांचे उत्पादन घेणारा नाशिक जिल्ह्यातील महत्वाचा तालुका म्हणजे बागलाण ! या साऱ्या अनुकुलतेमुळे बागलाणची खाद्यसंस्कृती विविध अंगाने बदलली आहे. बांद्यापासून ते चांद्यापर्यंत त्या त्या विभागाची स्वत:ची अशी खाद्यसंस्कृती आहे. ती त्या त्या मातीत इतकी रूजली आहे की इंथली मुलं शिक्षण नोकरी निमित्त परदेशात गेलीच तर जाताना पापड, लोणची, भाजणी, चटपटीत चटण्या यांच्याबरोबरच त्यांच्या जिभेचे चोचले पुरविणाऱ्या असंख्य वस्तूंचे ओझे हसत हसत घेऊन जातात.

बागलाणमधील छोट्या-छोट्या प्रदेशांमधल्या सीमारेषा ह्या नुसत्या भौगोलिक नाहीत, तर त्या सांस्कृतिक देखील आहेत. यामुळे वैशिष्ट्यपूर्ण विभागीय खाद्यसंस्कृती बागलाणमध्ये उदयाला आली आहे. इथली सुपीक काळीशार माती आणि भाज्या, फळं यांची विविधता यामुळे इथली खाद्यसंस्कृती व्हेटीटेरीयन म्हणावी अशी, पण ग्रामीण भागात होण्याऱ्या कुक्कुट पालन, शेळीपालन यांमुळे मांसांहार म्हणजेच नॉन-व्हेज लव्हर पण टाळता येणार नाहीत. मसालेदार तिखट भाज्या, मूग-तूर-उडदाची वरणं, चटण्या पानातून ओसंडून वाहतात की काय अशी शंका यावी इतके प्रकार लोणची पापड आणि हो ! दाळीचे आणि गव्हारीचे वडे, भजे यांचे अनेक प्रकार इथे चाखायला मिळतात. सणासुदीच्या दिवसांत म्हणा किंवा पाहुण्यांसाठी म्हणा, पुरणपोळी महाराष्ट्रभर केली जाते. तसंच बागलाणमध्ये गच्च पुरणभरलेली मऊसुत पुरणाची पोळी असते. आवरण अगदी पातळ आणि गृहिणींचे कसब असे की अशा पुरणपोळीतून कुठेही पुरण इकडून तिकडून बाहेर डोकावत नाही. आंबट, गोड, तिखट या टोकाच्या चमचमीत-खमखमीत चवी इथल्या खाद्यसंस्कृतीत गुण्या गोविंदाने नांदतात.

चारिठाव म्हणावी अशी ही खाद्यसंस्कृती पालेभाज्या आणि फळभाज्या हे या संस्कृतीचा अविभाज्य भाग ! पालक, मेथी, तांदुळ्या, कर्दळी, चाकोत, शेपू आणि यांबरोबरच हरभऱ्याची दाळ घालून लसणा-मिरचीची फोडणी देऊन बनवलेली कांद्याची पात ! आणि तिखट-आंबट अशी खमखमीत असणारी हरभऱ्याच्या कोवळया पानांची रस्सा भाजी. बागलाणची ही भाजीसंस्कृती काही नवी नाही, पुर्वेचा 'मयुरगड' म्हणजेच आजचा कोकणी बांधा असलेले मुल्हेर हे गाव. या गावात प्राचीन परंपरा म्हणून एक ऐतिहासिक सण साजरा करतात. रासक्रिडा या उत्सवात मंदिरामध्ये 'पातळ भाजी' म्हणून एक भाजी बनवतात. यामध्ये बऱ्याच अशा भाज्या आणि हरभरा दाळीचा समावेश होतो. अशी ही लज्जतदार आंबट-तिखट भाजी बाजरीच्या भाकरीसोबत संपवितात. बागलाणमध्ये फक्त बाजरीचीच नाही तर ज्वारी, नागली, नाचणी आणि कुळीदाची भाकरी चवीने खाल्ली जाते.

ज्वारी-बाजरीच्या भाकरीवर लसणाच्या-मिरचीचा गोळा ठेऊन इथल्या मजूर बायका सकाळीच कामावर जायला सज्ज असतात. याबरोबरच दाळीच्या पिठाचं पीठलं, याची तर मज्जाच न्यारी !

'जिथे जे पिकतं तिथे तेच शिजतं' असं म्हणतात ते अगदी खरंय ! एक संपूर्ण आहार या प्रदेशात रूजलेला आहे. गव्हाच्या पोळीबरोबरच ज्वारी-बाजरीच्या भाकरी, मूग-तुरीची वरणं-भात, भाज्या, लोणची, पापडं, आणि तोंडी लावायला मिरचीचा ठेचा मोठ्या आवडीने खाल्ला जातो. कांदा म्हणजे इथल्या खाद्यसंस्कृतीचा प्राणच ! अगदी कांद्याच्या चटणी पासून तर कांदाभजी पर्यंत या कांद्याने मजल मारलेली आहे.

काळा मसाला हा इथल्या स्वयंपाकघरांचे वैशिष्ट्य! या मसाल्यात कांदा उन्हात वाळवून आणि नंतर चुलीवर भाजून टाकला जातो. यालाच 'करप' असेही म्हणतात. उन्हाळ्याच्या दिवसांत इथल्या गरीब-श्रीमंत सर्वच बायका काळा मसाला बनविण्याचा तामझाम करतात. यात करप आणि सुकं खोबरं आणि लाल मिरची चुलीवर भाजताना दिसतात. गल्लीतल्या सर्वच लोकांना रखरखीत उन्हात मिरचीची धूनी बसते !!! हाच काळा मसाला घालून बनविलेली दाळ-आमटी, वड्याचं बट्टं आणि चमचमीत असं कोशिंबिर टाकून बनविलेला मटनाचा रस्सां या सर्वांचा बाजरीच्या भाकरीबरोबर परफेक्ट बेत असतो. पाहुणेमंडळीसाठी कांदा-लसणाचा भरपूर झणझणीत वापर हे इथले वैशिष्ट्य.

पोळा हा सर्वच शेतकरी बांधवांचा सण. यासाठी हमखास पुरणाची पोळी, आंब्याचा रस, हरभऱ्याच्या डाळीची रस्सी म्हणजेच मसालेदार तर्रीवाली आमटी, भात, नागलीचे पापड, कुरडया, कांद्याची भजी असा भरगच्च बेत असतो. दिवाळीच्या दिवसांत करंज्या, चकल्या, नान, पिठीचे लाडू, बेसनाचे लाडू आणि हो ! शंकरपाळे तर असायलाच हवे. याबरोबरच शेव बनवली जाते शेवेची भाजी आणि बाजरीची भाकरी आणि कांदा लिंबू हा बेतही अनेक जणांकडे असतो. या सर्वांबरोबरच कांदा-बटाटा, टमाटा आणि खूपशा फळभाज्या टाकून बनवलेली तांदळाची खिचडी म्हणजे बागलाणी बच्चेकंपनीची 'फेवरेट मेजवाणी' सोबत उडदाचा पापड आणि गावराणी तूप आणि तोंड लावायला लोणचे. यांबरोबरच नाश्त्यामध्ये उपमा, पोहे, त्याबरोबरच ढिंडरे, मुटकुळे आणि गरमागरम कोंडाळे असतातच.

असा हा बागलाणचा खाद्य-प्रपंच...पुरणाच्या पोळी-पासून तर लसणा-मिरचीच्या ठेच्यापर्यंत आपल्या चमचमीत खमखमीत आणि कसबी वैशिष्ट्यपूर्ण चवींनी भारलेला आहे. आणि हो...इथल्या यात्रोउत्सवाची जिलेबी आणि खव्याचे पेढे यांची चव घेण्यासाठी लांबवरून खवय्यांची गर्दी यात्रेत लोटलेली असते.

***



# बागलाणची भाषा शैली

- **जितेंद्र सर्जेराव ठाकरे** (टी.वाय.बी.एस्सी.)

देव मामलेदार यशवंतराव महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला बागलाण तालुका, नाशिक जिल्ह्यातील महत्त्वाचा परंपरांना जपणारा, संस्कृतीला धरून चालणारा आमचा बागलाण तालुका !

आमचा बागलाण तालुका हा १७१ गावांमध्ये विखुरलेला आहे. सामाजिक रचनेनुसार येथे सर्व जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र वास्तव्य करतात, आणि रूढी परंपरांनुसार, संस्कृतीनुसार आपआपल्या परीने आपली संस्कृती जोपासण्याचा प्रयत्न करतात. याच वैशिष्ट्यामुळे बागलाण मध्ये खाद्यसंस्कृती, पोशाख, व्यावसायिकता, राहणीमान आणि येथील लोकांच्या भाषा संस्कृतीमध्येही कमालीची विविधता दिसते. तसे पाहता बागलाणची भाषा संस्कृती ही विविधतेने त्याच बरोबर तिच्या वैशिष्ट्यामुळे परिपूर्ण आहे.

खरे तर आपली राजभाषा मराठीचा वापर बागलाणकर करीत असतात. शैक्षणिक स्तरावर म्हणजेच शाळा, महाविद्यालये, दप्तरी कामकाज, वाचन-लेखन या सर्व ठिकाणी प्रामुख्याने मराठीचा वापर होतो. मराठी प्रमाणेच हिंदी व इंग्रजी या प्रमुख भाषांचा देखील बागलाणकर उपयोग करतात. या सर्व मुख्य भाषांबरोबरच बागलाणची स्वतंत्र, वैशिष्ट्यपूर्ण, आपलेपणा असणारी बोलीभाषा म्हणजेच 'अहिराणी', आणि या सर्वच बाबतीत समृद्ध असलेल्या अहिराणी बद्दल प्रत्येकच बागलाणकराला वाटतं 'मन्ही अहिराणीनी बातच न्यारी'

बोलीभाषांपैकी एक असणारी बागलाणकरांची अहिराणी.... मात्र या बोलीला एक मोठी अशी प्राचीन परंपरा आणि इतिहास आहे. आणि म्हणूनच अहिराणी ही बागलाणची मुख्य भाषा आहे व त्याच प्रमाणे ती स्वतंत्र भाषा म्हणून ओळखली जाते. आपल्याकडे दर बारा कोसांवर भाषा बदलली जाते असे म्हणतात, म्हणजेच तिथल्या संस्कृतीचा प्रभाव त्या-त्या बोलीभाषेवर पडतो आणि ती बदलत जाते. अहिराणी ही फक्त बागलाणची बोलीभाषा नसून ती बागलाणची संस्कृती, ओळख आहे. या अहिराणी पेक्षा बागलाणकरांची अहिराणी ही बोलीभाषा वेगळी आणि स्पष्ट आहे. बागलाण तालुक्यातील अहिराणी भाषेवर मराठी भाषेचा मोठा प्रभाव बघायला मिळतो. आणि यामुळेच ती शुद्ध, स्पष्ट व वैशिष्ट्यपूर्ण अशी बनलेली अहे. या अहिराणी भाषेवर त्या-त्या भागातील जातींचा प्रभाव आहे. म्हणून ही बोलीभाषा कमालीची वेगळी आहे.

बागलाणची अहिराणी ही खूप मधूर आहे. या भाषेची गोडी बागलाणकरांची दैनंदिन सवयच झाली आहे. या बोलीमध्ये सामाजिक भेद पडतात. जसे गुजरी, लाड, भिलाऊ कोकणी इत्यादी. बागलाण मध्ये सुमारे ७०% लोक अहिराणी बोलत असावेत, पण हा आकडा ग्राह्य मानता येणार नाही, कारण घरात अहिराणी बोलणारे सुशिक्षित लोक आपली भाषा मराठी सांगतात, त्यामुळे अहिराणी बोलणारे लोक वरील आकड्या पेक्षा जास्त असावेत. या थोड्याशा वर्णनावरून बागलाणकरांची अहिराणी वैशिष्ट्यपूर्ण आहे. उच्चारापुरते पाहिल्यास मराठीतील 'ला' या प्रत्यया ऐवजी 'ले' हा प्रत्यय वापरतात. तसेच 'असे'-'अशे', 'होतं'-'व्हतं', 'येतो'-येस आदि.

आहिराणी भाषा आज फक्त बोलीभाषा म्हणून उरली असली तरी या भाषेचा लिखीत पुरावा इ.स. १२०६ चा मिळतो पण पाटण या गावातील भवाणी मंदिरात असलेला शिलालेख हा ज्ञानेश्वरीच्या पूर्वी ८४ वर्षअगोदर, म्हणजेच शके ११२८ मधील आहे. असे ९ 'राधामाधवविलासचंपु' च्या प्रस्तावनेत इतिहास संशोधक वि.का. राजवाडे यांनी म्हटले आहे. त्याच प्रमाणे भाषा मातृत्वाचा धागा फार प्राचीन आहे. ज्ञानेश्वरांनाही संस्कृत,

मराठी व बागलाणी बोली येत असे. बागलाणमधील अहिराणीला एक वेगळाच हेल तर आहेच पण वाक्यप्रचारापासून म्हणींपर्यंत तिला वेगळाच खुमार आहे. 'लग्न कुठे आहे ?' हे वाक्य 'लगन कुठे शे ?' असे म्हटले जाते. तसेच 'कुठे जाई ऱ्हायना ?' येस, जास, करस, बसस, चालस, पळस, जेवस, असे शब्द आहेत.

त्याच प्रमाणे भाषिक गमतीजमतीही भरपूर आहेत, असे एखादी व्यक्ती दुसऱ्याला म्हणेल की 'बशी घे' तेव्हा त्याचा अहिराणी अर्थ माहीत नसलेल्या व्यक्तीला वाटेल की तो चहा पिण्यासाठी बशी मागतो आहे की काय ? पण त्याचा अर्थ असा होतो की खाली बसून घे. तीच गोष्ट 'येस' या शब्दासाठी 'येतो', तेच 'कशे चालनं ?' 'कसं चाललंय' साठी 'जथापत चालंन.' 'ठीक चाललय'. अशी उत्तरे मिळतात.

'त्याचा, तिचा, त्यांचा, ऐवजी 'त्यांना, त्यानी, त्यासना' असे म्हणतात. बागलाणी अहिराणीत खूप वेगळे शब्द ऐकायला मिळतात. जे शब्द प्रमाण मराठीत ऐकायला मिळत नाहीत. उदा. आंडोर म्हणजे मुलगा आंडेर म्हणजे मुलगी, डिकरा म्हणजे पुतण्या, डिकरी म्हणजे पुतणी, फुई म्हणजे आत्या. बागलाणकर सगळे अवगुण आत्यावर लादून देतात. म्हणजे एखाद्या घरात मुलगी वेगळी वागायला लागली तर म्हणतात की 'आईवर ना बाईवर, जाई पडी फुई वर' इथे दिवसाला 'याळ' म्हणतात. 'सऱ्याळ' म्हणजे संपूर्ण दिवस.

बागलाणकरांच्या अहिराणीत खाद्यपदार्थांची नावेही भिन्न व निराळी आहेत. जसे 'कोंडाळं' म्हणजे थालीपीठ, समार म्हणजे मसाला, 'बट्ट म्हणजे रस्सा, 'सोला' म्हणजे शेंगदाणे. इथल्या म्हणीपण मजेशीर आहेत. उदा. 'शेन नं शेनफडं मोठा घरमा इपडं' - (कष्टाशिवाय अपघाती श्रीमंती आली की माणूस गर्विष्ठ होतो, 'येता जाता चरस नि सोमवार धरस' - (दिवसभर खाऊन उपवास असल्याचे भासवणे), 'गधडाळे गुण नी चव काय' (मुर्खाला चांगल्या गोष्टीचे महत्त्व कळत नाही.)

बागलाणमधील या समृद्ध वाङ्मयाचा उल्लेख संत ज्ञानेश्वरांच्या लेखणातही दिसून येतो त्यांची एक बागलाणी गवळण प्रसिद्ध आहे. तसेच बागलाण नवरीचे रूपकात्मक अभंग व काही पदेही ज्ञानेश्वरांनी लिहीली आहेत.

गवळण - तन्हा मराठी देश, मन्ही बागलाणी भाषा ।
मन्हा रे कान्हा, मन्हा रे कान्हा ।
पदे - यशोदाना बाय तान्हा मले म्हने हादु ले वो
मी तं बाई साधी भोई गऊ त्याना जवय ।

अशी ही बागलाणी अहिराणी बोली खूपच मधूर-गोड आणि आपलीशी वाटणारी बोली माणसा-माणसांना जोडणारी, रूढी व परंपरागत चालत आलेली बागलाणकरांच्या अगदी सहज अंगवळणी पडते आणि जीवनाचा एक भाग बनते. बागलाणमधून बाहेरी प्रदेशात कामानिमित्त, वास्तव्यासाठी जाणाऱ्या माणसाच्या सोबत जाते आणि तिकडे कुणी आपली अहिराणी भाषिकासोबत गट्टी करायला भाग पाडते. परक्या देशात मायेचा, आपले पणाचा शब्दरूपी स्पर्श करते. म्हणून म्हणावेसे वाटते...

**मनी बागलाणनी अहिराणी**
**जशी दहिमान लोणी,**
**सगळ पारखी ताकना**
**इले पारख नई कोणी....**

अशा या बागलाणच्या खऱ्या अहिराणी-भाषासंस्कृतीला कुणीच पारखतं नाही. बोली भाषेत मुद्दाम कोणी ठरवून लेखन करत नाही. बागलाणच्या अहिराणी-भाषिकांची प्रमाण भाषांकडे वाढत चाललेली ओढ यामुळे मातृभाषा असूनही अनेक लेखक प्रमाण भाषेत लेखन करतांना दिसतात. पण हे सर्व रूचिपालट की काय अशी शंका कधी कधी येते.

तरीपण, सर्वच बाबतीत समृद्ध अशा बागलाणी अहिराणीचा आणि भाषा संस्कृतीचा, एक बागलाणकर म्हणून मला मनापासून अभिमान वाटतो... आणि या अहिराणी संस्कृतीचा एक भाग म्हणून मी तिचा कृतज्ञ आहे.

***

# अहवाल विभाग

## मराठी विभाग

– **प्रा.डॉ. सुदाम राठोड** (मराठी विभाग प्रमुख)

शैक्षणिक वर्ष २०२०–२१ व २०२१–२२ मध्ये मराठी विभागात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विभागातील सर्व प्राध्यापकांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमात सहभाग नोंदवला. मराठी विभागाने आयोजित केलेल्या व संपन्न केलेल्या कार्याचा अहवाल खालीलप्रमाणे–

मा. प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांनी या शैक्षणिक वर्षात विविध ठिकाणी ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन केले. त्यात प्रामुख्याने दि. ३ ऑक्टोबर २०२० रोजी ज्योती स्टोअर्स व शंकराचार्य न्यास (सांस्कृतिक विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'लेखक तुमच्या भेटीला' या उपक्रमाअंतर्गत वाचन संस्कृती या विषयावर ऑनलाईन व्याख्यान दिलेले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या भाषा सल्लागार समितीच्या बैठकींना हजेरी लावलेली आहे. 'मुक्त शब्द' या वाङ्मयीन नियतकालिकात 'तुकारामांच्या जोड अभंगाचे वाचन आणि निरुपण' हा लेख प्रकाशित झाला. त्याचप्रमाणे 'कविता–रती' या महत्त्वाच्या वाङ्मयीन नियतकालिकात 'अनुराधा पाटील यांच्या दोन कविता' हा लेख प्रकाशित झाला. तसेच 'युगवाणी' या विदर्भ साहित्य संघाच्या मुखपत्रातून 'अरुण कोलटकर यांच्या आरसा कवितेचे वाचन आणि निर्वाचन' हा लेख प्रकाशित झालेला आहे. अशा काही वाङ्मयीन नियतकालिकात त्यांचे समीक्षा व संशोधनपर लेख प्रसिद्ध आलेले आहेत.

डॉ. एस.एन राठोड यांनी दि. २७ फेब्रुवारी २०२१ रोजी मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात 'मराठी भाषेची सद्यस्थिती' या विषयावर व्याख्यान दिलेले आहे. तसेच त्यांना संघर्षनायक मिडिया या संस्थेकडून 'कोरोना योद्धा २०२१' हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. 'महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळी' या संपादित ग्रंथात त्यांच्या 'आंबेडकरी चळवळ आणि भटके विमुक्त' या लेखाचा समावेश झालेला आहे.

दि. १४ ते २८ फेब्रुवारी २०२१ दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. या निमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. ऑनलाईन व्याख्यान ऐकून त्याचे शब्दांकन करणे, निबंध लेखन, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा इ. स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना नटसम्राट हे नाटक पडद्यावर दाखवण्यात आले.

'मराठी भाषा दिनानिमित्त डॉ. दिलीप धोंडगे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच या कार्यक्रमाचे औचित्य साधून 'परिमल' या भित्तीपत्रकाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांच्या हस्ते करण्यात आले.

***

## हिंदी विभाग

– **प्रा. निलेश पाटील** (हिंदी विभाग प्रमुख)

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२, मध्ये हिंदी विभागात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विभागातील सर्व प्राध्यापकांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभाग नोंदविला. मराठी विभागाने आयोजित केलेल्या व संपन्न केलेल्या कार्याचा अहवाल खालीलप्रमाणे-

हिंदी विभागात सन २०२०-२१, २०२१-२२ मध्ये ५ सप्टेंबर 'शिक्षक दिन' ऑनलाईन तासिकेचे आयोजन करून साजरा करण्यात आला. यावेळी हिंदी विभागातील प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. त्याच प्रमाणे हिंदी विभागातर्फे १४ सप्टेंबर हा दिवस 'राष्ट्रभाषा हिंदी दिवस' ऑनलाईन साजरा करण्यात आला. या प्रसंगी हिंदी विभागातील प्रा. निलेश पाटील, डॉ. दीपा कुचेकर, प्रा. धनंजय पंडीत, प्रा. युवराज गातवे यांनी विद्यार्थ्यांना 'राष्ट्रभाषाचे' महत्त्व सांगितले. यावेळी या कार्यक्रमाला विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सन २०२०-२१, २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात अनेक मान्यवर वक्त्यांनी हिंदी विभागाला भेट दिली व विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. त्यात डॉ. राजेंद्र खैरनार (बारामती महाविद्यालय) प्रा. दिलीप बच्छाव (ताहराबाद महाविद्यालय) इ. तसेच हिंदी विभागातील डॉ.एन.डी.पंडीत यांना मार्च २०२१-२०२२ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत 'विद्यावाचस्पती' पदवी प्रदान करण्यात आली. त्यांचा संशोधनाचा विषय 'शांताकुमार के हिंदी साहित्य का अनुशीलन' हा होता.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२०२२ मध्ये हिंदी विभागातील प्राध्यपकांनी ऑनलाईन राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग नोंदविला. हिंदी विभागातील प्रा. निलेश पाटील व डॉ. दीपा कुचेकर यांनी ऑनलाईन उजळणी वर्ग, संकाय विकास कार्यक्रम पुर्ण करुन प्रमाणपत्र प्राप्त केले.

***

## English Department

**– Mr. S. P. Kamble**

The department, along with its day to day activities of teaching, learning an evaluation, performed smoothly. Being the pandemic period, the faculties conducted online lectures by making use of various social media platforms such as Google meet. Besides, the faculties were actively involved in counseling the students. The department has conducted a skill Development course of four credits for the PG students of Arts faculty.

Mr. S. P. Kamble has been awarded with Ph. D. in English by S. R. T. M. University Nanded in 2022. He did his research on 'Dalit Autobiographical Narratives: A Study in Ambedkarite Perspective'. He has completed A One Week Faculty Development Programme on "Literary Theory and Criticism" organized by KTHM College Nashik Under UGC Stride Component-I held between 23/10/2021 to 28/10/2021. He has published five research articles in the reputed national and international journals in the academic year 2021-22. The research articles are 1. An Eruption of agony on the Violation of Human Rights in Siddalingaiah's Ooru Keri and Vasant Moon's Basti, 2. Reflection of Ambedkarite Discourse in Daya Pawar's Baluta, 3. Feeling of Isolation and loss in Jhumpa Lahiri's When Mr. Pirzada Came to Dine, 4. Australian Landscape in the Poetry of A. D. Hope, James Mcauley and Judith Right, 5. Modernism in Ooru-Keri. He also wrote a chapter in a book Aajadi ka Amrut Mahotsav Nari Shashaktikaran published by KBC-Nano Pbl. Pvt. Ltd. He presented a research article "Resistance of Dalit Feminism: An outburst against Hegemonic Conventions in The Prisons We Broke" in the Seminar on "Marginalized Literature" held on 30th and 31th January, 2022.

Meanwhile, Mr. S. C. Kurkute completed for an online Faculty Induction Programme sponsored by UGC-HRDC Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad. He also published a research paper titled 'Reflection of Gandhian Ideology, Nationalism, Spirituality and Unity; A study of Kanthapura, a novel by Raja Rao' in an International Research Journal. He has also published a research paper named 'Contribution of Sudha Murthy to Uplift the Tribal, the most neglected marginalized: A Select Study of her Stories' in a book 'Sanshodhak' and 'Education and Women Empowerment; Role of Social Reformist and Writers to Uplift Women' in 'Azadi Ka Amrut Mahostav; 'Women Empowerment'

Mr. D. D. Sonawane completed an online Induction Training on 'Faculty in Universities/ Colleges/ Institution of Higher Education'.

Mrs. M. M. Nerkar has been awarded M. Phil. in English by SPPU Pune in the academic year 2022. She did her research on 'Role of Women in Girish Karnad's Plays; A Study'.

***

## इतिहास विभाग

– प्रा. कल्पना पाटील (विभाग प्रमुख)

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ व २०२१-२२ चा इतिहास विभागाचा वार्षिक अहवाल सदर करताना विशेष आनंद होत आहे. या वर्षात अध्यापनाबरोबर इतर उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा उंचावता येईल यासाठी जाणीव पूर्वक प्रयत्न करण्यात आले.

✼ दि. १९/०२/२०२२ रोजी 'शिवजयंती उत्सव सप्ताह' साजरा करण्यात आला. शिवजयंती प्रसंगी बिटको महाविद्यालयाचे प्रा.डॉ.संतोष बोडके सर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. शिवजयंती निमित्त विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये चित्रपट महोत्सव, निबंध लेखन स्पर्धा, मोफत नेत्ररोग चिकित्सा शिबीर, ऐतिहासिक क्षेत्रभेट, स्वच्छता अभियान व भित्तीचित्र प्रदर्शन हे उपक्रम राबविले. विद्यार्थ्यांनी यामध्ये आपला सक्रीय सहभाग नोदविला.

✼ महाविद्यालयात राबविण्यात येणारे इतर उपक्रम व त्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समित्यांमध्ये भाग घेऊन महाविद्यालयाचे प्रशासन दर्जेदार करण्यसाठी विभागाच्या प्राध्यापकांनी सहकार्य केले.

✼ इतिहास विभागाच्या वतीने देवमामलेदार स्मारक, ऐतिहासिक मंदिर व धार्मिक स्थळे यांना भेटी देण्यात आल्या. त्या ठिकाणी जाऊन ऐतिहासिक पार्श्वभूमी विषयक माहिती जाणून घेण्यात आली. परिसर स्वच्छता करून अहवाल लेखन करण्यात आले.

✼ इतिहास विभागाची विद्यार्थीनी 'अहिरे अश्विनी रामदास' हिला पुणे विद्यापीठाकडून 'सुवर्ण पदक' मिळविले.

इतिहास विभागाची विद्यार्थीनी 'बागुल अनिता दत्तू' हिला पुणे विद्यापीठाकडून 'रौप्य' पदक मिळविले.

**प्रा. कल्पना पाटील**

बहि:शाल विभाग सदस्य, रॅगिंग विरोधी समिति सदस्य, विद्यार्थिनी वसतीगृह, सामाजिक शास्त्रे या विभागात कामकाज पाहिले.

**प्रा. अनिल पाटील**

पं.ध पाटील हायस्कूल येथे स्थानिक व्यवस्थापन समिति सदस्य, वक्तृत्व, व वाद विवाद समिति या विभागांचे कामकाज पहिले .

**प्रा. महेश वाघ**

✼ भारतरत्न मदर तेरेसा गोल्ड मेडल पुरस्कार प्रदान करण्यात आला.
(भारत विकास प्रबोधनी -१२ डिसेंबर २०२१)

✼ डॉ. पंजाबराव देशमुख आदर्श शिक्षक पुरस्कार.
(आमची माती आमची मानस-२७ डिसेंबर २०२१)

✼ ताहराबाद महाविद्यालयात 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' या विषयावर व्याख्यान.

✼ १९ फेब्रुवारी २०२२ रोजी 'शिवजयंती' निमित्त ता. देवळा येथे व्याख्यान.

✼ सटाणा महाविद्यालयात 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागातील श्रमसंस्कार शिबाराप्रसंगी 'शिवाजी महाराज एक विज्ञाननिष्ठ राजा' या विषयावर व्याख्यान.

✼ जळगाव येथील विद्यापाठात इतिहास विषयात महाराष्ट्रातील विद्यार्थ्याचे भारताच्या स्वांतत्र्य आंदोलनातील योगदानाचा ऐतिहासिक अभ्यास या विषयात पीएच.डी पदवी प्रदान.

**प्रा. अमित निकम**

- ४ आठवड्याचाफॅक्ल्टी इंडकशन प्रोग्रम, रामनुजन कॉलेज, दिल्ली विद्यापीठ. येथून अ+' श्रेयांकाने पूर्ण केला.
- कर्मवीर डॉ. वसंतराव पवार यांच्या ११ व्या स्मृतीदिनानिम्मित व्याख्यान दिले.
- २ पेपर आंतरराष्ट्रीय जर्नल मध्येप्रसिद्ध केली.
- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे मानव्यविध्याशाखेत 'विद्यावाचस्पती' पदवीसाठी नोंदणी झाली.

**प्रा. सुनिल वारुंगसे**

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे मानाव्य विध्याशाखेत 'विद्यावाचस्पती' पदवीसाठी २०२१ ला निवड.
- 'स्वामी विवेकानंद व आजचा युवक' या विषयावर व्याख्यान. इगतपुरी महाविद्यालयात शिवजयंती निमित्त व्याख्यान.
- सातपूर महाविद्यालयात 'राष्ट्रीय सेवा योजना' अंतर्गत श्रमसंस्कारशिबिरात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' या विषयावर व्याख्यान.
- भगूर महाविद्यालयात 'राष्ट्रीय सेवा योजना' अंतर्गत श्रमसंस्कारशिबिरात 'स्वामी विवेकानंद व आजचा तरुण' या विषयावर व्याख्यान.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा इतिहास विभागाचा वार्षिक अहवाल सादर करताना विशेष आनंद होत आहे. या वर्षात अध्यापनाबरोबर इतर उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा उंचावता येईल यासाठी जाणीव पूर्वक प्रयत्न करण्यात आले. आपणास सविनय कळवू इछिते की, कोविड - १९ (कोरोना) जागतिक साथरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालय प्रशासनाच्या आदेशान्वये इतिहास विभागाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे अध्यापन पूर्ण केले आहे. ऑनलाईन अध्यापणासाठी Google Meet, Zoom app, What's app, Online Power Point Presentation या माध्यमांचा उपयोग केला गेला.

ऑनलाइन अध्यापन वर्गात विद्यार्थ्यांची १००% उपस्थिती राहावी यासाठी प्रत्येक वर्गासाठी विषय निहाय स्वतंत्र What's app group तयार करून त्यावर ऑनलाइन तसिकेचा वेळ, अध्यापनाचा घटक, उपघटक व माध्यम यांची पूर्वसूचना दिली जाते. तसेच जे विद्यार्थी ऑनलाइन तासिकेस उपस्थित राहू शकत नाहीत, त्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी अध्यापन घटकांची विषय शिक्षकांद्वारे स्वनिर्मित दृकश्राव्य चलचित्रफीत तसेच नोट्स देखील What's app group वर उपलब्ध करून दिल्या गेल्या. दि. १९/०२/२०२१ रोजी 'शिवजयंती' कोरोना नियमांचे पालन करून महाविद्यालयीन स्तरावर साजरी करण्यात आली. महाविद्यालयात राबविण्यात येणारे इतर उपक्रम व त्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समित्यांमध्ये भाग घेऊन महाविद्यालयाचे प्रशासन दर्जेदार करण्यसाठी विभागाच्या प्राध्यापकांनी सहकार्य केले. इतिहास विभागाची विद्यार्थीनी 'अहिरे अश्विनी रामदास' हिला पुणे विद्यापीठाकडून 'सुवर्ण पदक' मिळविले. इतिहास विभागाची विद्यार्थीनी 'बागुल अनिता दत्तू' हिला पुणे विद्यापीठाकडून 'रौप्य पदक' मिळविले. कोरोना नियमांचे पालन करून सर्व प्राध्यापकांनी अध्यापनाचे कामकाज पूर्ण केले. इतिहास विभाग यापुढे हि महाविद्यालयाच्या विकासासाठी प्रयत्नशील राहील.

***

## भूगोल विभाग

– डॉ.पी.एस. कुदनर (विभाग प्रमुख)

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा भूगोल विभागाचा वार्षिक अहवाल सादर करताना विशेष मनस्वी आनंद होत आहे. सन २०२१-२२ या वर्षात अध्यापनाबरोबरच इतर शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्याचा बौद्धिक स्तर कसा उंचावता येईल यासाठी प्रयत्न करण्यात आली. या शैक्षणिक वर्षात ऑनलाईन महाविद्यालय सुरु असताना विविध कार्यक्रम घेण्यात आलेत.

१) १६ सप्टेंबर २०२१ हा दिवस 'ओझोन दिन' ऑनलाईन साजरा करण्यात आला तसेच या दिनाच्या निमित्ताने ऑनलाईन क्विझ घेण्यात आली

२) १४ जानेवारी २०२२ हा दिवस 'भूगोल दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. या दिनाच्या निमित्ताने ऑनलाईन क्विझ घेण्यात आली. यावेळी ऑनलाईन कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. ई. पाटील यांनी विद्यार्थ्यांना 'भूगोल दिनाचे महत्व व साजरा करण्याचा हेतू यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यामध्ये व समाजात भौगोलिक साक्षरता वाढवण्याच्या दृष्टीने या दिवसाला विशेष महत्त्व आहे यावर माहिती दिली. सदर कार्यक्रमात भूगोल विभाग प्रमुख डॉ. पी. एस. कुदनर यांनी आपल्या मार्गदर्शनातून एका अर्थी ऋतुबदल होण्याचा हा दिवस सूर्य ज्या दिवशी दक्षिणायनातून उत्तरायणात मार्गक्रमण करतो. त्या तिथीला मकरसंक्रांत साजरी केली असा भूगोल दिन साजरा करण्याचे महत्व आपल्या मार्गदर्शनातून सांगितले.

३) २ फेब्रुवारी २०२२ रोजी 'जागतिक पाणथळ दिन' साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी ई. पाटील यांनी विद्यार्थ्यांना जागतिक पाणथळ दिन' याची पार्श्वभूमी व वृक्ष संवर्धन करणे काळाची गरज आहे यावर माहिती दिली. सदर कार्यक्रमात डॉ. एन. एन. घोलप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

४) २२ एप्रिल २०२२ जागतिक वसुंधरा दिन साजरा करण्यात आला. भूगोल विभागाच्या वतीने वसुंधरा दिनाच्या निमित्त दि २५ ते ३० एप्रिल २०२२ या कालावधीत वसुंधरा सप्ताह साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एस. पी. कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी आपल्या मनोगतातून वसुंधरेचे पर्यावरणीय आरोग्य टिकवून ठेवण्याची जबाबदारी मानवावर आहे. परंतु मानव आपल्या स्वार्थासाठी पर्यावरणातील स्रोतांचा अतिरेकी अतिवापर करत आहे. यामुळे वसुंधरेचे पर्यावरण धोक्यात येत आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पी. एस. कुदनर यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात वसुंधरा दिन साजरा करण्याचा हेतू व इतिहास याबद्दल माहिती दिली. दिवशी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. रवींद्रकुमार. द. पाटील यांनी 'वसुंधरा वाचवा' या विषयावर आपल्या मनोगतातून वसुंधरा दिन नुसता साजरा करण्याबरोबर वसुंधरेचे पर्यावरण जतन करण्याबाबत

विचार करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. आपण स्वतः काय करू शकतो हे महत्वाचे आहे. वसुंधरेचे संरक्षण करणे प्रत्येकाची जबाबदारी असल्याने शिक्षणाबरोबर बाह्य कौशल्य आत्मसात केली पाहिजे असे आपल्या मनोगतातून व्यक्त केले. भूगोल विभाग प्रमुख डॉ. पी. एस. कुदनर यांनी वसुंधरा सप्ताहच्या निमित्ताने भूगोलातील करीयरच्या संधी या विषयावर माहिती दिली तसेच विद्यार्थीच्या अंगी असणाऱ्या सुप्त दुसऱ्या गुणांना वाव मिळावा तसेच त्यांचे विचार प्रकट करण्यासाठी भूगोल विभागाने निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. तसेच सामान्यज्ञान स्पर्धा आयोजन करून विद्यार्थ्यांना भविष्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेतील भूगोल विषयाला किती महत्व यावर माहिती दिली.

तसेच भूगोल विभागातील प्राध्यापकानी वरील कार्यक्रमा बरोबर स्वत:चा शैक्षणिक विकासासाठी रेफ्रेशर, ओरिनटेशन, रिसर्च, चर्चासत्र, जर्नल या मध्ये भरीव अशी कामगिरी पार पाडली व महाविद्यालयातील विविध समितीमध्ये भाग घेऊन महाविद्यालयाचे प्रशासन दर्जेदार करण्यासाठी सहकार्य केलेत.

भूगोलशास्त्र विभागा अंतर्गत घेण्यात आलेल्या सर्व उपक्रमांना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. आर.डी. पाटील यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली वर्षभरातील विविध उपक्रम व कार्यक्रम मोठ्या उत्साहाने व यशस्वीपणे संपन्न झाले. तसेच भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कुदनर, प्रा.डॉ.एन.एन. घोलप, प्रा. डी. के. आहिरे, प्रा.वाय. बी. जाधव व प्रा. एस. एस. पवार यांचेही सहकार्य लाभले.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा भूगोल विभागाचा वार्षिक अहवाल सादर करताना विशेष आनंद होत आहे. सन २०२०-२१ या वर्षात कोरोना कालखंडात ऑनलाईन पद्धतीने अध्यापनाबरोबरच इतर उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये या साठी विशेष प्रयत्न करून विविध कार्यक्रम व उपक्रम यांचे आयोजन करण्यात आले.

१) ११ जुलै २०२० रोजी 'जागतिक लोकसंख्या दिन' ऑनलाईन घेण्यात आला.

२) १६ सप्टेंबर २०२० हा दिवस 'ओझोन दिन' म्हणून साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून ऑनलाईन क्विझ घेण्यात आली. तसेच या निमित्ताने प्रा.पी.पी.शार्दुल यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाईन व्याख्यान दिले. या कार्यक्रमात उत्सुर्फपणे सहभागी झाले होते.

३) १४ जानेवारी २०२१ हा दिवस 'भूगोल दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. दिनाच्या निमित्ताने ऑनलाईन कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप धोंडगे यांनी विद्यार्थ्यांना 'भूगोल दिनाच्या निमित्ताने मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमात भूगोल विभाग प्रमुख डॉ. एन. एन. घोलप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

४) २ फेब्रुवारी २०२१ रोजी 'जागतिक पाणथळ दिन' साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप धोंडगे यांनी विद्यार्थ्यांना 'जागतिक पाणथळ दिन' या विषयी माहिती दिली. सदर कार्यक्रमात प्रा. उमेश पाटोळे यांनी विद्यार्थ्यांना या विषयावर व्याख्यान दिले.

तसेच भूगोल विभागातील प्राध्यापकानी वरील कार्यक्रमाबरोबर स्वत:चा शैक्षणिक विकासासाठी रेफ्रेशर,

ओरींन्टेशन, रिसर्च पेपर, चर्चासत्र, जर्नल या मध्ये भरीव अशी कामगिरी पार पाडली. महाविद्यालयातील विविध समित्यांमध्ये भाग घेऊन महाविद्यालयाचे प्रशासन दर्जेदार करण्यासाठी सहकार्य केले.

भूगोलशास्त्र विभागा अंतर्गत घेण्यात आलेल्या सर्व उपक्रमांना महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. दिलीप धोंडगे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली वर्षभरातील विविध उपक्रम व कार्यक्रम मोठ्या उत्साहाने व यशस्वीपणे पडण्यासाठी भूगोल विभाग प्रमुख डॉ. एन.एन. घोलप व सहकारी प्रा. एच.बी.गायकर, प्रा.आर.डी.खुर्चे प्रा.पी.पी.शार्दुल, प्रा.यु.एम. पाटोळे, प्रा.वाय. बी. जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

***

## राज्यशास्त्र विभाग

**– प्रा. ए.बी. राऊत (विभाग प्रमुख)**

२०२०-२०२१ व २०२१-२०२२ हे शैक्षणिक वर्ष कोव्हीड १९ च्या प्रादुर्भावाचे वर्ष असल्यामुळे ऑनलाइन पद्धतीने अभ्यासक्रम व परीक्षा घेण्यात आल्या. या कालावधीत विभागातील प्राध्यापकांनी ऑनलाइन पद्धतीने उजळणी वर्ग, सेमिनार वर्कशॉप यामध्ये हजेरी लावली. १० डिसेंबर २०२० रोजी महाविद्यालयात ऑनलाइन पद्धतीने मानवी हक्क दिनाचे आयोजन करण्यात आले. या वेळी प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांनी आपले विचार मांडले.

जानेवारी २०२१ रोजी महाविद्यालय ऑफलाइन पद्धतीने सुरु झाले होते. त्यामुळे २५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून बागलाणचे तहसीलदार शुभंम गुप्ता (भारतीय प्रशासकीय सेवा) उपस्थित होते.

**प्रा. ए.बी. राऊत**

१) भुमकाल ऑर्गनायझेशन नागपूर यांनी १५/०७/२०२० ते २८/०७/२०२० या कालावधीत आयोजित केलेल्या एफ. डी. पी. 'समकालीन नक्षलवाद' या कोर्स मध्ये सहभाग नोंदविला.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी १४/१२/२०२० ते २८/१२/२०२० या कालावधीत आयोजित केलेल्या उजळणी वर्गा 'मानवी हक्क व सामाजिक न्याय' या कोर्स मध्ये सहभाग नोंदविला.

३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे राजकीय अर्थशास्त्र या विषयाचे पेपर सेटिंगचे काम पूर्ण केले.

**प्रा. डॉ. व्ही. एस. बागुल**

१) रामानुजन महाविद्यालय दिल्ली या महाविद्यालयाने ०२/०७/२०२० ते २०/०७/२०२० या कालावधीत आयोजित केलेल्या एफ. डी. पी. या कोर्स 'प्रगत संकल्पना' यामध्ये सहभाग नोंदविला.

२) रामानुजन महाविद्यालय दिल्ली या महाविद्यालयाने ३० / ०१ /२०२१ ते १४/०२/२०२१ या कालावधीत आयोजित केलेल्या उजळणी वर्ग 'आधुनिक संशोधन पद्धती' यामध्ये सहभाग नोंदविला.

## अर्थशास्त्र विभाग

**– प्रा.आर.टी. तुपलोंढे (विभाग प्रमुख)**

शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ व २०२१-२०२२ या वर्षीचा अहवाल सादर करताना विशेष आनंद होत आहे. या शैक्षणिक वर्षात आमच्या विभागातील प्राध्यापक सहकार्याने पुढील उपक्रमांमध्ये सहभाग घेतला.

**१) प्रा. के. आर. पाडवी :-**

सावित्रीबाई पुणे विद्यापीठ, पुणे २०१९ पॅटर्न नुसार एस. वाय. बी ए. समाजकार्य (G 2) या विषयाचा अभ्यासक्रम तयार केला. सावित्रीबाई पुणे विद्यापीठ, पुणे २०१९ पॅटर्न नुसार एस. वाय. बी ए. गृह अर्थशास्त्र (G 2) या विषयाचा अभ्यासक्रम तयार केला.

गुजरात विद्यापीठ अहमदाबाद येथे २३/०७/२०२० ते २९/०७/२०२० या काळात एक कन्टेन्ट डेव्हलपमेंट या विषयावर शॉर्ट टर्म कोर्स पूर्ण केला.

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वणी तालुका दिंडोरी जिल्हा नाशिक या महाविद्यालयाने ०६/०७/२०२० आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात भारतातील प्रगत शेती तंत्रज्ञानाचा आढावा या विषयावर शोधनिबंध सादर केला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे एफ वाय बी ए /एस वाय बी ए / टीवाय बी ए गृह अर्थशास्त्र या विषयाचे पेपर सेटिंगचे काम पूर्ण केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे एफ. वाय. बी. ए. /एस. वाय. बी. ए. / टी.वाय. बी. ए. गृह अर्थशास्त्र या विषयाचे पेपर सेटिंगचे काम पूर्ण केले.

के.टी.एच.एम. या महाविद्यालयाने आयोजित केलेल्या ०९/०८/२०२० ते १३/०८/२०२० या कालावधीत शाश्वत ग्रामीण विकासातील मूलभूत सामाजिक सहभागात कृतीयुक्त संशोधन या विषयावर कोर्स पूर्ण केला.

महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयाने आयोजित केलेल्या ऑनलाईन सेमिनार / वेबिनार मध्ये सहभाग नोंदविला आहे.

**प्रा. आर. टी. तुपालोंढे :-**

सावित्रीबाई पुणे विद्यापीठ, पुणे २०१९ पॅटर्न नुसार एस. वाय. बी ए. समाजकार्य ( ऋ२ ) या विषयाचा अभ्यासक्रम तयार केला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे २०१९ पॅटर्न नुसार एस. वाय. बी ए. गृह अर्थशास्त्र (G 2) या विषयाचा अभ्यासक्रम तयार केला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे आदेशानुसार रावळगाव महाविद्यालय, तालुका मालेगाव जिल्हा नाशिक येथे एल.आय.सी.कमिटी सदस्य म्हणून कामकाज पूर्ण केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे एफ. वाय. बी. ए. / एस. वाय. बी. ए. / टी. वाय. बी. ए. गृह अर्थशास्त्र या विषयाचे पेपर सेटिंगचे काम पूर्ण केले.

के.टी.एच.एम महाविद्यालयाने आयोजित केलेल्या ०९/०८/२०२० ते १३/०८/२०२० या कालावधीत शाश्वत ग्रामीण विकासातील मूलभूत सामाजिक सहभागात कृतीयुक्त संशोधन या विषयावर कोर्स पूर्ण केला.

**प्रा. पी. के. गवळी :-**

विनायक पाटील महाविद्यालय वैजापूर या महाविद्यालयाने ०२/०६/२०२० ते ०७/०६/२०२० त्या काळात आयोजित केलेल्या एफ. डी.पी. या कोर्स अंतर्गत आधुनिक अध्यापन मूल्यमापन आणि संशोधन पद्धती यामध्ये सहभाग नोंदविला.

रामानुजन महाविद्यालय दिल्ली या महाविद्यालयाने ०८ / ०६ / २०२० ते १४/०६/२०२० या कालावधीत

आयोजित केलेल्या एफ. डी. पी. या कोर्स अंतर्गत संशोधन साधनातील मुक्त स्त्रोत यामध्ये सहभाग नोंदविला.

केटीएचएम महाविद्यालयाने २९/०७/२०२० ते ०८/०८/२०२० त्या कालावधीत आयोजित केलेल्या कोविड - १९ नंतर वाणिज्य, व्यवस्थापन, आर्थिक क्षेत्रांचा आढावा या कोर्स मध्ये सहभाग नोंदविला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे एफ वाय बी ए /एस वाय बी ए / टी वाय बी ए गृह अर्थशास्त्र या विषयाचे पेपर सेटिंगचे काम पूर्ण केले.

